E-BOOK

# सुपर डुपर हिटस्

- दिलीप ठाकूर

४






"ई साहित्य प्रतिष्ठान"

सादर करीत आहे

# "श्री. दिलीप ठाकूर"



लिखित

# सुपर डुपर हिट्स

(भाग ४)

© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)

glam.thakurdilip@gmail.com 9870616216

# "सुपर डुपर हिट्स" (भाग 4)

# © लेखक : दिलीप ठाकूर

**प्रकाशन : ३ मे २०२६**

**© esahity Pratishthan®2026**

**प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान**

**www.esahity.com** **esahity@gmail.com**

**ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237**

**(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**https://www.esahity.com**

**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**

**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा. आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफ़ू !**

**लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.**

## ♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

दिलीप ठाकूर
(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स

कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले.  यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी विविध  नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर  अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा  त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे.  ऐशी आणि  नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने  चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा

दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन ( ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या

सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील

लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स अॅवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर'

दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे.        ९४२२३०१७३३
♥



"मनोगत"

"शो हाऊसफुल्ल आहे... "

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२ साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू

केली. मी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व  निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट.  त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा

आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती येते. त्याला इमेज मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद

मिळाला, आजही मिळतोय. त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला मी कायमच उत्साह दाखवला. चित्रिकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित

**माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!**

**दिलीप ठाकूर**
**(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)**

♥




**<u>सादर करीत आहे.. "श्री. दिलीप ठाकूर" लिखित</u>**
**<u>"सुपर डुपर हिट्स" (भाग ४)</u>**

♥

# अनुक्रमणिका

५९. राज कपूर (आर. के. फिल्म्स) (१६)
६०. "मेला" चित्रपटाची "पंचविशी" (२६)
६१. "हिट्स" च्या "ट्रॉफीज" (३७)
६२. जेव्हा सिनेमा "वेळ" बदलतो. (५०)
६३. "टाळ्या आणि शिट्ट्या" (६६)
६४. अमानुष @ पन्नाशीपार (८८)
६५. "दास्तान" @ ५४ वर्षे (९९)
६६. "सुनहरा संसार" पन्नाशीपार (११४)
६७. "आँधी" @ पन्नाशीपार (१२५)
६८. "नमक हराम" @ ५३ पार (१३६)
६९. हे "रिपीट रन गाजले!" (१४७)
७०. "अबोध" @ बेचाळीशीपार (१५८)
७१. "बावर्ची" @ ५४ वर्षे पार (१६९)
७२. "३६ घंटे" @ बावन्न वर्षे पूर्ण (१८४)
७३. "प्रेम नगर" @ बावन्न वर्षे पार (१९४)
("सुपर डुपर हिट्स" भाग ५ लवकरच!)

## लेख क्र. ५९

# २५ वर्षे झाली, आर. के. फिल्मचा नवीन चित्रपट नाही...!




चित्रपट आणि खेळात नवीन विक्रम होत असतात म्हणूनच तर त्यांच्याबाबतची उत्सुकता कायम राहते. पण एकादा विक्रम न झालेला बरा असंही वाटतं हो..! तब्बल पंचवीस वर्ष झालीत, आर. के. फिल्म बॅनरखालील एकही चित्रपट पडद्यावर आलेला नाही. म्हटलंत तर हे धक्कादायक!

भारतीय चित्रपटसृष्टीतील 'आर. के. फिल्म'

च्या चित्रपटांचे सातत्य, महत्व, अस्तित्व, यशापयश यांचा खूपच मोठा गौरवशाली इतिहास असल्याचे चित्रपट रसिकांना चांगलेच ज्ञात आहे'!

राज कपूरने अभिनेता, त्या अनुभवातून निर्माता व दिग्दर्शक, आर. के. फिल्म बॅनरची स्थापना! 'आग' (या चित्रपटाच्या दिग्दर्शनाच्या वेळेस राज कपूरचे वय चोवीस होते हे विशेष. साल १९४८) निर्मितीवस्थेत असतानाच चेंबूर येथे अतिशय देखणा व भव्य असा आर. के. स्टुडिओ, चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन व संकलन यांचे सातत्य! मनोरंजनातून 'प्रबोधन' हे वैशिष्ट्य! स्वत:चा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण होत गेला. राज कपूर दिग्दर्शित 'बरसात' (१९४९), 'आवारा' (१९५१) हा चित्रपट त्या काळात बीबीसीवर दाखवला गेला), 'श्री ४२०' (१९५५), 'संगम' (१९६४), 'मेरा नाम जोकर' (१९७०)! (याच टप्प्यावर राज कपूरमधील 'कलाकार' मागे पडत जाऊन 'शोमन' एस्टॅब्लिश होत गेला. नायिकेचे मन

जाणून घेणारा आता तिचं उत्तान शरीरसौंदर्यही दाखवू लागला हे चित्रपट जास्त दिसू लागले) 'बॉबी' (१९७३), 'सत्यम शिवम सुंदरम' (१९७८), 'प्रेम रोग' (१९८२), 'राम तेरी गंगा मैली' (१९८५) आणि त्याचबरोबर 'आह' (राजा नवाथे दिग्दर्शित '१९५३'!), 'बूट पॉलिश' (दिग्दर्शक प्रकाश अरोरा. १९५३), शंभू मित्रा व अमित मोईत्रा दिग्दर्शित 'जागते रहो' (१९५६), राधु कर्मकार दिग्दर्शित 'जिस देश मे गंगा बहती है' (१९६०) , रणधीर कपूर दिग्दर्शित 'कल आज और कल' (१९७१), 'धरम करम' (१९७५) आणि 'हीना' (१९९१), राहुल रवैल दिग्दर्शित 'बीवी ओ बीवी' (१९८१), राजीव कपूर दिग्दर्शित 'प्रेम ग्रंथ' (१९९६) या चित्रपटांची निर्मिती आर. के. फिल्मने केली! यातील जवळपास प्रत्येक चित्रपटासाठी 'आर. के. स्टुडिओ'त भव्य दिव्य दिमाखदार सेट लागले. ते पडदाभर दिसले. ('आवारा'मधील स्वप्न दृश्याचा सेट गाजला!) दृश्य सौंदर्याचा त्यात प्रत्यय आला!




'आवारा' चित्रपटाची रशिया व पूर्व युरोपमधील लोकप्रियता कायमच कौतुकाची गोष्ट ठरली! चीनचे क्रांती नेते 'माओ त्से तुंग' यांना हा चित्रपट आवडे असे टाईम मासिकाने म्हटले!

'श्री ४२०' मध्ये राज कपूरमध्ये चार्ली चॅप्लीनच्या छटा दिसल्या. ही यशस्वी चौफेर वाटचाल 'आ अब लौट चले' या चित्रपटापर्यंत आली. चित्रपटाचे नाव 'जिस देश में गंगा बहती है' मधील लोकप्रिय गाण्याचा मुखडा. ऋषि कपूरने या चित्रपटातून दिग्दर्शनात पाऊल टाकले. तोपर्यंत




अभिनेता म्हणून मोठीच वाटचाल होतीच. त्यात तो 'कपूर'! चित्रपट माध्यम व व्यवसायात सकरात्मक पाऊल टाकणारा. (पण आपल्याच दिग्दर्शनातील चित्रपटातून भूमिका करणे मात्र टाळले!). सुभाष घई दिग्दर्शित "ताल" ची अक्षय खन्ना व ऐश्वर्या राय अशी रोमॅन्टीक जोडी पुन्हा जमली! राजेश खन्ना व मौशमी चटर्जी चरित्र भूमिकेत! (अक्षय खन्नाचे पडद्यावर माता व पिता!)

राजेश खन्ना आर. के. फिल्मच्या चित्रपटात ही जणू ब्रेकिंग न्यूजच. राज कपूर दिग्दर्शित 'सत्यम

शिवम सुंदरम' (१९७८) साठी राजेश खन्नाचीच नायक म्हणून निवड झाली होती. राजेश खन्नाचा तो 'पडता काळ' असल्यानेच त्याला मोठ्या बॅनरचा हुकमी चित्रपट मिळावा म्हणून डिंपलनेच राज कपूरला विनंती केली हे गॉसिप्स फार गाजले आणि शम्मी कपूरच्या दबाबातून राजेश खन्नाला चित्रपटातून काढले. ही गोष्ट सहन न झाल्याने राजेश खन्नाने रागाच्या आपल्या 'आशीर्वाद' बंगल्यातील काचेची वस्तू फोडल्याचे गॉसिप्स
बराच काळ रंगले! असं सगळं असल्यानेच आता
'आ अब लौट चले' मध्ये राजेश खन्ना भूमिका
साकारत होते हे विशेष! चित्रपट स्वीकारल्यावर राजेश खन्ना आर. के. कॉटेजमध्ये जाऊन रणधीर,
ऋषि व राजीव या कपूरबंधुना भेटल्याचा फोटो चक्क 'एक्सक्ल्युजिव्ह' ठरला. या चित्रपटाची ती

**स्टाईलीश आणि लक्षवेधक पूर्वप्रसिध्दी ही आर. के. फिल्मची खासियत! याही चित्रपटाच्या वेळेस**




कायम राहिली. चित्रपटात सुमन रंगनाथन, नवीन निश्चल, कादर खान, परेश रावल, सतिश कौशिक इत्यादींच्या प्रमुख भूमिका. मला आठवतय, आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी आर. के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रेस शो न करता मेन थिएटर 'मिनर्व्हा'त 'फर्स्ट डे फर्स्ट शो'ची पब्लिकसोबत चित्रपट पाहण्यासाठी तिकीटे दिली. (दिवस होता, २२ जानेवारी १९९९! सत्तावीस वर्षे पूर्ण! म्हणूनच हा फोकस) विशेष गोष्ट! चित्रपटाच्या मध्यंतरला शशी कपूर

आम्हा चित्रपट समीक्षकांना भेटायला आला होता. (आता तो 'शर्मिली', 'आ गले लग जा', 'त्रिशूल', 'चोर मचाये शोर' या काळातील सडसडीत शशी कपूर राह्यला नव्हता हे सांगायलाच नको!) त्याला आमची मते जाणून घ्यायची होती. चित्रपट 'लॅव्हीश' होता. खूप दिवसांनी राजेश खन्नाने अतिशय उत्तम अदाकारी साकारली होती. गीत संगीत (समीर व नदीम श्रवण) आर. के.च्या परंपरेला अजिबात साजेसे नव्हते. (ते अपेक्षितही नव्हते! राज कपूरचा गीत संगीताचा उच्च क्लास गाणी ऐकण्यात व पडदाभर पाहण्यात असे. कम्माल असे. त्या काळातील गाणी आजही लोकप्रिय. कधीही ऐकावीत आणि पहावीत. तोच मनसोक्त आनंद ).

'आ अब लौट....' ने साधारण स्वरुपाचे यश प्राप्त केले. आता प्रश्न होता, आर. के. फिल्मचा पुढचा चित्रपट कोणता? दिग्दर्शक कोण असेल? कलाकार कोण असतील? बरेच दिवस झाले, महिने झाले, वर्षही सरली. आता तर चक्क

पंचवीस वर्ष पूर्ण झालीत. पण ही अतिशय प्रतिष्ठित चित्रपट निर्मिती संस्था कळत नकळतपणे इतिहासजमा झाली असेच म्हणायचे का?

मधल्या काळात दोन गोष्टी घडल्या. सप्टेंबर २०१७ ला आर. के. स्टुडिओतील एका बाजूस आग लागली आणि चित्रपट शौकीन हळहळले! २०१९ साली मात्र मोठाच धक्का बसला. ऋषि कपूरने म्हटलं, ह्रदयावर हात ठेवून 'आम्ही हा आर. के. स्टुडिओ बंद करुन तो विक्रीचा निर्णय घेतला असल्याचे जाहीर केले' आणि क्षणात 'आर. के.' च्या चित्रपटांचा फ्लॅशबॅक डोळ्यासमोर आला. एक फार मोठी गौरवशाली ऐतिहासिक वास्तूच आता पाडली जाणार होती. नाईलाज व दुर्दैव! आज त्याच जागेवर एक चकाचक भव्य इमारत उभी असल्याचे दिसतेय. त्याचा पाया आर. के. फिल्म आणि अन्य चित्रपट निर्मात्यांच्या चित्रपटांचे मुहूर्त, शूटिंग, प्रिव्ह्यू शो यांचा आहे. तेथे चित्रपट जगलाय, वाढलाय,

रुजलाय. त्यावरची इमारत आधुनिक असेलही पण मूळ वास्तू कलेची सेवा व निर्मिती करणारी होती.

काहीही असलं तरी, इतरत्र कार्यालय स्थापून आर. के. फिल्मच्या चित्रपटांची निर्मिती कायम ठेवता आली असती. करिश्मा कपूर, करिना कपूर, जावई सैफ अली खान पतौडी, रणबीर कपूर, सून आलिया भट्ट हे सेलिब्रिटीज ती यशस्वी कलरफुल परंपरा निश्चित कायम ठेवण्यात यशस्वी ठरले असते. तशी त्यांची आर्थिक क्षमता आणि लोकप्रियता नक्कीच आहे.

इतिहासजमा होण्यापेक्षा इतिहास घडवत राह्यला हवे. पण तशी इच्छा हवी....काही विक्रम घडूच नयेत असं मी का सांगतोय हे एव्हाना लक्षात आले असेलच.

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)
♥

## लेख क्र. ६०

# "मेला" चित्रपटाची पंचवीशी..!
# ना धड "कारवाँ", ना धड "शोले"




"रिमेक" हीदेखील एक चित्रपट निर्मिती तील रुळलेली गोष्ट. असंख्य उदाहरणे आहेत!

कोणाची रिमेक..! घोषणेपासूनच समजते! काहींची चित्रपट पडद्यावर पाहिल्यावर लक्षात येते! काहीजण आपण मूळ चित्रपटापासून प्रभावित होऊन आपला नवीन चित्रपट घडवला असे म्हणत रिमेकच्या मुद्द्यालाच बगल देण्याचा प्रयत्न करतात. तर कोणी विदेशातील एकाद्या चित्रपटाचा

गाभा अथवा जर्म तेवढा घेतात आणि आपल्या शैलीतील चित्रपट बनवून "रिमेक"च्या आरोपातून आपली सुटका करुन घेतात. अमक्या तमक्या चित्रपटाची रिमेक एवढ्यावरच हे नसते.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले"(१९७५) ची "रिमेक" करण्याचा मोह अनेकांना का बरे झाला असा प्रश्न बी. सुभाष दिग्दर्शित "आंधी तुफान" (१९८३) पासून अनेक चित्रपट पाहताना झाला! गुणवत्ता! (याबाबत आजही, म्हणजेच "शोले" चे पन्नासावे वर्ष सुरु असतानाही उलटसुलट वाद आहेत!) आणि लोकप्रियता (भारतीय चित्रपट सृष्टीच्या चौफेर वाटचालीत एकाद्या चित्रपटाचा पन्नासाव्या वर्षातील विशेष खेळ हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केला जातो हे "शोले" बद्दल घडल्याचे मी स्वतः काही दिवसांपूर्वीच "रिगल" चित्रपटगृहात अनुभवले). यात कायमच चर्चेत असलेल्या चित्रपटाला आपण गाठू शकत नाही याचे भान

रिमेक करताना असू नये? असा "शोले" (जो पुन्हा होणे शक्यच नाही!) आणि नासिर हुसेन दिग्दर्शित "कारवाँ" (१९७१) यांची युती अथवा आघाडी करुन आणखीन एक चित्रपट पडद्यावर येवू शकतो? दोन अथवा तीन चित्रपटातील गोष्टी
एकत्र करुन आणखीन एक चित्रपट निर्माण करण्याला काही फिल्मवाले मारामारी म्हणतात. कधी ती जमूनही जाते...!

पण धर्मेश दर्शन दिग्दर्शित "मेला" (मुंबईत रिलीज ७ जानेवारी २०००!) मध्ये ते जमले नाही हो! "कारवाँ" आणि "शोले" यांचा "मसाला मिक्स" बिघडण्यास पंचवीस वर्ष पूर्ण झाली देखिल. विशेष उल्लेखनीय गोष्ट, चित्रपट निवडीबद्दल अतिशय चोखंदळ असलेल्या आमिर खानलाही या "मेला" चित्रपटात काम करावेसे का बरे वाटले? धर्मेश दर्शन दिग्दर्शित "राजा हिन्दुस्तानी" (१९९६) ज्युबिली हिट ठरला

**म्हणून त्याच दिग्दर्शकाच्या चित्रपटातून भूमिका साकारावी असा व्यावसायिक दृष्टिकोन की काय? ("राजा हिन्दुस्तानी" हा चित्रपट शशी कपूर व नंदा यांची भूमिका असलेल्या "जब जब फुल खिले"ची रिमेक होता! रिमेक चित्रपटातील आमिर खान हादेखील एक फंडा!)**

**अर्धा "कारवाँ" आणि अर्धा "शोले" मिळून 'मेला' चित्रपट ही कल्पनाच कशी सुचली! हेच समजत नाही! "कारवाँ" हा एका गावातून दुसऱ्या गावात जात असलेल्या नृत्याच्या कार्यक्रम मंडळींचा गीत संगीत व नृत्यमय प्रवास ('ट्रॅव्हल सिनेमा!') आणि त्यात नाट्य, प्रेम, रहस्यरंजकता. तर 'शोले' सूडकथा! त्यात मसालेदार मनोरंजक चित्रपटासाठीचा सर्व प्रकारचा मसाला खचाखच भरलेला. ("शोले" इतकं जगभरातील कोणत्याच चित्रपट कलाकृतीवर लिहिलं, बोलले गेले नसेल!)**

'मेला'ची कथा सुनील दर्शनची! या दोन चित्रपटांचा मेळ घालण्याचा त्यात प्रयत्न. पटकथा लेखन नीरज वोरा, संजीव दुग्गल व धर्मेश दर्शन यांची! त्यात एक नवा आकार देण्याचा प्रयत्न. तर संवाद नीरज वोरा आणि धर्मेश दर्शनचे. (संवादांमध्ये 'तेरी जात का बैदा मारू..' असे तद्दन 'चीप' संवाद सुद्धा आहेत!.. जे आमिरच्या तोडी खरंच शोभत नाहित! हे कुणीही सांगेल! हिंदीत "मेला" म्हणजेच मराठीत 'जत्रा' आणि याच जत्रेच्या पाश्र्वभूमीवर "शोले" घडतो, असा मिलावट करण्याचा प्रयत्न म्हणजे "मेला" चित्रपट! दोन सर्वकालीन "सुपर हिट" चित्रपट एकात मिसळले तर यशाची हमी निश्चित असे वाटले असेल, तर त्यात आश्चर्य ते काय? सगळ्यानाच हिट पिक्चर बनवायचा असतो... पण त्याचे हुकमी माप वा मेजरमेंट नाही. क्या समझे?

"मेला" चित्रपटाचे संगीतकार म्हणून "राजेश रोशन" यांना आधी करारबद्ध केले गेले होते. इतकेच नव्हे तर

**मुहूर्ताचे गाणे म्हणून "चोरी चोरी हम गोरीसे.." हे गाणे थाटामाटात रेकॉर्ड**
**झाले! यानंतर "कमरियां लचके रे.." रेकॉर्ड झाले!**
**नंतर.. धर्मेश दर्शन आणि राजेश रोशन यांच्यात काय बिनसले कुणास ठाऊक! यानंतर "अनू**
**मलिक" यांच्याकडे संगीताची जबाबदारी देण्यात**
**आली! त्यांनी सहा गाणी केली.**

**(माझ्या समवयस्क मित्राने सांगितल्या प्रमाणे "मेला" या चित्रपटातील गाण्याविषयी त्याच्याच शब्दात थेट सांगायचे तर.. या चित्रपटातील.. "धडकन में तुम.." या गाण्यात चक्क "प्रियकर" असलेला "आमिर खान" याने जो "मुद्राभिनय" केलाय, तसा कोणत्याही "प्रियकराच्या" चेहऱ्यावर मी आजवर तरी पाहिलेला नाहीय! आणि अभिनेता "इम्रान हाश्मी" याला "सिनेमा प्रेमी" आणि "मिडिया' यांनी "किसिंग स्टार!" अशी उपमा दिलीय.. यात**

अजिबात तथ्य नाहीय! खरेतर "आमिर खान" एकूणच, त्याच्या प्रत्येक चित्रपटात "किसिंग" सारखे "सीन्स" यासाठी अतिशय "आग्रही" असतो! "OMG"! या बाबतीत उदाहरणे द्यायची तर.. "मेला" आणि "थ्री इडियट्स" नक्की पहा! "मेला" सिनेमात.. "किसिंग"चे दृश्य द्यायचे, यासाठी "टिना" (अर्थात.. "ट्विंकल खन्ना") हिने हरकत घेतली होती. ती चक्क "अपमानित" आणि त्या "अचानक शूट" होणाऱ्या "सीन" बद्दल खूपच नाखुश होती! ती त्या जबरदस्तीबद्दल चक्क रडली सुद्धा होती, हे महत्त्वाचे! मुख्य म्हणजे हे सत्य आहे! थक्क व्हायला होतं! आणि हे "गॉसिप' नाहीय, हे जास्त वेदनादायक!)

धर्मेश दर्शन यांच्या हट्टापायी, संगीतकार "लेस्ली लुईस" यांच्याकडून "देखो २००० जमाना आ गया.." असे खास गाणे रेकॉर्ड करण्यात आले! (गायक : लेस्ली, हरिहरन) याच काळात एकीकडे "राजा हिंदुस्थानी"

जबरदस्त "हिट" झाला म्हणता.. "दिग्दर्शक धर्मेश दर्शन" अक्षरशः "हम करे सो कायदा!" टाईप.. "निर्मात्यांसाठी" डोईजड होऊ लागला, असल्याचे त्या कंपनीतील अनेकांनी सांगितले होते!

"मेला दिलोका.." या शीर्षक गीताचे वैशिष्ट्य हे की ते एकाच कॅमेऱ्याने एकाच "टेक" मध्ये शूट केल्याचे म्हणतात!

इथे खलनायक म्हणून आदित्य पांचोलीला विचारण्यात आले होते परंतु "वेशभूषा आणि केशरचना" यामुळे त्याने नम्रपणे नाकारले! ती भूमिका फायटर "टिनु वर्माने" साकारली. या चित्रपटाचे "बजेट" जबरदस्त फुगत गेले होते. पार्श्वसंगीतचे बजेट तर कित्येक लाखांचे होते!

"शोले" म्हटल्यावर गब्बरसिंग आलाच! "मेला" चित्रपटात गुज्जर सिंग होता. ती भूमिका टीनू वर्माने साकारलीय. वीरु व जय हवेत, ते किशन प्यारे (आमिर खान) व शंकर शाने (फैजल खान) झाले! "शोले"मध्ये

बसंती तर "कारवाँ" तील कबिल्यात दोन नृत्य तारका (आशा पारेख व अरुणा इराणी) "मेला" मध्ये हे फिट्ट करताना रुपा सिंग (ट्विंकल खन्ना) आणि विशेष भूमिकेत चंपाकली (खास भूमिकेत ऐश्वर्या राय!) "शोले"च्या या व्यक्तिरेखांना 'कारवाँ'च्या गोष्टीत बसवायची धडपड म्हणजेच 'मेला' चित्रपट! प्रयत्न अवघड होता. म्हणूनच चित्रपटात रंगत आली नाही. "अयूब खान" ने राम सिंग साकारलाय! मनोरंजनासाठी जॉनी लिव्हर (इन्स्पेक्टर पकौडा सिंग), नवनीत निशान (बुलबुल), तसेच कुलभूषण खरबंदा, असरानी, टिकू ताल्सानिया, अर्चना पुरणसिंग, तन्वी सिंग, विजू खोटे इत्यादी. चित्रपटातील दोन गाणी लोकप्रिय. "कमरिया लचके रे.." (अनुराधा पौडवाल, उदित नारायण, अभिजित भट्टाचार्य)! "मेला दिलो का.." (सोनू निगम, अलका याज्ञिक, रुपकुमार राठोड, हेमा सरदेसाई, शंकर महादेवन व जसपिंदर नरुला) ही गाणी समीरने

लिहिली असून संगीत "राजेश रोशन" आणि "अनू मलिक"चे आहे. हा चित्रपट पाहणे हे केवळ छायाचित्रणकार "राजन किनागी" यांच्यामुळे सुकर झाले. दोन वा तीन चित्रपटातील मध्यवर्ती कथासूत्रला एकत्र करण्याची कल्पना वाईट नाही. एक तर ती पेलायला हवी आणि दुसरे म्हणजे मूळ चित्रपटांचे अस्तित्व झाकता यायला हवे. तेच जर जमले नसले तर? खिचडी कच्चीच राहणार! आमटीत पाणी जास्त असणार!

२००० चा पहिल्याच शुक्रवारचा चित्रपट रसिकांसाठी निराशाजनक ठरला! चित्रपटाचे नाव "मेला" पण या शब्दाचा मराठीत अर्थ पाहता.. तो चक्क "मेला"! तेही आमिर खान या चित्रपटात असताना ठरलाय.... या चित्रपटाला चक्क पंचवीस वर्ष पूर्ण झाली देखिल! मुंबईत मेन थिएटर मेट्रोत फर्स्ट शोपासूनच पब्लिक रिपोर्ट नरम. मग काय होणार? चित्रपटाचे लोकप्रियता ओसरायला

**लागली. दोन गाणी मात्र उपग्रह वाहिन्यांवर दिसत राहिली...**

**हा "मेला" एन्जॉय करायला पब्लिकची जत्रा भरली नाही!**

**© दिलीप ठाकूर**
**(कलाकृती मिडिया)**
**♥**

# लेख क्र. ६१

## 'हिट'च्या 'ट्रॉफिज' या 'शान' असत...!



अशोक सराफ व निवेदिता यांच्या अंधेरीतील घरी जाण्याचा योग कायमच सुखावह असतोच पण त्याबरोबरच त्यांच्या घरी असलेले 'पुरस्कार' लक्षवेधक ठरतात. ते त्यांनीं आपली गुणवत्ता, मेहनत, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन यातून मिळवले आहेत. अशोक सराफना राज्य सरकारने 'महाराष्ट्र भूषण' या पुरस्काराने, भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले!  कोल्हापूर येथे केशवराव भोसले स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात

आले. 'झी चोवीस तास' या वृत्तवाहिनीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'जीवन गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले. हा सोहळा अतिशय उत्तम रितीने रंगला! अशोक सराफ यांचा त्यांच्या पंचावन्न वर्षांच्या अष्टपैलू बहुरुपी वाटचालीत राजा चित्रपट महोत्सवात अनेकदा तरी सर्वोत्तम अभिनयासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, राज्यातील अनेक मान्यवर संस्थेच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आणि असे अनेक मानाचे 'पुरस्कार' त्यांच्या घरात प्रवेश करताच आपले स्वागत करतात. निवेदिता सराफ यांनीही आपल्या यशस्वी वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त केले. ते पुरस्कार देखील लक्ष वेधून घेतात. अशा पध्दतीने आपल्या पुरस्कारांची मांडणी करणे म्हणजे त्या पुरस्कारांचा आदर करणे असे देखील आहे.

आणखीन एक गोष्ट सांगतो! राजेश खन्ना 'चित्रपटाच्या सेटवर' मुलाखत देण्यापेक्षा खारच्या आपल्या 'आशीर्वाद फिल्म'च्या अतिशय प्रशस्त चकाचक ऑफिसमध्ये आम्हा सिनेपत्रकारांना अगदी सवडीने आणि एका दिवशी एकाच पत्रकाराला स्वतंत्रपणे आणि सविस्तर मुलाखत देणे पसंत करे. छान अनुभव असे! स्वारीचा मूड चांगला हवा इतकेच. ("कुछ भी पुछो.." हे त्याचं स्वातंत्र्य जास्त भारी होतं). पण व्हायचं काय? त्याच्यापेक्षा त्याच्या उबदार खुर्चीमागे असलेल्या सिल्व्हर वा गोल्डन ज्युबिली ट्रॉफिजकडे जास्त लक्ष जायचं. बरं त्याचे इतके पिक्चर्स सुपर हिट की त्या ट्रॉफिजच त्याचं यश सांगत होत्या! 'बंधन', 'आराधना', 'आनंद', 'दो रास्ते', 'इत्तफाक', 'सफर', 'अमर प्रेम', 'कटी पतंग', 'हाथी मेरे साथी', 'आन मिलो सजना', 'मर्यादा', 'आप की कसम', 'सच्चा झूठा', 'प्रेम नगर', 'दुश्मन', 'दाग', 'रोटी', 'अजनबी', 'नमक हराम' अशा

अनेक चित्रपटाच्या यशाच्या ट्रॉफी राजेश खन्नाचे 'सुपर स्टार' वैभव सांगत होत्या. 'आनंद' चित्रपटा साठीचा 'फिल्म फेअर' पुरस्कार लक्षवेधक होता. स्मृती चिन्ह बोलतात असे म्हटले तरी चालेल. यशाची ती वैशिष्ट्यपूर्ण आठवण असते!

सुलोचनादीदींच्या घरीही अशाच अनेक मराठी व हिंदी चित्रपटांच्या यशाच्या ज्युबिली ट्रॉफिज लक्ष वेधून घेणार हे ठरलेलेच! त्या मांडणीतील आत्मियता मला कायमच जाणवे. त्यांनी अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा साकारल्यात हेही त्यात अधोरेखित होई! कलाकाराचे घर असावे तर असे! असं कायमच मला वाटतं आलं! सुलोचनादीदींशी त्या स्मृती चिन्हाच्या सहवासात गप्पा रंगणार हा अनुभव लिहितांना वेगळाच आनंद मिळे. एखाद्या कलाकाराचे घर असावे तर असे हे मनात यायलाच हवे!

आमच्या गिरगावातील जुन्या 'रॉक्सी' थिएटर मध्ये अनेकदा पिक्चर पाह्यला जाणे होई. तेव्हा लॉबी कार्ड्स, शो कार्ड्सबरोबरच एका शोकेसमधील ज्युबिली हिट ट्रॉफिज बघण्यात विशेष आनंद होई. खरं तर प्रत्येक वेळी त्याच त्याच अथवा त्यात आणखीन एकादी नवीन भर पडे इतकेच. पण पुन्हा पाहण्यातही गंमत असे. 'एक फूल दो माली', 'आराधना', 'अमर प्रेम', 'कटी पतंग', 'कुंवारा बाप', 'स्वर्ग नरक', 'एक दुजे के लिए' यांच्या ज्युबिली हिट ट्रॉफिज असत... 'प्लाझा' चित्रपटगृहातही अनेक मराठी चित्रपटांची स्मृतीचिन्ह पाह्यला मिळतात. विशेषतः 'अशी ही बनवाबनवी', 'गंमत जंमत', 'आत्मविश्वास', 'हमाल! दे धमाल', 'धडाकेबाज', 'थरथराट' या चित्रपटांची स्मृतीचिन्ह वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती पाहत असतानाच मला 'प्लाझा' चित्रपटगृहातील 'अशी ही बनवाबनवी', 'धडाकेबाज' यांचे दिलखुलास, उत्साही प्रीमियर खेळही आठवतात! 'प्लाझा'

चित्रपटगृहाच्या बाल्कनीत चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ व आम्ही चित्रपट समीक्षक एकत्र असू आणि खाली स्टॉल, अप्पर स्टॉल येथे चित्रपट पाहण्यासाठी झालेली जनसामान्य प्रेक्षकांची हाऊसफुल्ल गर्दी असे. त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून हा चित्रपट रसिकांना आवडतोय, तो नक्कीच सुपरहिट ठरणार आणि प्लाझ्मा चित्रपटगृहात यशाची आणखी एक ट्रॉफी येणार याची जणू खात्रीच पटे. आणि तो विश्वास खराच ठरे. चित्रपटांचे प्रीमियर असे जनसामान्यांसोबत व्हावेत असे म्हणूनच मनोमन वाटते.

'राजकमल कलामंदिर स्टुडिओ'त आजही राजकमल फिल्मच्या 'दो आंखे बारह हाथ', 'झनक झनक पायल बाजे', 'नवरंग', 'पिंजरा' यांच्या ज्युबिलीसह राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, राज्य चित्रपट पुरस्कार लक्ष वेधून घेतात. ते एक प्रकारचे वैभव आहे! इतिहास आहे! आठवणी आहेत!

चित्रपट स्टुडिओ, रेकॉर्डिंग स्टुडिओ, निर्माता व दिग्दर्शकांची कार्यालये, कलाकारांची घरे, एकाद्या तंत्रज्ञाचे घर, तेव्हाची पारंपरिक सिंगल स्क्रीन थिएटर्स यात अशा अनेक ट्रॉफिज पाह्यला मिळत. तो एक वेगळाच आनंद असे. तीदेखील एक छान संस्कृतीच. 'पिक्चर' हिट झाले रे झाले एक 'ट्रॉफिज' आपल्याकडे येणार याची  खात्री असे. आणि त्याचा सोहळाही छान रंगे. यशाचे सेलिब्रेशन करावे ते फिल्मवाल्यांनी!

माझ्या आठवणीत मी अनुभवलेले असे अनेक ज्युबिली हिट ट्रॉफिज देण्याचे इव्हेन्टस आहेत! दादा कोंडके यांनी जितेंद्रच्या शुभ हस्ते 'पळवापळवी'च्या 'सिल्व्हर ज्युबिली हिट ट्रॉफिजचे' दिलखुलास वितरण केले. कौतुकाची गोष्ट अशी, दादांनी या इव्हेन्टसला अशोक सराफ, सचिन पिळगावकर व महेश कोठारे यांनाही

आवर्जून आमंत्रित केले. नेमका त्या दिवसांत लक्ष्मीकांत बेर्डे कोल्हापूरला होता. अन्यथा त्या काळातील 'टॉप फाईव्ह ' एकाच सोहळ्यात असा मराठी चित्रपटसृष्टीतील अतिशय दुर्मिळ योग आल्याचे आणि भेटीचा योग आला असता.

जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये किरण शांताराम निर्मित व सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'अशी ही बनवाबनवी'च्या गोल्डन ज्युबिली हिटच्या ट्रॉफिज चित्रपती व्ही. शांताराम आणि दिलीपकुमार यांच्या शुभ हस्ते देण्यात आल्या, तेव्हा व्ही. शांताराम व दिलीपकुमार यांना एकत्र पाहणे, ऐकणे, अनुभवणे, डोळ्यात साचवणे हा आयुष्यभर जपून ठेवावा असाच क्षण ठरला! चित्रपटाची यशोगाथा अशीही पुढे वाटचाल करत असते. अशी ही बनवाबनवी आजही चालणारे हुकमी नाणे आहे. जुहू येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये सुवर्ण महोत्सवी सोहळा अतिशय उत्तम रंगला हे आठवतेय!

सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'एकापेक्षा एक'च्या ज्युबिली हिट सोहळ्यास निर्माते सतिश कुलकर्णी यांनी खास अमिताभ बच्चनलाच आमंत्रित करण्यात यश प्राप्त केले! अमिताभची ही मराठीतील पहिली उपस्थिती! आदबशीर अशी शाल लपेटून अमिताभ आला होता. मला आठवतय त्याच दिवशी त्याची भूमिका असलेला मुकुल आनंद दिग्दर्शित 'हम' प्रदर्शित झाला. अमिताभच्या येण्याने 'एकापेक्षा एक 'च्या यशाची उंची आणखीन वाढली. जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हा शानदार सोहळ्यात प्रसन्न वातावरण होते. मी ते अनुभवले आहे.

विजय कोंडके निर्मित व दिग्दर्शित 'माहेरची साडी' ची सक्सेस पार्टी अंधेरीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये उशीरापर्यंत रंगली. खासदार सुनील दत्त पाहुणे होते. तर विजय कोंडके यांनी आवर्जून हिंदी चित्रपटसृष्टीतील जी. पी. सिप्पी, शक्ती सामंता अशा अनेक बड्या हस्तींना बोलावून

मराठीचं वैभव त्यांना दाखवले! नाझ चित्रपटगृह इमारतीमधील अनेक वितरकांची कार्यालयात व मराठी चित्रपटसृष्टीत या पार्टीची बरेच दिवस रंगतदार चर्चा होती. अलका आठल्येच्या घरी अनेक ट्रॉफीज आहेत हे सांगायला नकोच. त्यात माहेरची साडीची ट्रॉफी विशेष लक्ष वेधून घेते. (तो 'यू-ट्यूब' वर नाही!)

एन. चंद्रा दिग्दर्शित 'प्रतिघात'च्या ज्युबिली हिट पार्टीचे राजश्री प्रॉडक्शन्सच्या वतीने आयोजन गेट वे ऑफ इंडियाजवळील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये करताना 'ओली पार्टी' न करता फक्त ट्रॉफिज वाटप आणि शाकाहारी मेन्यू असा ठेवल्याची बरेच दिवस 'सुकी सुकी' चर्चा रंगली. हे वेगळेपण म्हणता येईल. ज्युबिली हिटची पार्टी म्हणजे शॅम्पेन स्कॉचच हवी असे थोडेच आहे? ती असेल तर क्या बात है! रात्री उशिरापर्यंत ओली पार्टी नवे गॉसिप. अनेक किस्से!

गुलशन रॉय हे त्या काळातील चित्रपट निर्मिती (त्रिमूर्ती फिल्म) आणि वितरण (मॉडर्न मुव्हीज) यातील मोठे प्रस्थ. त्यांनी आपला पुत्र राजीव रॉय दिग्दर्शित 'त्रिदेव'च्या यशाची केम्प्स- कॉर्नरच्या हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या पार्टीला

पिक्चरमधील सगळ्या स्टार कास्टने हे यश

भारीच एन्जॉय केले. पिक्चर ज्युबिली झाले की

आता पार्टी हमखास हे समीकरण त्या काळात एकदम हिट होते. आणि तो सगळाच आँखो देखा हाल माझ्यासाठी सुखद पर्वणीच ठरला! तेवढ्या आठवणींची साठवणी माझ्याकडे वाढत वाढत गेली, त्याचं व्याज आज मला मिळतयं. त्या लाईव्ह आठवणी आज मी नवीन पिढीसमोर आणतोय! 'पिक्चर आजही सुपर हिट होताहेत. शंभर दोनशे कोटी सहज जमतात असे यशाच्या बातम्यात असते. आकडा वाढतही जातो!

पण ते ज्युबिलीचे दिवस इतिहासजमा झालेत. जास्तीत जास्त चार सहा आठवडे हिटचा मुक्काम. पण 'हिटची ट्रॉफिज 'ही आठवणीत गेली! हेही ठीक हो, पण अनेकदा हिटच्या ओल्या पार्टीत फक्त आणि फक्त त्या चित्रपटातील वरच्या अथवा पहिल्या फळीतीलच आमंत्रित असं का? चित्रपट निर्मिती हे भलं मोठ टीमवर्क आहे. पूर्वी अशा इव्हेन्टसमध्ये अनेक टेक्निशियन्स आणि मुंबईसह बाहेरगावच्या थिएटरवाल्यानाही ट्रॉफिज आवर्जून प्रेमाने ट्रॉफिज दिली जाई आणि त्यांचा चित्रपटाच्या यशातील सहभाग मोलाचा मानला जाई.. 'अशी ही बनवाबनवी'च्या सुपर हिटची रंगभूषाकार मोहन पाठारे याला 'स्मृती चिन्ह'




स्वीकारल्याचा आनंद आजही तो व्यक्त करतोय. हीच

आपल्या कामावरची निष्ठा असते. असे अनेक रंगभूषाकार, कला दिग्दर्शक, वेशभूषाकार या मनोरंजन क्षेत्रात आहेत. जे अनुभवतोय तेच सांगतोय हो. प्रत्येक पिक्चर हिट व्हायला हवा. त्याच्या आनंद सोहळ्यात सर्वांनाच सहभागी करता यायला हवे. बघा पटतंय का?, प्रत्येक स्मृती चिन्ह केवळ एक आठवण नसते तर ती एक भावनिक ओढ असते. आपण केलेल्या प्रगतीचा चढता आलेख असतो. तो प्रचंड उर्जा देतो. मनोमन सुखावतो. एक ट्रॉफी एक आठवण असते. मग ती गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार"ची शंभर आठवडे पूर्ण झाल्याची असेल तर चित्रपट रसिक आठवणीत जातात, चित्रपटाच्या यशात प्रेक्षकांचाही उत्स्फूर्त सहभाग असतोच...!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

# लेख क्र. ६२

## सिनेमाच जेव्हा "वेळेचा खेळ" बदलवतो..!




आजच्या 'ग्लोबल' युगातील 'डिजिटल पिढीतील'! काही चित्रपट रसिकांनी मला 'व्हॉटसअपवर' एक प्रश्न पाठवला, "शोले" तब्बल एकवीस रिळांचा, आजच्या भाषेत तीन तास अडतीस मिनिटांचा होता, तर मग त्याच्या खेळाच्या वेळा काय होत्या?"

हां यार! त्याचा तो मॅसेज वाचताच माझं मन भूतकाळात गेलं...!

१. "संगम" १९६४ (३ तास ४० मिनिटे)

२. "मेरा नाम जोकर" १९७० (४ तास १६ मिनिटे)

३. "लगान" २००१ (३ तास ५३ मिनिटे)

४. "Loc कारगिल" २००३ (४ तास १५ मिनिटे)

५. "खतरनाक"  १९९० (३ तास ४३ मिनिटे)

६. "जोधा अकबर" २००८ (३ तास ३४ मिनिटे)

७. "शोले" १९७५ (३ तास ३८ मिनिटे)

आणि "धुरंधर" (३ तास ३४ मिनिटे व ४ तास)

("लिंक" वर "क्लिक" करा. आस्वाद घ्या!)

प्रश्न खरंच महत्वाचा! त्यातही आजच्या 'मल्टीप्लेक्स' युगात सकाळी साडेआठ नऊ ते रात्री साडेअकराचा मिडनाईट मॅटीनी शो असे खेळ असतात नि काही मुव्हीज शंभर मिनिटांच्या असतात त्यात तर हा प्रश्न खूपच महत्वाचा. पूर्वी चित्रपटाच्या वेळेचे गणित पक्के असे. दक्षिण मुंबईतील चित्रपटगृहात सकाळी साडेअकरा वाजता मॅटीनी शो (जुने चित्रपट प्रदर्शित करण्याच्या या प्रथेत मग नवीन चित्रपट

प्रदर्शित होऊ लागले. पण मॅटीनी शोची इमेज व वैशिष्ट्य कायम राहिली!) व दिवसा तीन, सहा व नऊ असे तीन खेळ. चित्रपट मोठा असेल तर वेळ मागेपुढे होई. श्याम बेनेगल, बासू भट्टाचार्य वा बासू चटर्जी दिग्दर्शित चित्रपट चौदा रिळांचे असत. आणि त्यांचे अनेक चित्रपट मॅटीनीलाच प्रदर्शित होत. दिवसा तीन खेळ असतील तर साडेतीन, साडेसहा व साडेनऊ अशी वेळ असे. दिग्दर्शक मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा यांना आपण पब्लिकला भरपेट, भरगच्च मसालेदार मनोरंजक चित्रपट देण्याची हौस मौज, त्यांचे पिक्चर अठरा रिळांचे असत. सेन्सॉर सर्टिफिकेटवर ते वाचताच पब्लिकमधून हमखास टाळी येई. जणू नेहमीच्याच तिकीटावर जास्त पिक्चर पाह्यला मिळणार. त्या मनोरंजक चित्रपटाची वेळ दुपारी अडीच, सहा व नऊ अशी साधारण असे. उपनगरातील चित्रपटगृहात कायमच बारा,

**तीन, सहा, नऊ अशी हुकमी वेळ असे. याच नावाचे मराठीत पुस्तक देखील प्रकाशित झाले आहे!**

**"शोले" च्या वेळेस मिनर्व्हात दीड, साडेपाच व रात्री नऊ वाजून वीस मिनिटे अशी होती. सुरुवातीस ती अडनीळी वाटे. मात्र पिक्चर हिट होताच ती माहितीची झाली!**

**आपली 'सिनेमा प्रेक्षक संस्कृती' खूप जगावेगळी आहे असे मी कायमच अभिमानाने सांगतो. आपल्याला आपल्याकडे अनेक प्रादेशिक भाषेत आणि हिंदीत निर्माण होत असलेल्या चित्रपटाचे विशेष कौतुक हवेच. कारण ते आपल्याकडील बहुसांस्कृतिक, सामाजिक, बदलत्या माध्यम व वातावरणातून वाटचाल करतेय!**

**आता हेच बघा ना, तुम्ही पूर्वी एकाद्या तालुक्याच्या ठिकाणच्या अथवा अगदी गावातल्या सिनेमा थेटरात रात्रीचा शो पाह्यला गेला असाल तर तुमची एक आठवण**

नक्कीच असेल, सिनेमाचा क्लायमॅक्स (अर्थात शेवट) जस जसा शेवट येत असतानाच एक लक्ष असे की, सिनेमा संपल्यावर घरी जायला 'टमटम' (सहा सीटची रिक्षा) मिळेल काय? स्वत:ची सायकल अथवा स्कूटर असेल तर असा प्रश्न पडत नसे. पण तसे नसेल तर? याच गोष्टीला 'दुसरी बाजू'ही आहेच. ती म्हणजे, प्रेक्षकांची गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामीण भागातील थेटरवाले रात्रीचा खेळ बारापूर्वीच संपेल याची काळजी घेत. आणि समजा, चित्रपटच त्यापेक्षाही जास्त लांबीचा असेल तर? तर ते बिनदिक्कतपणे 'आपल्या अधिकारात' त्यातील काही भाग चक्क कापत. त्यांची चित्रपट संकलन कला जगावेगळी! पण चित्रपट वेळेवर संपवायला हवी अशी! आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील हाही एक अजब फंडा.

आमिर खान निर्मित आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' (२००१) ला आपण अशीच कात्री लावली

आणि रात्री बारा वाजता 'शेवटचा खेळ' संपेल हे पाहिले. इतकेच नव्हे तर या पिक्चरच्या एकूणच लांबीमुळे माझ्या टॉकीजमध्ये दिवसा चार शो बसत नव्हते, पण आम्हीच काही दृश्ये कापल्याने ते शक्य झाले असे चक्क असाच एक ग्रामीण भागातील थेटरवाला त्या काळात 'नाझ' चित्रपटगृहाच्या इमारतीतील एका वितरकाच्या कार्यालयात मला भेटला असता 'जणू काही यात आश्चर्य वाटण्याजोगे' काहीच नाही अशा पध्दतीने माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्याकडे दुर्लक्ष करीत मला सांगत होता आणि आपल्याकडील 'थेयटर संस्कृती'चा आणखीन एक झक्कास प्रत्यय आला. गोष्ट छोटी वाटते, पण महत्त्वाची आहे.

असे काही ऐकले की, माझे कुतूहल वाढते. आणि मग काही गोष्टी जाणून घ्याव्याश्या वाटतात. मग समजले की ती दीर्घकालीन परंपराच आहे. नेहमीपेक्षा जास्त लांबीचे

चित्रपट हे शहरातील थेयटर संस्कृतीत ठीक आहे, पण शहरापासून जेवढे दूर दूर जात राहू तर 'त्याच चित्रपटाची लांबी कमी कमी होत जाते'. कारण, शोची दिवसा चार खेळ आणि वेळ सांभाळायची असते. भले इकडे मोठमोठ्या परिसंवादात, इव्हेन्टसमध्ये चित्रपटाच्या आशय, बदलते तंत्रज्ञान, वितरण, मार्केटिंग, पूर्वप्रसिध्दी, बजेट यावर भली मोठी गंभीर चर्चा होत असेल. दूरवरच्या प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचण्याचे जग वेगळे. मल्टीप्लेक्स व डिजिटल युगापूर्वीची आपल्या देशातील चित्रपटाच्या खेळाची हुकमी वेळ काय होती हे मी सुरुवातीलाच सांगितले. मी तीनच्या शोला जातोय, मी लास्ट शो पाह्यला असे बोलण्याची सामाजिक सांस्कृतिक परंपराच होती. एकाद्या थिएटरमध्ये एकच चित्रपट चारही खेळासाठी असेल तर 'दिवसा चार खेळ' असे एवढेच दिले जाई. आणि समजा, हीच वेळेची चौकट जेव्हा मोडली जाई?

राज कपूर अभिनित, निर्मित व दिग्दर्शित ['संगम'](#) (१९६४)ची लांबी फारच आहे आणि म्हणूनच त्याला दोन मध्यंतर आहेत असे 'संगम'च्या पूर्वप्रसिध्दीतच स्पष्ट दिसू लागताच त्याच्या शोच्या वेळा कशा बरे असतील, याबाबत कुतूहल निर्माण झाले होते आणि मग त्याच्या रिलीजच्या वेळी समजले की, दक्षिण मुंबईतील अप्सरा थिएटरचे उदघाटन 'संगम'ने होत असून शोच्या वेळा आहेत, दहा, दुपारी साडेतीन आणि रात्री आठ वाजता. सिनेमा चार तासांचा असल्याने या वेळा अगदी स्वाभाविक होत्याच. भायखळ्याच्या जयहिंद टॉकीजमध्ये दिवसा चार खेळ अशी प्रथा असल्याने तेथे 'संगम'साठी वेळा होत्या, सकाळी पावणेआठ, दुपारी बारा वाजता, मग सव्वाचार वाजता आणि रात्री नऊ वाजता. आणि एकदा हे वेळेचे गणित समजले, पिक्चर पब्लिकला आवडला आणि मग 'संगम' पाह्यला जाण्याची वेळ पब्लिकच्या माईंडमध्ये सेट झाली.

यश बरेच काही घडवते ते हे असेही. आणि यशाच्या गोष्टीत फार रंजकताही असते.

अशा मोठ्या लांबीच्या चित्रपटाबाबत असे नेहमीच घडते. सहज उदाहरण म्हणून ही बघा, 'सूरज', मेन थिएटर 'नॉव्हेल्टी'त दुपारी दोन, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री साडेनऊ, बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'दास्तान', नॉव्हेल्टीत पावणेदोन, साडेपाच आणि नऊ, तर 'रेक्स' आणि 'लोटस'मध्ये सकाळी साडेदहा, दुपारी दोन वाजता, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री नऊ वाजता. असे दिवसा चार खेळ. राज कपूर दिग्दर्शित 'बॉबी'! मेट्रोत दुपारी सव्वादोन, सायंकाळी पावणेसहा आणि रात्री सव्वानऊ. प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'मुक्कदर का सिकंदर' 'अलंकार'ला दोन, पावणेसहा आणि सव्वानऊ. रिचर्ड ॲटनबरो दिग्दर्शित 'गांधी' रिगलमध्ये इंग्रजीत बारा, सव्वाचार आणि साडेआठ वाजता. तीनच खेळ. तर हिंदीत

प्लाझा थिएटरमध्ये सकाळी दहा, दुपारी पावणेदोन, संध्याकाळी साडेपाच आणि रात्री सव्वानऊ.

यावरुन तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेलच की, वीसपेक्षा जास्त रिळाच्या चित्रपटाच्या खेळाच्या वेळा या अशा नेहमीची चौकट मोडणाऱ्या असत. राज कपूर दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान', सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान', करण जोहर दिग्दर्शित 'कभी खुशी कभी गम' या चित्रपटाच्या वेळीही शोची वेळेची खेळी अशीच होती. 'मेरा नाम जोकर' तर दोन मध्यंतरसह पडद्यावर आला (१८ डिसेंबर १९७०) आणि त्याच्या वेळा त्यानुसार होत्या. पण फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच 'जोकर पडला पडला' अशी हाकाटी दिल्याने तो बराचसा कापून एका मध्यंतरचा करण्यात आला. आणि मॅटीनी शो,

रिपीट रनला कायमच गर्दीत चालला! (सर्व लिंक्स नक्की पहा.)

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल पण त्या काळात अशा पध्दतीने 'सिनेमाच्या शोची वेळ' नेहमीपेक्षा वेगळी असेल तर आपल्याला जास्त मोठा चित्रपट पाह्यचाय अशी एक प्रकारची मानसिकता तयार होई आणि अशी काय बरे 'थीम' असेल, असे आपल्याला काय काय बरे पाह्यला मिळतेय याबाबत उत्सुकता वाढे! एक प्रकारे ते गरजेही असते. ते दिवसच वेगळे होते. 'शो'ची वेळ हा अनेक लहान मोठ्या गोष्टीना जन्म देणारी असे. त्यात पुन्हा दुपारचा खेळ दोन वाजता असेल तर आपोआपच मॅटीनी शोची वेळ अकराची करावी लागे. या सगळ्यात काय व्हायचे माहित्येय? मॅटीनी शो साडेअकराचा, पहिला खेळ तीनचा, दुसरा सहाचा आणि रात्रीचा साडेनऊचा असे सरावाचे टाईम टेबल पक्के असणारे रसिक प्रेक्षकांची अनेकदा तरी चित्रपटाची

सुरुवातच चुकत असे अथवा त्याना हा चित्रपट नंतर बघू असा तात्काळ निर्णय घेत अन्य थिएटरवर जावे लागत असे. चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चानी'च्या जाहिरातीत अगदी ठळकपणे दिले होते, 'वेळेपूर्वी या, अगोदर आलेल्यांना डिस्टर्ब करु नका'. इरॉसमध्ये या चित्रपटासाठी शोची वेळ होती, साडेबारा, साडेतीन, साडेसहा आणि साडेनऊ.

अशा या चित्रपटाच्या खेळाची वेळ या संस्कृतीत 'मेरी आवाज सुनो'च्या वेळी नियमित



शोमध्ये भर पडली! एका दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक असलेल्या या चित्रपटात प्रचंड हिंसा असल्याच्या कारणास्तव त्यावर बंदी येणार अशा बातमीने वादळ निर्माण केले आणि याचाच व्यावसायिक फायदा उठविण्यासाठी या चित्रपटाचे शो वाढवताना सकाळी नऊचा 'जादा खेळ' लावला गेला. मी स्वतः मिनर्व्हात असा सकाळी नऊ वाजताच्या शोला गेलो. बंदी आलीच तर पाह्यचा राहून जाईल याची भीती वाटत होती हो. आणि मग मी हा चित्रपट पाह्यलाय असा भाव खात गिरगावात फिरलो!

मध्य आणि उत्तर भारतातील अनेक छोट्या शहरात अनेक मोठ्या चित्रपटांचे राऊंड शो होत. ते रुजलेच होते. विशेषतः फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट भारी आला रे आला थिएटरवर गर्दी उसळे आणि कुठे जमलचं तर रात्री बाराचाही  अथवा सकाळी सहा वाजल्यापासून शो सुरु.

कधी एकदा हा सुपर हिट पिक्चर पाहतोय अशी जबरा वातावरण निर्मिती व्हायची. आपल्या देशात चित्रपट फक्त पडद्यावर राहत नाहीत याचाच हा सज्जड पुरावाच जणू. विजय कोंडके निर्मित व दिग्दर्शित 'माहेरची साडी'च्या बाबतीतही पश्चिम




महाराष्ट्रातील काही ठिकाणी हेच घडले. एक शो संपतोय तोच पुढचा असा फंडा आणि अशा क्रेझच्या चौकटीतील बातम्या सिनेमाला आणखीन चर्चेत ठेवत. आणि ते योग्यच असते. पिक्चर रिलीज झाल्यावर त्याची जास्त जोरशोरसे प्रसिध्दी व्हायला हवी हे सर्वकालीन सत्य आजची चित्रपटसृष्टी जवळपास विसरलीय. चित्रपट प्रदर्शित झाला

एवढेच पुरेसे नसते., हे जुन्या काळातील फिल्मवाल्यांना चांगलेच समजलेले

मल्टीप्लेक्स युगात सकाळपासूनच शो सुरु होतात आणि रात्री उशीरापर्यंत असतात. पण त्यातले फर्स्ट शो फर्स्ट शोचे वातावरण, त्यातले थ्रील आणि शोच्या वेळेतील धक्के हे सगळेच हरवलेय. कोणत्याही वेळेचा शो पाहिला तरी काय फरक पडतोय अशा गोष्टीपर्यंत येऊन पोहचलोय. मल्टीप्लेक्सबाहेर कायमच शुकशुकाट दिसतो. थेयटरभोवतीची गर्दी ही गोष्ट सोशल मिडियात तेव्हाचे फोटो पाहताना दिसतेय.

सिनेमाची वेळ काय होती आणि आता काय वेळ आली असे तर नव्हे ना? फिल्मवाल्यांच्या भाषेत सांगायचे तर पिक्चर हिट असेल तर बोलणार 'टाईम अच्छा चल रहा है' आणि पिक्चरला पब्लिकने नाकारले तर त्यांचे ठरलेले

असते, बुरा टाईम चल रहा है..... असे काहीही असले तरी कोणावर कशी वेळ आणायची हे पब्लिकच्या हातात असते.

"शोले" पब्लिकने असा व इतका डोक्यात व डोक्यावर घेतला की त्याची कायमच चलतीची वेळ राहिली. मनोरंजक उपग्रह वाहिनी, 'यू ट्यूब' व 'ओटीटी' यावर कोणत्याही वेळी चित्रपट रसिक शोले पुन्हा पुन्हा पाहण्यास उत्सुक आहेत हे यश तर कशातही मोजता न येणारे...!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ६३

# 'मुगल ए आझम', 'दीवार', 'शोले', 'क्रांतीवीर' 'डायलॉगला' टाळ्या शिट्ट्या...!




चित्रपट पाहता पाहता तो ऐकण्यातही भारतीय चित्रपट रसिकांना कायमच रस!

१९७५ च्या उत्तरार्धातील ही गोष्ट ऐका!

अनेक ठिकाणी एकाद्या सणासुदीला अथवा काहीही कारण नसतानाही 'लाऊडस्पीकर' लागलाय वा मोठ्याच आवाजात 'टेपरेकॉर्डर' लावलाय....

'इसलीये के लोहा लोहे को काटता है...'

'यहाँ से पचास पचास कोस दूर गाव में जब बच्चा रोता है तो मा कहती हैं बेटे सोजा .....सोजा नहीं तो गब्बरसिंग आ जाएगा...'

'देखो छमिया,जादा नखरे मत करो, नही तो ये गोरी चमडी है नं, सारे बदन से खुरज खुरज कर उतार दूंगा, समझी?..'

'बहुत याराना लगता है...!'

जसजसे 'डायलॉग' पुढे जातात तसतशी ते ऐकायला गर्दी वाढत वाढत जाते! सगळे आजूबाजूचे वातावरण विसरुन हा प्रत्येक 'डायलॉग' मनापासून ऐकतोय. बरं हे कालपरवाही त्याने ऐकलयं आणि उद्या परवा आणि त्यानंतरही ते हे धारदार संवाद ऐकणार आहेत...'

एव्हाना तुमच्या लक्षात आले असेलच की रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५) चे हे जबरा 'डायलॉग' आहेत. या चित्रपटाच्या खणखणीत यशात अनेक लहान मोठ्या

गोष्टींसह सलिम जावेद यांचे धारदार संवाद, ते सादर करण्यातील प्रत्येक व्यक्तीरेखेतील कलाकाराची पध्दत आणि खास करुन 'मिनर्व्हा' थिएटरमधील 'सत्तर एमएमचा भव्य  पडदा आणि स्टिरिओफोनिक साऊंड'चा यांचा वाटा होता. आणि लाऊडस्पीकर अथवा कॅसेटवर एकेक डायलॉग ऐकताना गब्बरसिंग वगैरे डोळ्यासमोर येत...पिक्चर असाही दिसतो, असाही आपल्यापर्यंत पोहचतो!

पिक्चर पब्लिकला आवडला आणि मग त्याचे 'डायलॉग' असे काही सुपर हिट ठरले की त्याची तबकडी प्रकाशित करण्यात आली. आणि त्याचीही विक्रमी विक्री झाली. पिक्चर 'सुपर हिट' झाले की त्याला कोणीच थांबवू शकत नाहीत ते हे असे!

हिंदी चित्रपटातील 'डायलॉग' गाजण्याची परंपरा तशी खूपच मोठी. (इतकी की "बुजुर्ग" सिनेपत्रकार" अनेक जुन्या सिनेमातल्या "डायलॉग्ज" बद्दल आवडीने सांगत.)

कालांतराने दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत डब होऊन पडद्यावर आले तेव्हाही ते गाजू लागले...

'पुष्पा'चा झुकेगा नहीं साला!.. राजकारणा पासून इव्हेन्टसपर्यंत आणि जाहिरातीपासून रिॲलिटी शोपर्यंत सगळीकडे गाजला!

चित्रपट हे दृश्य माध्यम असले, 'कॅमेरा' आपल्याला चित्रपट दाखवत असला  तरी आपल्या देशात ते प्रामुख्याने 'संवाद माध्यम' म्हणून जणू विकसित होत गेले. चित्रपट पाहताना ते जास्त ऐकला जातो असे म्हणता येईल.

नाटक माध्यमातून चित्रपट माध्यमात असा प्रवास असल्याने सुरुवातीच्या काळातील अनेक चित्रपट जणू नाटक चित्रीत केले आहे असे वाटतात. आणि त्या काळात संवादही लांबलचक असत. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्तिरेखा बोलेल त्याप्रमाणे 'चित्रपटाची गोष्ट' प्रेक्षकांना

समजेल अशी भावना होती आणि ती त्या काळाशी सुसंगत होती!

पूर्वी म्हणूनच अनेक कलाकारांचे संवाद रसिकांना आवडत, ते पाठ केले जात, ते ऐकण्यासाठी पुन्हा एकदा सिनेमा थिएटरची वारी केली जाई. राज कपूर, दिलीप कुमार आणि देव आनंद यांच्या दिसण्या बोलण्यावर त्यांचे चाहते फिदा होते. 'सोहराब मोदी' यांचे केवळ संवाद ऐकण्यासाठी अगदी दृष्टीहीन प्रेक्षकही 'पुकार' चित्रपट पाह्यला जात! "जेलर" (१९५८)! यात "हम प्यार में जलनेवालोंको.." असे सर्वांगसुंदर "गाणे" असूनही, प्रेक्षक वाखाणणी करत ते "सोहराब" यांच्या संवादांची.)



याची पूर्वी नेहमीच चर्चा व्हायची. याबाबत कथा दंतकथा प्रचलित आहेत. के. असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम' (१९६०) मधील संवादानाही रसिकांची अतिशय उत्तम दाद मिळाली!

एका प्रसंगात 'अकबर' (पृथ्वीराज कपूर) 'सलिम' (दिलीप कुमार) याला उद्देशून म्हणतो,




"हम एक लाडले बेटे के बाप जरुर है, लेकिन अपने बेटे के धडकते दिल के लिए, हम हिंदुस्तान की तकदीर नहीं बदल सकते.."

यावर सलिमही तितक्याच परखडपणे आपल्या पिताजीना सुनावतो, "तकदीरे बदल जाती है । जमाना बदल जाता है, मुल्लो की तारीख, इतिहास बदल जाता है, शहेनशहा बदल जाते हैं, मगर बदलती दुनिया में मुहब्बत जिसका दामन
थाम लेती है वो इन्सान नहीं बदलता.." थिएटरमध्ये टाळ्यांचा कडकडाट व्हायचा.

यश चोप्रा दिग्दर्शित 'वक्त' (१९६५) मधील राजकुमारची व्यक्तिरेखा जोरदार संवादाने 'कडक' ठरली. "चिनॉय सेठ, यह बच्चो के खेलने की चीज नहीं, हात कट जाए तो खून निकल आयेगा..." हा संवाद गाजला.




या जबरदस्त प्रतिसादामुळे काय झालं तर राजकुमार आपली व्यक्तिरेखा विसरुन फक्त आणि फक्त डायलॉगबाजीवर लक्ष देऊ लागला. आणि त्याला मग वाटू लागले की, प्रेक्षक चित्रपट पाह्यला नव्हे तर आपल्याला पडद्यावर पाह्यला तिकीट काढतात...! कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल पण 'बुलंदी' या चित्रपटातील त्याचा 'इरादा पैदा करो इरादा! इरादे से आसमान का चांद भी इन्सान की कदमो मे सजदा करता है..' हा जोरदार संवाद इम्पिरियल थिएटरच्या भिंतीवर लिहिला होते आणि तो वाचून तिकीट काढले जाई!




त्या काळात अशा संवाद लेखनावर विशेष लक्ष दिले जाई, याचे कारण म्हणजे पब्लिक कलाकाराच्या भावमुद्रेपेक्षा (एक्प्रेशन) त्याच्या बोलण्यावर जास्त लक्ष केंद्रित करीत. त्यांना तेच जास्त आवडे. विशेष म्हणजे फार पूर्वी आपल्याकडे थिएटरची साऊंड सिस्टीम म्हणावी तशी प्रगत नव्हती तरीही हे डायलॉग पब्लिक समरसून ऐकायचा आणि अनेक जण तर आवडत्या डायलॉगसाठी पुन्हा एकदा थिएटरची वारी करीत.

राज कपूर दिग्दर्शित "बॉबी" (१९७३) मधील "प्रेम नाम है मेरा... प्रेम चोप्रा..!" हा डायलॉग असा काही गाजला की

प्रेम चोप्राने आपल्या आत्मचरित्राचे तेच नाव ठेवले आणि त्या नावाने मराठी रंगभूमीवर नाटकही आले.

मेहुलकुमार दिग्दर्शित "क्रांतिवीर"चेही डायलॉग असेच प्रचंड टाळ्या व शिट्ट्यांनी डोक्या
वर घेतले.

"ये मुसलमान का खून, ये हिंदू का खून....बता इसमें मुसलमान का कौनसा, हिंदू का कौनसा... बता..?!",

"आ गये मेरी मौत का तमाशा देखने...! "

"उपरवाला भी उपर से देखता होगा तो उसे शर्म आती होगी. सोचता होगा मै ने सबसे खुबसूरत चीज बनाई थी इन्सान.... नीचे देखा तो सब कीडे बन गये है...कीडे..!"



"हम भले ही उपरवाले को अलगअलग नाम से पुकारते है, लेकिन हमारा धरम एक है, मजहब एक है.... इन्सानियत!"

"कुत्ते...कुत्ते की तरह जीने की आदत पड गयी है सबको..!"

"तुमसे तो वो वेश्या अच्छी होती है, जो बेचती जरुर है, मगर अपना जिस्म बेचती है....अपने देश की आत्मा को, अपने ईमान को नहीं बेचती.. "

"क्रांतिवीर" चक्क एकतीस वर्ष पूर्ण झाली देखील, तरी या जोरदार शोरधार संवादाचा आवाज कानात घुमतोय. अधूनमधून सोशल मिडियात त्याचे भाग व्हायरल होताहेत!

"क्रांतिवीर" वेगळ्याच सामाजिक वातावरण निर्माण झाला. ६ डिसेंबर १९९२ रोजीचे उत्तर प्रदेशातील अयोध्येतील बाबरी मशीदी प्रकरण, त्याची देशातील विविध भागात उमटलेली प्रतिक्रिया, हिंदू व मुसलमान यांच्यातील संघर्ष,

जानेवारी १९९३ त मुंबईत झालेली 'जातीय दंगल', १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेले बारा 'साखळी बॉम्बस्फोट' या सगळ्यातून सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम वातावरणात तणाव निर्माण झाला होता. आणि त्याची विविध माध्यमातून प्रतिक्रियाही उमटत होती. त्याचाच एक भाग म्हणून नाना पाटेकरमध्येही एक आजूबाजूच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय गोष्टींवर जळजळीत भाष्य करणारा जागरुक माणूस! "क्रांतिवीर" मधील प्रताप नारायण टिळक हा त्याला मोठाच प्लॅटफॉर्म मिळाला. "त्याने जणू अख्खा पिक्चर ताब्यात घेतला!" आणि तो सुसाट वेगात बोलत सुटला..! याच चित्रपटात डॅनी डेन्झोपाचा एक डायलॉग आहे.. "हम तुम्हे ऐसे
जलाऐंगे की तेरे चाहनेवालो को गंगा मे नहाने के
लिए तेरी राख भी नसीब नही होगी..!"

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' ( १९७१) मधील संपूर्ण चित्रपटभरची राजेश खन्नाची अखंड प्रचंड बकबक म्हणजे मुक्त 'डायलॉग'बाजी आहे. आणि त्यात जास्त गाजला.. "बाबू मोशाय, जिंदगी और मौत उपरवाले के हात मे है, जहा पनाह, उसे ना आप बदल सकते हैं ना मैं, हम सब तो रंगमंच की कठपुतलीया है जिनकी डोर उपरवाले की उंगलियो में बंधी है, कौन कब कैसे उठेगा यह कोई नहीं बता सकता..!" हा भावपूर्ण संवाद 'आनंद' चित्रपटाचे सार आहे, ओळख आहे आणि राजेश खन्नाने तो आपल्यातील अभिनय गुणाचा प्रत्यय देत तो पडदाभर साकारला. राजेश खन्नाच्या निधनाचे वृत्त देताना प्रसार माध्यमात हा संवाद आवर्जून दिला गेला. हा संवाद एक प्रकारची राजेश



खन्नाची जणू ओळख झाली होती. "मै मरने से पहले मरना नहीं चाहता, जिंदगी बडी होनी चाहिए लंबी नहीं.." असे 'आनंद'मधले राजेश खन्नामय झालेले अनेक लहान मोठे संवाद गाजले.

प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३) मधील अमिताभ बच्चनने प्राणला उद्देशून म्हटले, "यह पुलीस स्टेशन है तुम्हारे बाप का घर नहीं..!" या संवादाने अमिताभला स्टार केले.

यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार' (१९७५) मधील विजय (अमिताभ बच्चन), त्याचा भाऊ रवि (शशी कपूर) आणि त्यांची आई (निरुपा रॉय) यांच्यातील 'डायलॉगबाजी' अतिशय नाट्यमय अशी आहे. अगदी छोट्या छोट्या संवादाचा प्रभाव कायम होता! "मेरे पास माँ है..!" हे इतक्या भावपूर्णरित्या व्यक्त होते की त्यातून संवादाची ताकद आणि

महत्व लक्षात येते. 'दीवार'च्या डायलॉगची तबकडी प्रकाशित होणं स्वाभाविक होतेच!




"जाओ पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरे बाप को चोर कहा था! पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरी माँ को गाली दे के नौकरी से निकाल दिया था! पहले उस आदमी का साईन ले के आओ जिसने मेरे हाथ पर ये लिखा था...ये....उसके बाद मेरे भाई तुम जहाँ कहोंगे मै साईन कर दूंगा..!" 'दीवार'चा हा आणखी एक गाजलेला 'डायलॉग' आणि 'दीवार'ने निर्माण केलेल्या वातावरणात 'शोले' पडद्यावर आला आणि नवीन पर्व सुरु झाले!

यश चोप्रा यांचा 'त्रिशूल', मनमोहन देसाईं दिग्दर्शित 'अमर अकबर ॲन्थनी', टीनू आनंद दिग्दर्शित 'शहेनशहा', रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सागर' अशा अनेक चित्रपटांचे संवाद गाजले.




आपल्या देशात चित्रपट ऐकायलाही प्रेक्षकांना आवडत असते. त्याचा कालांतराने फिल्मवाल्यानाच विसर पडला. अधूनमधून 'सिंगम' अथवा अन्य सिनेमातील काही डायलॉग टाळ्या वसूल करत!

'केजीएफ-२'ने तीच सुपर डायलॉगबाजी प्रेक्षकांसमोर आणली आणि टाळ्यांचा प्रतिसाद मिळू लागला. (मूळ कन्नड

भाषेतला पण त्याच वेळी हिंदी, तेलुगू, तमिळ व मल्याळम भाषेत सामोरा आलेला जबरदस्त "एन्टर्टेनर"!)

"अपने को इतिहास पे भरोसा नहीं है...!"




"होता है कुछ और, तो लिखवाते कुछ और है..!"
"कही सुनी बातें मत लिखना..!"
"खुद अपनी आँखो देखी लिखना..!"
"उसमें एक वजन होता है.!".
"मैं हमेशा जंग टालने की कोशिश करता हूं,
लेकिन जंग हुई तो जीतूंगा तो मैं ही..!
"कुछ लोग गुलाम बनके ही सही, सौ साल जीना चाहते हैं..!, लेकिन कुछ लोग एक दिन जिए तो सुल्तान की तरह जीना चाहते हैं..!"

**"केजीएफ खून से लिखी हुई कहानी है, स्यायी से नहीं बढेंगी ..!"**

**"अगर आगे बढानी हैं तो फिरसे गोली मांगेगी..!"**

**(संवाद लेखन उत्तमच झालेय, यात शंकाच नाही! पण ते कुणी बरे लिहिले असावेत? या**

**कुतूहलापोटी "गुगलवर" पहिले असता खालील**

**माहितीने लक्ष वेधून घेतले. थक्क झालो!!**

**"केजीएफ चॅप्टर २" (KGF Chapter 2) या चित्रपटातील लोकप्रिय हिंदी संवाद, खुद्द मुख्य अभिनेता 'यश'ने (अर्थात 'नवीनकुमार गौडा') याने स्वतः लिहिले आहेत, वाचून आश्चर्य वाटले.) दिग्दर्शक 'प्रशांत नील' यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केले होते की, 'रॉकी भाई'च्या व्यक्तिरेखेतील अनेक दमदार संवाद आणि डायलॉग्समध्ये 'यश'चे महत्त्वपूर्ण योगदान आहे! अर्थात हे हिंदी संवाद, हिंदी भाषेत अधिक प्रभावी करण्यासाठी एका विशेष टीमने काम केले आहे, ज्यामध्ये अनेक गाजलेले डायलॉग्स आहेत!**

<u>प्रसिद्ध संवाद</u> : "हिंसा, हिंसा, हिंसा... मला ते आवडत नाही. पण हिंसा मला आवडते.." हे आणि इतर संवाद हिंदी प्रेक्षकांमध्ये प्रचंड गाजले!

यशने हिंदी आवृत्तीतील स्वतःच्या संवादांवर विशेष काम केले होते! हे विशेष!)




..हिंदी चित्रपटात पुन्हा 'हुकमी डायलॉग' ऐकू आलेच तर ते हवेच आहेत. पण ग्लोबल युगात हिंदी चित्रपटाची पटकथा इंग्रजीत लिहिली जात असल्याने हिंदी डायलॉग लिहिणे जास्त कष्टाचे!

**अभिनेता राजकुमारचे काही गाजलेले संवाद.. "जब राजेश्वर दोस्ती निभाता है तो अफसाने लिक्खे जाते है! और जब दुश्मनी करता है तो तारीख बदल जाती है! (चित्रपट 'सौदागर')**

**"न तलवार की धार से न गोलियों की बौछार से, बंदा डरता है सिर्फ परवरदिगार से.." (चित्रपट तिरंगा!) "हम अपने कदमों की आहट से हवा का**
**रुख बदल देते है!" ( चित्रपट : बेताज बादशाह)**

**...असे खास राजकुमार शैलीचे डायलॉग ही त्याची ओळख झाली आणि राजकुमारसाठीच असे संवाद लिहिले जाऊ लागले तसेच राजकुमारची डायलॉगबाजी पिक्चर हाऊसफुल्ल करु लागली.**

**प्रभावी बोलणं हा अभिनयातील महत्वाचा भाग. ज्याला तो जमला अथवा साध्य झाला तो यशस्वी ठरला आणि त्यांचे काही संवाद गाजले. तर ज्याना शब्दाची ताकद**

**समजली अथवा पेलली नाही अथवा वाक्य काय ते समजलेच नाही ते निष्प्रभ ठरले! महत्वाचे म्हणजे, रसिकांना कोण कसे बोलतयं हे चांगले समजत असतेच. ते एकाद्या संवादाला उगाच टाळ्या शिट्ट्या हंशा देत नाहीत.**

**हिंदी चित्रपटाच्या वाटचालीत संवाद लेखक खूप झाले. त्यात गुलजार, सलिम-जावेद (सलिम खान आणि जावेद अख्तर), कादर खान यांच्या संवादांचा जनसामान्यांवर जास्त प्रभाव पडला. यांनी अनेक चित्रपट ऐकण्यासारखेही केले!**

**हिंदी चित्रपटातील काही गाजलेल्या डायलॉगची ही झलक :**

**"किसी बडी खुशी के इंतजार मे हम ये छोटी छोटी खुशियों के मौके खो देते है.." ('बावर्ची' या चित्रपटात राजेश खन्ना)**

**"हम जहां खडे होते हैं, लाईन वही से शुरु होती है ('कालीया' मध्ये अमिताभ बच्चन).**

"ये फुलो के साथ साथ दिल कब से बेचना शुरु कर दिया है?" ('कश्मीर की कली' या चित्रपटात प्राण)

म्हटलं ना चित्रपट हे दृश्य माध्यम असले तरी आपल्या देशात ते प्रामुख्याने संवादाचे माध्यम म्हणून रुजले आणि अगणित विशेष संवादाना, विशिष्ट संवाद शैलीला उत्तम लोकप्रियता मिळाली. अगदी काळ बदलला तरी डायलॉगबाजीची किमया कायमच राहून लाईक्स मिळू लागल्या... "शोले" पन्नास वर्ष सेलिब्रेशन मुंबईत रिगल चित्रपटगृहात असो वा इटलीतील भव्य चित्रपटगृहात भारी प्रतिसाद त्याच्या डायलॉगना मिळाला! टाळ्या, शिट्याच सांगतात, "कितने आदमी थे!.."

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ६४

## 'अमानुष' @५० वर्षे..!!
## 'दिल ऐसा किसीने मेरा तोडा..'




प्रेमभंग झालेला नायक कमालीचा व्यथित झाल्याने "एकच प्याला" हाती करतो, आपले सगळेच दु:ख त्या दारुच्या ग्लासात ओततो. आपण निर्दोष आहोत! आपलं "तिच्या"वरचं प्रेम अतूट आहे! खरं आहे, तिने आपल्याला समजून घ्यावे अशी तो मनोमन विनवणी करतो. दारुच्या व्यसनापायी तो "देवदास" बनतो....

'कृष्ण-धवल' अर्थात 'ब्लॅक अँड व्हाईट' चित्रपटापासून रंगीत चित्रपटापर्यंत अनेकदा तरी असा "प्रेमभंग" झालेला नायक रुपेरी पडद्यावर आला, एखादा प्रेमभंग झालेला नायक योगायोगाने चक्क कोठीवरही पोहचला! त्याच्या या दु:खाने चित्रपटगृहाच्या अंधारातील प्रेक्षक गलबलला. त्याच्यावर अशी दुर्दैवी वेळ यायला नको होती असे त्यांना वाटले. आणि असे प्रेमात अपयशी ठरलेल्या नायकांचे अनेक चित्रपट लोकप्रिय ठरले.. दिलीपकुमार तर त्यातून 'ट्रॅजेडी किंग' म्हणून नावाजला. एक सुपरहिट फॉर्म्युला बरेच काही घडवतो!

याच पठडीतील "अमानुष" चक्क सुपरहिट!

शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित "अमानुष" एकाच वेळेस बंगाली व हिंदी भाषेत निर्माण झाला. बंगाली भाषेतील "अमानुष" १९७४ च्या दुर्गा पुजेच्या वेळेस पूर्व बंगालमध्ये प्रदर्शित झाला आणि रसिक प्रेक्षकांनी बघता बघता तो

**लोकप्रिय झाला! कोलकत्ता शहरातील चित्रपट गृहात त्याने तब्बल ९६ आठवडे मुक्काम केला! चित्रपटगृहाशी असलेला 'शक्ती फिल्म्स'चा करार संपुष्टात आल्याने तो चित्रपटगृहातून उतरवण्यात आला. अन्यथा शतक निश्चित होते!**

**(खरं सांगू? "अमानुष"च्या गाण्यांनी जेव्हा रेडिओच्या "गीतमाला" वर "गारूड" केलं त्याच क्षणी ती आम्हाला मनापासून आवडली.. पण अभिनेता"उत्तम कुमार" म्हणजे कोण? हा प्रश्न मात्र सतावत होता! (आमचे अवघे पंधरा वर्षे वयोमान!) कुणाला विचारुया बरे! "छोटी सी मुलाकात" (१९६७) मधली "गाणी" माहित होती, पण त्या सिनेमाचा "नायक" हा कुणी फलाणा "उत्तम कुमार" म्हणजे नेमका कोण हे आमच्या खिजगणतीतही नव्हते! कारण एक तर साठच्या दशकात जन्मलेली आमची पिढी! "सुपरस्टार" पदावर आरूढ झालेल्या "राजेश खन्ना" याची देदीप्यमान**

"कारकीर्द" अनुभवतोय तोच "जंजीर" (१९७२) हा झंझावात समोरा आला होता! १९७५च्या जानेवारीत अमिताभचा "दीवार" प्रदर्शित होताच.. सगळं लक्ष तिथे केंद्रित झालेलं! अचानक त्या "अमानुष"ची गाणी कानामनावर गारूड करू लागली. "अमानुष" भले २१ मार्च, १९७५ ला प्रदर्शित झाला असला तरी गाणी दोनेक महिने आधीच येऊन "सुपरहिट" झाली देखील! (आम्ही "एस. एस. सी." ला असल्याने आमच्या वयाच्या जवळजवळ सर्वांनाच पालकांनी "अभ्यासाच्या" दावणीला बांधले असल्याने, हा "उत्तमकुमार" कोण हा प्रश्न..??.. आमच्या बच्चेकंपनीसाठी "कट्टाप्पाने बाहुबली को क्यूँ मारा?" यापेक्षाही एक कठीण प्रश्न होता!) नंतर "बुजुर्गांच्या" गप्पांमधून समजले की, हा "उत्तमकुमार" (अरुण कुमार चटर्जी - ३ सप्टेंबर, १९२६ - २४ जुलै, १९८०) म्हणजे बंगाली भाषेतील एक सर्वात लोकप्रिय अभिनेते, निर्माते आणि

दिग्दर्शक! ज्यांनी एकेकाळी "बंगाली" चित्रपटसृष्टीत महानायक म्हणून अधिराज्य गाजवले होते! बाप रे! असो!)

बंगाली "अमानुष" हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असतानाच हिंदीतील "अमानुष" २१ मार्च १९७५ रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. मुंबईत मेन थिएटर "मिनर्व्हा" मॅटीनी शो आणि लिबर्टी (दिवसा तीन खेळ) व इतरत्र प्रदर्शित झाला. (त्याला पन्नास वर्ष पूर्ण झाली देखील.. यानिमित्त हा फोकस). हिंदीत देखील "अमानुष" लोकप्रिय ठरला!

'उत्तमकुमार' हा बंगाली चित्रपटातील 'दिलीपकुमार' म्हणून ओळखला जाई! 'अष्टपैलू' लोकप्रिय अभिनेता! साठच्या दशकात त्याने हिंदीत टाकलेले पाऊल अपयशी ठरले. आता दिग्दर्शक 'शक्ती सामंता' यांनी त्याला हिंदीत पुन्हा संधी दिली. त्या संधीचा त्याने योग्य वापर केला. एक तर त्याचीच गरज असते आणि दुसरे म्हणजे तशी दमदार व्यक्तिरेखाही मिळावी लागते.

शक्ती सामंता व शर्मिला टागोर ही दिग्दर्शक व कलाकार अशी जमलेली जोडी. दोघेही मुळचे बंगालचे. शक्तीदा यांनीच "कश्मीर की कली" तून शर्मिला टागोरला हिंदी चित्रपटाच्या रुपेरी पडद्यावर आणले. त्याच शक्ती सामंता यांनी "ॲन इव्हिनिंग इन पॅरीस" मध्ये याच शर्मिला टागोरला पॅरीसच्या उत्फूर्त अशा समुद्रात बेदींग सूटात दाखवले (एका प्रख्यात इंग्लिश मासिकाच्या मुखपृष्ठावर शर्मिला टागोरचे असे 'रुपडे' प्रसिद्ध होताच जणू सांस्कृतिक धक्काच बसला! आजच्या 'ग्लोबल' युगातील डिजिटल पिढीसमोर असं म्हणजे किरकोळ गोष्ट!) टीकाटिप्पणीच्या उलटसुलट वादळातून बाहेर पडण्याचा मार्ग असतो तो रुपेरी पडद्यावरील परफॉर्मन्स! शर्मिला टागोरने ते साध्य केले त्यात एक चित्रपट होता, शक्ती सामंता दिग्दर्शित "आराधना" ( १९६९), मग "अमर प्रेम" (१९७२). या जोडीचे 'चरित्रहीन', 'आनंद आश्रम' इत्यादी चित्रपटही आले!

"अमानुष" हा चित्रपट शक्तीपदा राजगुरु यांच्या "नया बसन" या साहित्यावर आधारित (पूर्वी मराठी व बंगालीत मोठ्याच प्रमाणावर साहित्यवार आधारित चित्रपट निर्माण होत. त्यावरुनचे पटकथा लेखन जास्त महत्वाची गोष्ट. शब्द माध्यमातून दृश्य माध्यमात जाणे!) संवादलेखन प्रभात रॉय यांचे. छायाचित्रण आलोक दासगुप्ता यांचे!

बंगालमधील समुद्र किनाऱ्यावरील एका छोट्याश्या हिरव्यागार गावात घडणारी ही गोष्ट. मधुसूदन अर्थात मधुरॉय चौधरी (उत्तमकुमार) व लेखा (शर्मिला टागोर) यांच्या प्रेमसंबंधात एक विचित्र विघ्न येते! मधु रॉयने दारुच्या नशेत आपल्याशी केलेल्या बळजबरीतून आपण गर्भवती राहिल्याचा आरोप गावातीलच एक युवती मातों उर्फ धन्नो (प्रेमा नारायण) करते आणि मधु व लेखा
यांच्या प्रेमसंबंधात मोठेच विघ्न येते! सगळीच घडी विस्कटून जाते! 'मधु' पूर्णपणे दारुच्या आहारी जातो तर लेखा प्रचंड

हवालदिल होते! धन्नो गावातून गायब झालेली असते. चित्रपट 'क्लायमॅक्स'कडे जाताना सगळेच गैरसमज दूर होतात! सत्य काय ते समोर येते. चित्रपटात डॉक्टर, पोलीस इन्स्पेक्टर अशा अनेक लहान मोठ्या व्यक्तीरेखा आहेत. अनिल चटर्जी, उत्पल दत्त, मनमोहन, असित सेन, माणिक दत्त, मदन घोष, सुबर्तो महापात्रा, अमोल सेन, प्रभात रॉय इत्यादींच्या भूमिका! गावाचा परिसर, होडीतून प्रवास, संथ जीवनशैली हे सगळेच कथेला पूरक आणि चित्रपटाला वेगळ्याच वातावरणात नेणारे!

उत्तमकुमारभोवती सगळा चित्रपट आहे आणि तसे भान ठेवत त्याने आपले काम केलेय! विशेषत: प्रेमभंग झाल्यानंतरची उदासीनता त्याने उत्तम साकारलीय. तोच या चित्रपटाचा गाभा आहे.

इंदिवर यांच्या गीतांना श्यामल मित्रा यांचे संगीत ही या चित्रपटाची मोठीच जमेची बाजू! पटकथेनुसार ती आहेत.

त्यामुळे चित्रपटातील आपली उत्सुकता कायम राहते. 'तेरे गालों को चुमूँ..' (किशोरकुमार व आशा भोसले), 'दिल ऐसा किसीने मेरा तोडा..' (किशोरकुमार), 'ग़म की दवा तो प्यार है..' (आशा भोसले), 'ना पुछो कोई हमें..' (किशोरकुमार), 'कल के अपने ना जाने..' (आशा भोसले) ही गाणी लोकप्रिय ठरली!

एका भाषेतील सुपरहिट चित्रपटाची अन्य भाषेत रिमेक तर होणारच. यशाला फॉलो करणे ही तर चित्रपटसृष्टीची परंपरा! "अमानुष" ची तेलगू, तमिळ, मल्याळम या तीनही भाषेत रिमेक झाली! प्रेमभंगापायी दारुच्या ग्लासात स्वतःला झोकून देणारा नायक हे 'कथासूत्र' त्या काळात रसिकांनी पाहताना नायकाला सहानुभूती दाखवली. आज तशी व तेवढीच सहानुभूती मिळेल का? हा बदलत्या सामाजिक सांस्कृतिक स्थितीनुसार प्रश्नच तर आहे!

उत्तमकुमार हिंदीत फारसा रुळलाच नाही. बहुतेक बंगाली चित्रपटसृष्टीतील वातावरण, कामाची पद्धत, मिळालेल्या भूमिका, तिकडच्या चित्रपटसृष्टीतील स्थान या गोष्टींच्या तुलनेत हिंदीत त्याला परकेपण वाटले असेल. एका ठिकाणचे रुजणे दुसरीकडे रुजेलच असे नाही. १९६७ साली अग्रदूत दिग्दर्शित "छोटी सी मुलाकात" या चित्रपटात वैजयंतीमालाचा नायक म्हणून त्याने हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले, त्यात यश न आल्याने बंगालीवरच त्याने आपला फोकस कायम ठेवला. काही वर्षांनी शक्ती सामंता यांनी "अमानुष" साठी तोच योग्य असे मानत त्याचे हिंदीत पुनरागमन केले. अर्थात, हा चित्रपट एकाच वेळेस बंगाली व हिंदीत निर्माण झाल्याचेही उत्तमकुमारच्या पथ्यावर पडले! आणि पिक्चर 'सुपर हिट' म्हटल्यावर हिंदीत आणखीन ऑफर येणारच. त्यात शक्ती सामंता दिग्दर्शित "आनंद आश्रम", गुलजार दिग्दर्शित "किताब", ए. भीमसेन दिग्दर्शित

"दूरिया" असे काही स्वच्छ मनोरंजक चित्रपट मिळाले. तर मनमोहन देसाई दिग्दर्शित "देशप्रेमी" मध्ये अमिताभ बच्चनसोबत संधी तर मिळाली.. पण चित्रपट निर्मितीवस्थेत असा व इतका काही रखडला की या दोघांना एकाच चित्रपटात पाहण्याची उत्सुकताच संपली! उत्तमकुमारने आणखीन काही हिंदी चित्रपटातून काम केल्यावर बंगाली चित्रपट हीच आपली कर्मभूमी ठरवली आणि तेथे अधिकाधिक प्रमाणात तो यशस्वी ठरला!

पन्नास वर्षांनंतर "अमानुष" त्यातील गाण्यांनी आजही आपल्या समोरच आहे! चित्रपटातील गाण्यांची जागा पटकथेनुसार असेल आणि ती गाणी श्रवणीय असतील तर तो चित्रपट कधीच पडद्याआड जात नाही, हेदेखील यशच! अशी गाणी अलिकडच्या चित्रपटातून फारशी पाह्यला/ ऐकायला मिळतात का हो? दर्जेदार गीत संगीताने चित्रपटाचे आयुष्य वाढते. हे "कान" देवून ऐका!

## लेख क्र. ६५

## "दास्तान"ला दिलीपकुमारचे चाहते विसरु इच्छितात!.. ही गोष्ट तो 'ॲन्ग्री ओल्ड मॅन' बनण्यापूर्वीची..!




दिलीपकुमार सूडनायक कधीपासून झाला? सुभाष घई दिग्दर्शित "विधाता" पासून! त्याने तसे करणे बदलत्या काळानुसार गरजेचे होते. रमेश तलवार दिग्दर्शित "दुनिया", यश चोप्रा दिग्दर्शित "मशाल" यातही दिलीपकुमारने "सूडाची भूमिका" साकारलीय. सुभाष घई दिग्दर्शित "विधाता", "कर्मा" आणि "सौदागर" अशा तीन चित्रपटात दिलीपकुमार होता ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट! एक

प्रकारचा विक्रमच! दिलीपकुमारची कार्यशैली आत्मसात करुन सुभाष घईनी हे यश प्राप्त केले असे कौतुकाने म्हणायला हवे. साठ व सत्तरच्या दशकातील यशस्वी निर्माता व दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी "जबरदस्त" या चित्रपटाचा मुहूर्त दिलीपकुमारवरच केला होता! आशा पारेखने त्यासाठी मुहूर्त 'क्लॅप' दिला. काही कारणास्तव हा चित्रपट मुहूर्तापुढे काही जात नव्हता, दिलीपकुमार ऐवजी संजीवकुमारला घेऊन "जबरदस्त" पडद्यावर आणला आणि 'फर्स्ट शो'पासूनच 'सुपर-फ्लॉप'!

त्या काळातील दिलीपकुमारचा अतिशय महत्वाचा चित्रपट म्हणजे मुशीर रियाज निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "शक्ती". त्यात दिलीप कुमार व अमिताभ बच्चन यांच्यात अभिनयाचा जबरदस्त सामना रंगला! काही दृश्यात अमिताभ भारी ठरलाय हे सत्य त्या काळातील दिलीप कुमारप्रेमीना मान्य झाले नाही. वस्तुस्थिती तीच आहे! हे

सगळेच घडण्यापूर्वीच एक महत्वाची गोष्ट घडली होती! बी. आर. चोप्रा निर्मित आणि दिग्दर्शित बी. आर. फिल्मचा "दास्तान" (रिलीज ३ मार्च १९७२) पडद्यावर येताच रसिकांनी पूर्णपणे नाकारला! या चित्रपटाच्या प्रदर्शनास यशस्वी 'त्रेपन्न वर्षे' पूर्ण झाली तरी तो विविध कारणास्तव "फोकस"मध्ये आहे! (हेदेखील एक प्रकारचे यशच म्हणायचे!) याच दिवशी प्रदर्शित झालेल्या मेहमूद व एन. सी. सिप्पी निर्मित व एस. रामनाथन दिग्दर्शित 'बॉम्बे टू गोवा'ची एन्टरटेन्मेन्ट, एन्टरटेन्मेन्ट, एन्टरटेन्मेन्ट!!ची गाडी मात्र आजही सुरु आहे. एकाच शुक्रवारी हे दोन चित्रपट प्रदर्शित होताना पहिल्या दिवसापुरते "दास्तान"चे पारडे जड होते. रसिकांनी 'बॉम्बे टू गोवा'च्या बाजूने कौल दिला! मी कायमच म्हणतो, कोणता चित्रपट डोक्यात नि डोक्यावर घ्यायचा याचा निर्णय प्रेक्षकांनाच घेऊ देत! त्यांची आवडीनिवडीची भूमिका खूपच महत्वाची! त्यांना 'ॲनिमल', 'पुष्पा २', 'छावा' आवडले व

हाऊसफुल्ल गर्दीत ते धो धो चालू लागले ही यशाची गोष्ट वर्षानुवर्ष सुरु आहे!

(आजच्या कार्पोरेट युगाला उगाच वाटतं, मोठ मोठ्या जाहिराती, मुलाखती आणि उत्पन्नाचे फुगवलेले आकडे दिल्याने पिक्चर हिटचा समज होतो. पब्लिकला गृहीत धरु नका. यह पब्लिक है, सब जानती है!)

दिलीपकुमारची दुहेरी भूमिका असलेला "दास्तान" तर रसिकांनी पूर्णपणे नाकारला! जराही उशीर न करता नाकारला! चाणक्य दिग्दर्शित "राम और श्याम" (१९६७) मधील दिलीपकुमारचा डबल रोल लोकप्रिय ठरल्यानंतरचा हा चित्रपट! 'राम और श्याम' आजही जवळपास साठ वर्षांनंतर फुल्ल करमणूक करतो! कितीही वेळा पहावा. 'एन्जॉय' करावा. धमाल अनुभव! 'दास्तान'चे मुंबईत मेन थिएटर 'नॉव्हेल्टी' होते आणि 'फर्स्ट डे फर्स्ट शो'पासूनच रसिकांनी आपली निराशा व्यक्त केली. त्याना चित्रपटात

काहीच दम दिसेना. बी. आर. चोप्रा यांजकडून हे अजिबात अपेक्षित नव्हतेच! प्रेक्षकांची नाडी ओळखलेला आणि विविधता दिलेला दिग्दर्शक ही त्यांची ओळख!

बी. आर. चोप्रा यांनी आपल्याच "अफसाना" (१९५१) या सुपर हिट चित्रपटाची रिमेक म्हणून "दास्तान"ची अतिशय जोरदार पूर्वप्रसिध्दीने निर्मिती केली. मूळ चित्रपटात अशोककुमार 'डबल रोल'मध्ये होते. घोषणेपासूनच "दास्तान" चर्चेत राहिला. बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "नया दौर" (१९५७) मध्ये दिलीप कुमारने भूमिका साकारली होती आणि चित्रपट यशस्वी ठरला होता.



उत्तम सामाजिक आशय असलेला असाच हा चित्रपट!

"दास्तान" ची नायिका म्हणून शर्मिला टागोरची निवड झाली म्हणून अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. शर्मिला टागोर खास करुन शशी कपूर ('वक्त', 'आमने सामने' वगैरे), धर्मेंद्र ('यकिन', 'मेरे हमदम मेरे दोस्त', 'देवर' इत्यादी), राजेश खन्ना ('आराधना', 'अमर प्रेम' वगैरे), यांची नायिका म्हणून ओळखली जाणारी! पण त्या काळातील अनेक अभिनेत्रींप्रमाणेच शर्मिला टागोरला दिलीपकुमारची नायिका बनण्याची महत्त्वाकांक्षा असणारच. "दास्तान"मुळे ती पूर्ण झाली! (आत्माराम दिग्दर्शित "यह गुलिस्ता हमारा" मुळे देव आनंदची नायिका बनण्याचे तिचे स्वप्न पूर्ण तर झाले, तोही पिक्चर फ्लॉप! अरेरे! शर्मिला टागोरची ही स्वप्ने रसिकांनी पूर्ण होऊ दिली नाहीत. ती राज कपूरची नायिका बनू शकली नाही इतकेच!)

यांच्यासह बिंदू, आय. एस. जोहर, मदनपुरी, सचिन पिळगावकर (याने बालपणीच्या दिलीप कुमारची दुहेरी भूमिका साकारली!), मनमोहन कृष्ण, गोपीकृष्ण, पद्मा खन्ना आणि  प्रेम चोप्रा यांच्या प्रमुख भूमिका. छायाचित्रण धरम चोप्रा यांचे, तर संकलन प्राण मेहरा यांचे. साहिर यांच्या गीताना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत असा अगदी वेगळा योग! सगळे कसं छान जुळून आले! या चित्रपटाचे संगीत कल्याणजी आनंदजी यांना हवे होते, त्यांचे तसे प्रयत्नही होते! कारण तोपर्यंत त्यांनी बी. आर. चोप्रा यांच्या चित्रपटांचा संगीत दिले नव्हते. तर लक्ष्मीकांत प्यारेलालही या चित्रपटासाठी प्रयत्नशील होते. कारण दिलीपकुमारच्या चित्रपटाला संगीत देण्याचा हा पहिला योग आला होता. चोप्रासाहेबांनी त्यांचीच निवड केली. गाणी आजही लोकप्रिय आहेत हे विशेष. पिक्चर फ्लॉप नि गाणी हिट असा हा फंडा!

अनेक चित्रपटांबाबत घडलेला! चित्रपट इतिहासातील हाही एक रंग!

चित्रपट पूर्ण होताच याच्या गाण्याच्या तबकड्या विक्रीला आल्या. त्यातील 'न तू जमी के लिए..' (मोहम्मद रफी) हे दर्दभरे गाणे 'ऐकता ऐकता' लोकप्रिय झाले. दिलीप कुमार आणि मोहम्मद रफी हे अगदी हिट आणि फिट समीकरण! याशिवाय 'मारिया माय स्वीट-हार्ट..' (महेन्द्र कपूर आणि आशा भोसले), 'हाय मै की करा..' (आशा भोसले) इत्यादी गाण्यांचा चित्रपटात समावेश! बी. आर. चोप्रांच्या चित्रपटातील गाणी हा कायमच विशेष उल्लेखनीय गोष्ट! एखादा दिग्दर्शक आपल्याच सुपर हिट चित्रपटाची रिमेक करतो तेव्हा त्याचा आत्मविश्वास वाढलेला असतो. 'अफसाना' (१९५१) चे लेखन आय. एस. जोहरचे आहे. (तोच तो अभिनेता जोहर) व त्यात अशोककुमार (दुहेरी भूमिका), वीणा, प्राण, जीवन




कुलदीप कौर इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. असद भोपाली यांच्या गीताना हुस्नलाल भगतराम यांचे संगीत आहे. या चित्रपटातील 'अभी तो मै जवान हूँ..' (लता मंगेशकर), 'किस्मत बिगडी

दुनिया बदली..' (मुकेश) ही गाणी लोकप्रिय झाली!

हा 'अफसाना' तमिळ चित्रपट 'वेंडट्टा' या चित्रपटावर बेतला होता! एकाद्या चित्रपटाची पाळेमुळे अशी रुजलेली असतात! एक सुपरहिट चित्रपट कुठून कसा भाषा बदलतं, रुपडं बदलतं प्रवास करतो याच्या अनेक उदाहरणातील हाही एक चित्रपट! "दास्तान" या चित्रपटाची थीम काय?

एक असतो, सरळमार्गी, सत्प्रवृत्त न्यायाधीश अनिलकुमार दिवाण तर दुसरा असतो रंगभूमीवर काम करणारा अभिनेता सुनील (दोन्ही भूमिकेत दिलीपकुमार!). हा कलाकार श्रीमंत घरातला. पण अभिनयाचे त्याला विशेष आकर्षण आहे. एकदा एका हॉटेलमध्ये या दोघांची भेट होते तेव्हा एक नाट्य घडते! अभिनेता ठरवतो की यापुढे आपण या न्यायाधिशासारखी दाढी लावून वावरायचे. त्यानुसार तो न्यायाधीश झोपला असताना त्याची दाढी सफाचट करतो आणि स्वतः खोटी दाढी लावतो! दुर्दैवाने या खोटी दाढी लावलेल्या अभिनेत्याचा अपघातात मृत्यू होतो आणि वृत्तपत्रात पहिल्या पानावर बातमी प्रसिद्ध होते, न्यायाधीशाचे अपघातात निधन..! आपल्याच निधनाचे वृत्त वाचून न्यायाधीश हादरतो! आता दाढी नसलेला न्यायाधिश आपल्या घरी येतो तेव्हा त्याला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसतो! आपल्या निधनाचे वृत्त समजताच त्याची पत्नी माला

**(बिंदू) ही आपला प्रियकर राजनसोबत (प्रेम चोप्रा) अतिशय स्वच्छंदीपणे, मोकळेपणाने, दिलखुलास पणे मौजमजा करीत असते. वृत्तपत्रात आलेल्या न्यायाधीशाच्या निधनाचे वृत्त तिचा मोठा आधार असतो, ते सत्य आहे असा तिचा समज, पण घरातील इमानी कुत्रा मात्र आपल्या मालकाला अर्थात न्यायाधीशाला ओळखतो. 'क्लायमॅक्स'ला हा न्यायाधीश आपली बदफैली पत्नी आणि तिच्या प्रियकरावर सूड उगवतो! पुरेपूर नाट्य असलेली ही गोष्ट. पण कुठेतरी फसली! रसिकांना गुंतवून ठेवू शकली नाही!**

**चित्रपटात नायिका 'मीना' (शर्मिला टागोर) हिच्या व्यक्तिरेखेला फारसं स्थान मिळाले नाही! दिलीपकुमार व ती फार अलिप्त वाटतात! तिने केवळ दिलीपकुमारसोबत संधी मिळाली म्हणून हा चित्रपट स्वीकारावा? मोह दुसरे काय? आणि त्यात आपलेच नुकसान!**

**चित्रपटाने अपेक्षित आकार घेतला नाही**

त्यामुळे त्याचा परिणामही फसला आणि अर्थातच रसिकांनी चित्रपट नाकारला! सर्व हक्क रसिकांच्या स्वाधीन! रसिकांच्या दृष्टिकोनातून
चित्रपट इतिहास असा रोचक!

दिलीपकुमारने दुहेरी भूमिकेतील फरक उत्तम रितीने साकारणे आणि आपल्या उत्तम अभिनयाचा प्रत्यय देणे हे याही चित्रपटात पाह्यला मिळते! कमाल केली ती प्रेम चोप्रा आणि बिंदू यांनी! दोघांची केमिस्ट्री अगदी छान जमली. बिंदूने तर जनसामान्यांना राग यावा अशा पध्दतीने या भूमिकेत रंग भरला! अगदी खुनशी कटाक्ष असो अथवा जालीम मुद्राभिनय, बिंदूने कमाल केली आहे! बिंदूने अतिशय जालीमपणे साकारलेली व्यक्तीरेखेसाठी चोप्रासाहेबांनी अगोदर आशा पारेखच्या नावाचा विचार केला होता. दिलीप कुमारची नायिका होण्याचे तिचे दीर्घकालीन स्वप्न अशा पध्दतीने पूर्ण होत होते. पण एकिकडे

**आपण देव आनंद, शम्मी कपूर, शशी कपूर, मनोजकुमार, धर्मेंद्र, जितेंद्र, राजेश खन्ना यांची नायिका साकारत असताना केवळ दिलीपकुमारसोबत काम करायला मिळतेय म्हणून बदफैली स्त्री साकारायची? आशा पारेखला हे पटण्यासारखे नव्हतेच आणि बिंदूसाठी परफेक्ट भूमिका होती! तिच्या कारकिर्दीतील ही एक सर्वोत्तम भूमिका ठरली. भूमिकेवर लिहिलेले असते ते करणाऱ्याचे नाव! फक्त योग यायला हवा! तो आलाच! आणि बिंदूला समीक्षकांनी दाद दिली. 'दास्तान' हिट झाला असता तर बिंदूची अदाकारी अधिकाधिक अधोरेखित पोहचली असती! त्रेपन्न वर्षांनंतरही "दास्तान"ची विशेष दखल घ्यावीशी वाटते हे तर त्याचे खूपच मोठे यश आहे! आणि चित्रपटाच्या जगात यशासारखे महत्वाचे असे दुसरे काहीही नाही हो. ते 'हाऊसफुल्ल' गर्दीतच असेल अथवा नसेल पण त्याची अशी दखल घ्यावी लागते यातही असते अथवा असू शकते. विशेष उल्लेखनीय गोष्ट, असित**

सेन दिग्दर्शित "बैराग" (१९७६)मध्ये दिलीपकुमारची तिहेरी भूमिका होती व तोही दणक्यात आपटला! त्याचाही आवाज आजही




येतोय. 'फ्लॉप' पिक्चरच्या अशा अपयशाच्या गोष्टी सांगायलाच हव्यात. त्यात काही वेगळेपण नक्कीच आहे!

दिलीपकुमारचे भक्त "दास्तान" पर्यंतच्या त्याच्या प्रवासावर जास्त फिदा आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातून "बैराग" पासूनचा दिलीपकुमार त्याच्या प्रतिष्ठेला, लौकिकास साजेसा नाही! आणि म्हणूनच ते पुन:पुन्हा मेहबूब खान दिग्दर्शित "अंदाज", बिमल रॉय दिग्दर्शित "देवदास" व "मधुमती", के. असिफ दिग्दर्शित "मुघल-ए-आझम", बी. आर. चोप्रा

दिग्दर्शित "नया दौर", अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित "दाग" हे चित्रपट पुन: पुन्हा अनेकदा पाहत असतात. या चित्रपटांनी सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते "ओटीटी प्लॅटफॉर्म" असा प्रवास केला तरी त्यावरची रसिकांची नजर कायम आहे. रसिकांच्या पुढील पिढीत हे चित्रपट सतत पुढे जात राहिले. "दास्तान" मात्र तिथेच थांबला..!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ६६

**"सुनहरा संसार" @ पन्नाशीपार!**
**"हेमा मालिनी" चक्क नकारात्मक भूमिकेत..!?**




आजचा चित्रपट अनेक बाबतीत खूपच पुढे गेला! असो! आजच्या कलाकारांचेच बघा ना! त्यांना एकाद्या विशिष्ट चौकटीत/प्रतिमेत (इमेजमध्ये) अडकणे अजिबात मंजूर नाही!

अमिताभ बच्चनचेच बघा! तो आजच्या पिढीचा कलाकार कसा हो? असा थेट प्रश्न तुम्ही नक्कीच कराल! अहो, त्याच्याच काय, कोणाच्याच वयावर जावू नका. तो आज प्रत्येक चित्रपटात वेगळा असतो. "ब्लॅक" मधला वेगळा!

"पा" मधला एकदमच वेगळा! "कल्की"मधला त्याहीपेक्षा वेगळा! पन्नास वर्षापूर्वी असे नव्हते! फरिदा जलालने शक्ती सामंता दिग्दर्शित "आराधना" मध्ये (१९६९) पित्याच्या भूमिकेतील राजेश खन्नाची नायिका शर्मिला टागोर असताना पुत्र राजेश खन्नाची नायिका साकारली! आणि तिला नंतर सहनायिकेच्याच भूमिका मिळत गेल्या! रवि टंडन दिग्दर्शित "मजबूर" (१९७४) मध्ये अमिताभ बच्चनची बहिण साकारल्यावर त्याच पठडीतील भूमिका तिला झक मारत कराव्या लागल्या!

'नायिका' ही सर्वगुणसंपन्न असे. छान छान आकर्षक दिसणे, गोडधोड बोलणे, नायकासोबत प्रेम दृश्यात व गाण्यात रंग भरणे हेच तिचे पडदाभर काम! 'खलनायिका' म्हणजे भडक मेकअप, तोकडे कपडे, व्हीलनला कंपनी देणे, एकादा क्लब डान्स करणे (त्याला फिल्मी भाषेत 'कॅब्रे डान्स' का म्हणत?) हीच तिची ठरलेली कामे!

असे सगळेच सेटिंग/फिटींग असतानाच रुपडे नायिकेचे आणि काम नकारात्मक असाही एक फंडा असे. "ड्रीम गर्ल" म्हणून इमेज/ ओळख/लोकप्रियता असलेल्या 'हेमा मालिनी'ने तशी नकारात्मक व्यक्तिरेखा साकारणे ही आश्चर्यचकित करणारी गोष्ट! काही झाले तरी "ड्रीम गर्ल" हेमा मालिनी सिनेमात का असेना पण निश्चितच कसलेच वाईट कृत्य करणार नाही हा तिच्यातर झालेच पण हिंदी चित्रपटावर बेहद्द प्रेम करणाऱ्यांचा शंभर टक्के विश्वास! ही खरं तर जमेची बाजू आहे! पिक्चर कोणताही असो 'हेमा मालिनी' सकारात्मक गोष्टीच करणार आणि त्याचसाठी दिग्दर्शकाने तिची निवड केली आहे ही एक प्रकारची श्रध्दा! रुपेरी पडद्यावरील कलाकारांना आपलेसे मानणे ही आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील एक फंडा!

अशातच "सुनहरा संसार" (मुंबईत प्रदर्शित २१ फेब्रुवारी १९७५! एकावन्न वर्षे पूर्ण झाली देखील) ची रेडिओ

विविध भारतीवर, मुद्रित माध्यमातून पूर्वप्रसिध्दी सुरु होताच त्यात म्हटले जाई, 'हेमा मालिनी' अलग अंदाज मे! चित्रपटात राजेंद्रकुमार, माला सिन्हा यांच्यासह हेमा मालिनी! सत्तरच्या दशकाच्या मध्यापर्यंत राजेंद्रकुमार व माला सिन्हा हे मागील पिढीतील नायक नायिका म्हणून ओळखले जात होते. 'धुल का फूल', 'देवर भाभी', 'गीत' इत्यादी चित्रपटात त्यांनी एकत्र भूमिका साकारलेली! साठच्या दशकात राजेंद्रकुमार 'ज्युबिली कुमार' म्हणून ओळखला जाई! त्याचा प्रदर्शित होणारा जवळपास प्रत्येक चित्रपट हमखास पंचवीस आठवड्यांचा मुक्काम करे! राजेश खन्नाचा झंझावात सुरु होताच शम्मी कपूर, राजेंद्रकुमार यांची हिरोगिरी गोत्यात आली! सुनील दत्तही काही काळ मागे पडला! या चित्रपटसृष्टीत 'सुपरहिट' चित्रपट म्हणजेच बरेच काही असते! अमिताभ बच्चनचा 'अॅन्ग्री यंग मॅन' अर्थात सूडनायकाचे वादळ येताच राजेश खन्नाचीही काही काळ

**पडझड झाली! नायिकांचेही तरुण युग आले होते. आणि हे प्रत्येक काळात होतच असते! नवीन पिढी येणार त्यात जुन्यांनी बदलून वा जुळवून घ्यायचे असतेच! अमिताभ बच्चनने ते नवीन पिढीतील दिग्दर्शकांशी जुळवून घेत-घेत अस्सल व्यावसायिकता दाखवली!**

**ए. सुब्बाराव दिग्दर्शित "सुनहरा संसार" हा त्यांनीच दिग्दर्शित केलेल्या 'पंडती कपूरम' (१९७२) या तेलगू चित्रपटाची रिमेक! मूळ गोष्ट एम. प्रभाकर रेड्डी यांची, हिंदीत इंदर राज आनंद यांनी लेखन केले. मूळ साचा तसाच ठेवून हे चित्रपट रिमेक होत! साठच्या दशकापासून दक्षिण भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक संस्कृती आलीय! त्या काळात अधूनमधून "भूत मेरा साथी", "अप्पू राजा" असे काही साऊथचे चित्रपट हिंदीत डब होऊन येत! "बाहुबली" (२०१४) पासून ते मुख्य प्रवाहात आले आणि 'ग्लोबल युगातील डिजिटल' पिढीसमोर ते 'पॅन इंडिया' म्हणून**

स्थिरावलेत! त्यांचा आपला हुकमी प्रेक्षकवर्ग वाढत वाढत गेला!

भरपूर कौटुंबिक सामाजिक पण काहीसे भडक नाट्य हे त्या काळातील साऊथच्या पिक्चर्सचे वैशिष्ट्य! सर्वसामान्य प्रेक्षक त्यात गुंतत जाई. शंकरलाल (ओम प्रकाश), यांचे धाकटे तीन भाऊ मधु (रमेश देव), चंद्रशेखर (राजेंद्रकुमार) आणि रवि (रोमेश शर्मा), आणि त्यात शंकरलालच्या पत्नीची शेवटची इच्छा असते चंद्रशेखरने लक्ष्मी (माला सिन्हा) शी लग्न करावे. त्याच सुमारास मधु जिल्हा अधिकारी म्हणून याच गावात बदली झाल्याने येतो. मधु चमन (डेव्हिड) यांची मुलगी शोभा (सीमाताई देव) यांच्याशी विवाहबद्ध होतो. गावातील मोठ्या घरात हे एकत्र कुटुंब वावरत असताना अधूनमधून चंद्रशेखर व मधु यांच्यात खटके उडत असतात. त्यासह हे कुटुंब वाटचाल करीत असताना चंद्रशेखर व लक्ष्मी यांना एकेक

करत तीन मुलेही होतात. ती छोटा काका रविसोबत खेळतात, गातात. अशातच गावातील मोठ्या प्रतिष्ठित कारखान्याची मालकीण सविता अर्थात राणी पद्मावती (हेमा मालिनी) कामगारांच्या संपाने, मागण्याने हैराण असते, संतापलेली असते आणि या संपाचे नेतृत्व चंद्रशेखरकडे असल्याने तर तिचा राग अनावर झाला होता. ती चंद्रशेखरवर चोरीचा आळ आणते. इतक्यावरच ती थांबत नाही. ती चंद्रशेखरच्या कुटुंबाची जमीन व संपत्तीही हडप करते!

हे सगळे ती सूड म्हणून करीत असते. पण का? तर चंद्रशेखर व सविताचे पूर्वसंबंध...!

साऊथच्या पिक्चरमध्ये अशा गोष्टी भरपूर

नाट्यमय दृश्य, जोरदार संवाद, गीत संगीताची रेलचेल यातून मांडली जाई. मूळ पिक्चर सुपर हिट असल्यानेच त्याची 'रिमेक' बनणे हा अलिखित नियमच. चित्रपटात रमेश देव व सीमाताई देव हे पती पत्नीच्या भूमिकेत हे उल्लेखनीय! रमेश

देव यांनी दूरदृष्टी ठेवून साठच्या दशकातच हिंदी चित्रपटातून भूमिका साकारण्यास सुरुवात केली. आणि आपला ठसा तेथेही उमटवला.

दिग्दर्शक ए. सुब्बाराव हे तेलगू चित्रपटात यशस्वी. आपल्याच सुपर हिट चित्रपटांची त्यांनी हिंदीत सातत्याने रिमेक केली. 'मिलन' (१९६७), 'मन का मीत' (१९६९), 'डोली' (१९६९), 'दर्पण' (१९७०), 'मस्ताना' (१९७०), 'रखवाला' (१९७१), 'जीत' (१९७२), 'इन्साफ' (१९७३), 'ज्वार भाटा' (१९७३) हे त्यांनीच दिग्दर्शित केलेले चित्रपट. तेलुगुतही असेच सातत्य! एका वर्षात दोन चित्रपट हे सातत्य केवळ कामावरचा फोकस कायम ठेवल्यानेच शक्य असते. माणसं उगाच मोठी होत नाहीत. गुणवत्ता आणि व्यावसायिक शिस्त यांची ते सांगड घालतात.

आनंद बक्षी यांच्या गीतांना नौशाद यांचे संगीत हा योग या चित्रपटाच्या निमित्ताने प्रथमच जुळून आलेला. आणि..

किशोरकुमारही पहिल्यांदाच नौशाद यांच्या संगीत नियोजनात गायलेला. 'हॅलो हॅलो क्या हाल है..' (आशा भोसले व किशोरकुमार) हे ते गाणे! चित्रपटाने मुंबईत मेन थिएटर 'स्वस्तिक' चित्रपटगृहात शंभर दिवसांचा मुक्काम केला. चित्रपट सर्वसाधारण असूनही हे बरे यश म्हणायचे!

हेमा मालिनी नकारात्मक भूमिकेत ही गोष्ट रंजक. (नकारात्मक म्हणजे खलनायिका अथवा व्हॅम्प नव्हे हेही सांगायलाच हवे!) बरं हे पहिल्यांदाच घडत नव्हते. एफ. सी. मेहरा निर्मित व सुशील मुजुमदार दिग्दर्शित "लाल पत्थर" मध्ये (१९७२) सौदामिनी ही तिची अशीच नकारात्मक



भूमिका होती. राजकुमार, हेमा मालिनी, राखी गुलजार, विनोद मेहरा इत्यादींच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची राजघराण्यातील गोष्ट अनेक वळणे घेत घेत रंगते! ती गुंतागुंत चित्रपट रसिकांना अजिबात आवडली नाही. चित्रपट समजायला सोपा असावा हीच पहिली अपेक्षा असते. रांगेत उभे राहून पदरमोड करत एकदाचे तिकीट मिळवायचे आणि त्याच पब्लिकला कोड्यात टाकायचे हे कसे आवडणार? 'सुनहरा संसार' देखील साधारण यशावर थांबला! गंमत कशी ती बघा... १९७५ साल अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण. हिंदी चित्रपटाच्या क्षेत्रात एकदम वेगळेच! २४ जानेवारीला 'दीवार', ३१ जानेवारीला 'आईना', १४ फेब्रुवारीला 'आँधी' आणि 'रफ्तार', २१ फेब्रुवारीला 'सुनहरा संसार', २८ फेब्रुवारीला 'दफा ३०२', ३० मे 'जय संतोषी माँ' असे करत करत १९७५ रंगत रंगत गेले! (सर्व 'लिंक्स' अवश्य पहा.)

आणखीन एक विशेष, प्रकाश मेहरा दिग्दर्शित "हाथ की सफाई" (१९७४) या चित्रपटात लहानपणी पहिल्याच रिळात हरवलेले दोन भाऊ (रणधीर कपूर व विनोद खन्ना) शेवटच्या रिळात एकमेकांना ओळखतात या 'मसाला मिक्स' पिक्चरमध्ये हेमा मालिनीने 'तू क्या जाने बेवफा..' असा उगाच भडक वाटावा असा 'क्लब-डान्स' साकारल्याने अनेक जण अचंबित झाले होते! अतिशय लयबद्ध आणि उत्तम असे ते नृत्य होते पण हेमा मालिनीने ते साकारावे? असा प्रश्न अनेकांना पडला होता. कलाकाराने त्याच्या इमेजपेक्षा काही हटके केले की हे असं होण्याचे ते दिवस होते. "सुनहरा संसार" तसाच! त्याच्या प्रदर्शनास पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा फोकस. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला पन्नास वर्षांपूर्वीच्या चित्रपटांबाबत असलेल्या उत्सुकतेत हाहीही एक चित्रपट! इतकंच!

© दिलीप ठाकूर (राम प्रहर - झूम प्रहर)

**लेख क्र. ६७**

## 'आँधी' @ पन्नाशीपार!..
## ...वादळी, बहुचर्चित, संगीतमय आणि बरेच काही




काही चित्रपट कलाकृती कितीही वर्ष सरली तरी त्या आजच्याच असतात. आजही त्यातून जुन्या चित्रपटांचे अस्तित्व व महत्व अधोरेखित होत राहते!

"आँधी" हा चित्रपट असाच! 'क्लासिक' व 'व्यावसायिक' यांचा सुवर्ण मध्य गाठणारा!

नाव घेताक्षणीच एकाच वेळेस अनेक गोष्टी डोळ्यासमोर येणारच. अशी अनेक चित्रपटांची ताकद आहे! राजकीय पत्रकार याकडे राजकीयपट म्हणून पाहणार,

राजकीय विश्लेषक या चित्रपटावर आणीबाणीत बंदी घालण्यात आली होती याची आठवण नक्कीच करुन देणार! चित्रपट माध्यमाची जाण असणारे गुलजार यांच्या कल्पक दिग्दर्शनाचं विशेष कौतुक करणार! चित्रपट रसिक याकडे राजकारणाच्या पाश्र्वभूमीवरील परिपक्व ('मॅच्युअर्ड') प्रेमकथा म्हणून पाहणार, संगीत शौकीन या चित्रपटातील श्रवणीय गाणी एव्हाना गुणगुणायला लागले असणारच, काहींनी ती ऐकायला घेतली असणार! फिल्मी 'गॉसिप्स'मधून विशेष रस घेणारे या चित्रपटाच्या काश्मिरमधील चित्रिकरणाच्या वेळेस झालेली एक गोष्ट रंगवून सांगणार!

"आँधी" हा बहुचर्चित वादळी चित्रपट म्हणून कायमच ओळखला जातो!

'फिल्म-क्राफ्ट' या निर्मिती संस्थेचे जे. ओम प्रकाश निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित 'आँधी' (रिलीज १३ फेब्रुवारी

१९७५ मुंबईत 'मेट्रो' थिएटर...१४ फेब्रुवारीपासून मुंबई व उपनगरात!) च्या प्रदर्शनास यशस्वी पन्नास वर्षे केव्हाच पूर्ण झाली आहेत. कधी सरला हो इतका काळ?

१९७५ हे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, माध्यम क्षेत्रासाठीचे अतिशय महत्वाचे वर्ष. अनेक घडामोडींचे वर्ष! हिंदी चित्रपट सृष्टीसाठी तर खास उल्लेखनीय वर्ष!

याच वर्षांच्या जानेवारीत २४ तारखेला मुंबईत यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" पडद्यावर आला तोच प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला! तो इतका आणि असा की, 'दीवार'ला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त दक्षिण मुंबईतील 'रिगल' चित्रपटगृहात आयोजित केलेल्या खास खेळास मी गेलो तेव्हा मी देखील चक्क रांगेत उभे राहून प्रवेश घेतला. 'प्रेक्षकाच्या भूमिकेत' राहिल्यानेच 'हाऊसफुल्ल' गर्दीत आपण 'पुन्हा एकदा 'दीवार' एन्जॉय करु'! हा विश्वास

मनसोक्त मनमुराद टाळ्यांनी सार्थ झाला! पन्नास वर्षांपूर्वी "दीवार"च्याच पुढच्या शुक्रवारी म्हणजेच ३१ जानेवारी रोजी मुंबईत "आईना" (राजेश खन्ना व मुमताज), १४ फेब्रुवारीला गुलजार दिग्दर्शित "आँधी", ३० मे रोजी सतराम रोहरा दिग्दर्शित "जय संतोषी माँ" ( याची जाहिरात माझ्या कलेक्शनमध्ये आहे) असे करत करत १५ ऑगस्टला "शोले" येईपर्यंत 'दीवार'ने मिनर्व्हात 'रौप्य महोत्सवी आठवडा' पार करत मोती थिएटरमध्ये पुढचा प्रवास सुरु केला!

या सगळ्यात "आँधी" वेगळाच!

महत्वाकांक्षी राजकीय नेत्या 'आरतीदेवी' (सुचित्रा सेन) आणि त्यांचे पती जे. के. (संजीव कुमार) यांच्या नातेसंबंधाची ही गोष्ट राजकीय चित्रपट म्हणून चर्चेत राहिली! या चित्रपटात संजीवकुमार आणि सुचित्रा सेन यांच्यासह ओम शिवपुरी, मनमोहन, कमलदीप, ए. के. हनगल, हरीश,

रणवीर, सी. एस. दुबे इत्यादींच्या भूमिका आहेत. "आँधी"च्या निर्मितीतील गोष्टी एक चित्रपट ठरावा!

गुलजार हे सुचित्रा सेन नायिका असेल अशा एका वेगळ्याच पटकथेवर निर्माता सोहनलाल कंवर ('पहचान', 'संन्यासी' इत्यादी चित्रपटांचे निर्माते व दिग्दर्शक) यांच्यासाठी चित्रपट दिग्दर्शित करणार होते! पण सुचित्रा सेनने सुचवलेले बदल गुलजार यांनी अमान्य केले व तो चित्रपट तेथेच थांबला!

लेखक कमलेश्वर यांच्याकडे राजकीय नेत्या 'तारकेश्वरी सिन्हा यांच्या आयुष्यावर आधारित एक गोष्ट होती. गुलजार यांना ती आवडताच त्यांनी व भूषण वनमाली यांनी पटकथा लेखन केले. आणि नाव ठरले, "आँधी"!

'परिचय' (१९७२), 'कोशिश' (१९७२) या चित्रपटांच्या वेळेस संजीवकुमारशी गुलजार यांचे सूर जुळल्याने आणि आता त्यांच्याच "मौसम" मध्येही तो भूमिका साकारत

असतानाच "आँधी" साठी तोच निश्चित होताच, एकाद्या कलाकारावरचा दिग्दर्शकाचा विश्वास खूपच महत्वाचा असतोच. (त्यानंतर गुलजार दिग्दर्शित 'अंगूर', 'नमकीन' या चित्रपटात संजीवकुमार दिसला. संजीवकुमारने कधीच वयाचे व भूमिकेचे बंधन ठेवले नाही). यातील "मौसम"ची निर्मिती मागची गोष्ट वेगळीच! त्या चित्रपटाचे निर्माते मल्लिकार्जुन राव यांना कमलेश्वर यांना सांगितलेले "आँधी"चे कथासूत्र फारसे आवडले नाही. पण "मौसम"चे आवडले. १९७५ या एकाच वर्षात गुलजार दिग्दर्शित 'आँधी', 'मौसम' (संजीवकुमार, शर्मिला टागोर), व 'खुशबू' (जितेंद्र, हेमा मालिनी, फरिदा जलाल. निर्माता प्रसन्न कपूर. हा जितेंद्रचा भाऊ!) असे तीन भिन्न स्वरुपातील चित्रपट प्रदर्शित झाले हे विशेषच. 'मेरे अपने' पासूनच गुलजार यांनी दिग्दर्शनात विविधता दाखवली... गुलजार यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांचे प्रगती पुस्तक एक वेगळाच आनंद.

"आँधी"तील 'आरती देवी' या भूमिकेसाठी गुलजार यांनी आपणास विचारले होते असे खूप वर्षांनी म्हणजेच २०११ साली वैजयंतीमालाने एका मुलाखतीत भाष्य केले हा सुखद धक्काच! तोपर्यंत या गोष्टीची कधीच चर्चा झाली नव्हती. गुलजार यांनी कोलकात्यात जावून सुचित्रा सेनची भेट घेऊन तिचा "आँधी" साठी होकार मिळवला!

"आँधी"ची काही दृश्य व गाणी काश्मिर मधील सौंदर्य स्थळावर चित्रीत करण्यात आली. या चित्रिकरण सत्रात राखी गुलजार आपली अगदी छोटी मुलगी मेघना (बोस्की) हिला घेऊन काश्मिरला गेली. दिवसभराचे शूटिंग संपल्यावर रात्री "श्रमपरिहार" आणि त्यात "बाटली फुटणे" हे स्वाभाविकच! एके रात्री (म्हणे) चित्रपटात घडते अगदी तशीच गोष्ट प्रत्यक्षात घडली असे गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच रंगवून रंगवून लिहिले गेले. एका रात्री (म्हणे) पार्टी संपल्यावर संजीवकुमारने सुचित्रा सेनचा हात धरला आणि

**तो तिला आपल्या खोलीत येण्याचा आग्रह धरत असतानाच गुलजार यांनी सुचित्रा सेनची त्याच्यापासून सुटका केली आणि ते सुचित्रा सेनला तिच्या रुमपर्यंत सोडावयास गेले आणि तेथून परतत असतानाच राखीने त्यांना पाहिले आणि तिचा काही गैरसमज झाला आणि ती प्रचंड रागावली (म्हणे). या सगळ्याचा परिणाम असा झाला की काश्मिरवरुन परतताना ते एकत्र नव्हते!**

**"आँधी" प्रदर्शित झाला. त्याला रसिकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत होता, शंभर दिवसांचे यशही गाठले होते आणि अशातच एक बातमी पसरली. सुचित्रा सेनने साकारलेली भूमिका तात्कालिक 'पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी' यांच्यावर बेतली आहे. गुलजार यांनी एका मुलाखतीत भाष्य केले, असे अजिबात नाही! हा गैरसमज आहे. चित्रपट लिहिताना व दिग्दर्शित करताना असा कोणताही विचार नव्हता. गुलजार यांचे म्हणणे काहीसं बाजूला पडले. अशातच**

गुजरात राज्यातील विधानसभा निवडणुक आली आणि त्यात या चित्रपटात एका दृश्यात 'आरती देवी' दारु सेवन करते या दृश्याचा विरोधी पक्षाकडून वापर करण्यात आला! आणीबाणीतील ही गोष्ट. हा चित्रपट निवडणूक आचार संहितेचा भंग करतोय या कारणास्तव या चित्रपटावर बंदी घालण्यात आली!

या चित्रपटाची गीते गुलजार यांनी लिहिली असून संगीत आर. डी. बर्मन यांचे आहे. या चित्रपटातील 'तेरे बिना जिंदगी से कोई..' (अनंतनाग), 'तुम आ गये हो..' (परी महल गार्डन) , 'इस मोड से जाते है..' (पहेलगाम) ही काश्मिरमध्ये चित्रिकरण झालेली गाणी आजही लोकप्रिय आहेत! या चित्रपटाचे मुंबईतील मेन थिएटर मेट्रो होते. "आँधी" दिल्लीत प्रदर्शित होताना पोस्टरवर म्हटले होते, 'आजाद भारत की एक महान महिला नेता की कहानी...' तर हैदराबाद येथील पोस्टरवर म्हटले होते, 'परदे पर देखिए अपने प्रधानमंत्री

को...' (त्या काळात मराठी असो वा हिंदी टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत!)

देशात २५ जून १९७५ रोजी  आणीबाणी लागू झाली आणि या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी आली. आजही विविध कारणास्तव "आणीबाणी च्या दिवसां'चा उल्लेख होता (उदा. कंगना राणावतचा "इमर्जन्सी" या चित्रपटाचे अलिकडेच झालेले प्रदर्शन)

त्यानंतर १९७७ साली म्हणजेच देशात जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यावर "आँधी" रि-सेन्सॉर करताना काही दृश्ये कापून  तो पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. आणिबाणीत गुलजार दिग्दर्शित 'आँधी' आणि डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सामना' (पुण्यात रिलीज १० जानेवारी १९७५) च्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली यावरुन बरीच चर्चा झाली.

विशेष उल्लेखनीय गोष्ट, मुंबईत १४ फेब्रुवारी १९७५ या एकाच शुक्रवारी "आँधी" व "सामना" (जानेवारीत पुणे शहरात जानेवारीत प्रभात चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला "सामना" त्यानंतर आता गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृह) हे प्रदर्शित झाले आणि दोन्ही चित्रपट रिपीट रनला म्हणजेच पुन्हा प्रदर्शित झाल्यावर असे काही गाजले की आजही त्यांचा जबरदस्त ठसा उमटलाय. ते माईलस्टोन चित्रपट ठरलेत!

"आँधी" मधील गुलजार यांचा एक संवाद फारच गाजला... चित्रपटातील राजकीय पक्षाचा कारभार सांभाळणारा चंद्रसेन (ओम शिवपुरी) एका वृत्तपत्राच्या संपादकास म्हणतो..

"इलेक्शन के पहले आप हमारा खयाल रखिये, उसके बाद हम आपका...!"

© दिलीप ठाकूर (राम प्रहर - झूम प्रहर)

## लेख क्र. ६८

## 'नमक हराम' @ पन्नाशीपार!
## 'बडी मुश्किल से मगर दुनिया में दोस्त मिलते है..'




हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "नमक हराम" हा माझा राजेश खन्नाच्या आवडत्या पाच चित्रपटातील एक!

यश चोप्रा दिग्द. "इत्तेफाक", शक्ती सामंता दिग्दर्शित "आराधना", हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "आनंद" आणि मोहनकुमार दिग्दर्शित "अवतार" हे माझे राजेश खन्नाचे काही आणखीन आवडते चित्रपट! (ही 'हिट-लिस्ट' दहापर्यंत सहज जातेय!)

अमिताभ बच्चनच्या माझ्या आवडत्या पाच चित्रपटात मी "नमक हराम"चा खास उल्लेख करतोच करतो!

प्रकाश मेहरा दिग्दर्शित "जंजीर" व "शराबी", रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले", मनमोहन देसाई दिग्दर्शित "अमर अकबर ॲन्थनी" हे माझे अमिताभचे 'टॉप-फाईव्ह'मधील चित्रपट' ही 'हिट-लिस्ट' सुद्धा नक्कीच दहाच्याही अगदी सहज पुढे जाईल!

आपण वयाच्या कोणत्या काळात चित्रपट पाहतोय, तेव्हाचा आपल्यावरचा चित्रपटाचा प्रभाव, आपली चित्रपटाबाबतची समज यात अनेक गोष्टी समाविष्ट असतात!

हा "नमक हराम" मी शालेय वयात असताना पाहिला. राजेश खन्नाच्या 'क्रेझ'ने

मंतरलेले ते दिवस! एक प्रकारचा तो 'मास हिस्टेरिया' होता. अशातच "जंजीर" आला! ११ मे १९७३ रोजी तो प्रदर्शित होईपर्यंत "हिंदी चित्रपटाचा वेगळा इतिहास लिहायची

सुरुवात होईल" असे कोणीही भविष्य वर्तविले नव्हते. 'मगर होनी को कौन टाल सकता है?!' सलिम जावेद लिखित पटकथा व संवाद आणि प्रकाश मेहराचे दिग्दर्शन असलेला "जंजीर" एक सर्वसाधारण मसालेदार मनोरंजक चित्रपट म्हणून प्रदर्शित झाला! मला आठवतय डॉ. भडकमकर मार्गावरील इंपिरियल थिएटर मध्ये "जंजीर" लागला आणि 'फर्स्ट शो'पासूनच पब्लिकने अक्षरश: डोक्यावर घेतला! 'अॅन्ग्री यंग मॅन' अर्थात सूडनायकाचे पर्व सुरु झाले. अमिताभच्या बाजूने अचानक वातावरण निर्माण होत गेले! त्याने राजेश खन्नाच्या यश चोप्रा दिग्दर्शित "दाग"च्या (मुंबईत रिलीज <u>२७ एप्रिल १९७३</u>) यशाचे वातावरण चक्क झाकोळून



टाकले! अमिताभचे हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "अभिमान" (रिलीज २७ जुलै १९७३), सुधेन्दू रॉय दिग्दर्शित "सौदागर" (२६ ऑक्टोबर १९७३) यापाठोपाठ "नमक हराम" आला! (रिलीज २३ नोव्हेंबर १९७३. बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील!)

राजेश खन्नावरील प्रेमाखातर 'नॉव्हेल्टी' चित्रपटगृहावर स्टॉलच्या दोन रुपये वीस पैसे तिकीटासाठी चक्क दीड तासापासून रांगेत उभे राहून हाती आलेले तिकीट घट्ट धरुन आत गेलो..! चित्रपट जसजसा पुढे सरकू लागला तसा अमिताभही आवडू लागला...! 'कौन है वो माय का लाल..' असे म्हणतच त्याचा जो उद्रेक झाला, संताप बाहेर पडला तोच 'हाऊसफुल्ल गर्दीतून प्रचंड टाळ्याच टाळ्या आणि शिट्ट्या.!!'

'नमक हराम" आणखीन एका गोष्टीसाठी आवडला. ती म्हणजे "मैत्रीची गोष्ट"! त्या काळात समाजात निखळ, निरपेक्ष मैत्रीचे नाते ही स्वाभाविक गोष्ट होती. त्या नात्यात

त्या काळात व्यवहार नव्हता! (तुमच्या 'मैत्री दिना'साठी खास संस्करण देतोय! 'क्लिक' करा आस्वाद घ्या!)

खरं तर मैत्रीची गोष्ट आणि चित्रपट यांचे नाते अतिशय घट्ट आणि विविध पध्दतीचे..! पिक्चरच्या नावातून असो ('दो यार', 'दोस्त', 'दोस्ताना', 'यार मेरा'), 'याराना' असो!




('दोस्ती', 'संगम', 'सागर', 'दिल चाहता है' , 'जिंदगी ना मिलेगी दोबारा', 'आदमी सडक का', 'छिछोरे' वगैरे अनेक!), संवादातून असो (सिगारेट और दोस्त दोनों फिल्टर होना चाहिए. चित्रपट 'एक चालीस की लास्ट लोकल'), गाण्यातून असो ('मेरी दोस्ती मेरा प्यार', 'ये दोस्ती हम नहीं तोडेंगे', 'यारी है इमान मेरा यार मेरी जिंदगी..' )....

यात एक हुकमी फंडा दोन मित्र एकाच युवतीच्या प्रेमात पडतात. आणि मग 'दोस्त दोस्त ना रहा..' (संगम) अथवा 'सच मेरे यार है, बस वोही प्यार है..' (सागर). रसिकांना हे प्रेम-त्रिकोण आवडले. त्यात कुतूहल व उत्सुकताही होती!

'थ्री इडियट्स' या सगळ्यात पूर्ण वेगळाच!

मैत्री कशीही असू शकते हे या चित्रपटातून अधोरेखित होतेय!




या सगळ्या मैत्री प्रवासात हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम' मधील मैत्री पूर्णपणे वेगळी! आपल्या वडिलांच्या (ओम शिवपुरी) आजारात 'विकी' (अमिताभ बच्चन) कारखाना सांभाळत असताना कामगार नेते बिपीन

**लाल (ए. के. हनगल) यांची त्याला एका प्रकरणात माफी मागावी लागते! याचा बदला घेण्याच्या विकीच्या वृत्तीत त्याचा अतिशय जिवलग मित्र 'सोमू' (राजेश खन्ना) मदत करण्यासाठीच 'चंदर' नाव धारण करुन त्याच ठिकाणी नोकरीला लागतो. पण कामगारांची सुख, दुःख, तणाव पाहून चंदरमधील माणुसकी जागी राहते आणि तो विकीची समजून घालण्याचा प्रयत्न करतो! ते विकीच्या पित्याला आवडत नाहीत म्हणून ते कूटनीतीने चंदरचे बिंग कामगारांसमोरच फोडतात! त्यामुळेच खवळलेले कामगार चिडून जाऊन चंदरला बेदम मारहाण करतात. हे प्रकरण इतके आणि असे वाढते की मालकच 'चंदर'चा अपघाती मृत्यू घडवून आणतात आणि आपल्यामुळेच आपल्या मित्राचे निधन झाले असे मानत 'विकी' शिक्षा भोगतो...) चित्रपट फ्लॅशबॅकने सुरु होतो. ह्रषिकेश मुखर्जी, गुलजार यांच्या दिग्दर्शनीय वैशिष्ट्यात 'फ्लॅशबॅक' खूपच महत्वाची गोष्ट असे!)**

चित्रपटात रेखा, सिमी गरेवाल, दुर्गा खोटे, ए. के. हनगल, ओम शिवपुरी, असरानी, मनमोहन, मंजू, जयश्री टी. रझा मुराद (आलमच्या भूमिकेत) इत्यादींवर भूमिका!

मैत्रीतील त्याग असा नि:स्वार्थी वृत्तीचा! आणि अशातच सोमू विकीला उद्देशून गाणे गातो, 'दिये जलते है फूल खिलते है..!' माझ्याप्रमाणेच अनेकांचे तरी हे अतिशय आवडते गाणे आहे! आनंद बक्षी यांच्या गीताना राहुल देव बर्मनचे संगीत! 'दिये जलते है..', 'मै शायर बदनाम..', 'नदीया से दरीया..' (सर्व किशोरकुमार) ही गाणी आजही लोकप्रिय! एका प्रसंगात 'सोमू' विकीला म्हणतो, 'जहाँ यार नहीं, वहाँ प्यार नही, जहाँ प्यार नही वहाँ यार नहीं!..' (त्या काळात चित्रपटातील असे 'टाळीबाज डायलॉग' एक वेगळीच 'संस्कृती' होती. चित्रपट हे दृश्य माध्यम असले तरी आपल्या देशातील "पब्लिक"ला कायमच 'क्या डायलॉग मारा यार..' हा फंडा महत्वाचा वाटला! गुलजार यांची संवाद संस्कृती

वेगळी, त्यात साहित्यिक स्पर्श तर सलिम जावेदची खूप वेगळी! कादर खानचे 'डायलॉग' म्हणजे 'बब्बईय्या हिंदी..'!

दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी आशयघन स्वच्छ मनोरंजक चित्रपटासाठी ओळखले गेले! आपले चित्रपट सहकुटुंब सहपरिवार पाहिले जातात याचे त्या काळातील दिग्दर्शक भान ठेवत! थेट 'मुसाफिर' (१९५७), 'अनाडी', 'असली नकली', 'सत्यकाम', 'आशीर्वाद', 'आनंद', 'गुड्डी', व्हाया 'अभिमान', 'मिली', 'अर्जुन पंडित', 'गोलमाल', 'जुर्माना', 'नौकरी', 'आलाप', 'खुबसुरत', 'झूठ बोले कव्वा कांटे' इत्यादी चित्रपटातून त्यांनी आपली वैशिष्ट्यपूर्ण वाटचाल जपली! आपली 'स्पेस' निर्माण केली. त्यांचा स्वतःचा आपला हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला! ते स्वत: संकलकही असल्याने त्यांच्या दिग्दर्शनीय मांडणीत एक विशिष्ट लय असे! अमिताभ व जया बच्चन यांच्यावर त्यांचे खास प्रेम! 'नमक हराम' मध्ये विकीची भूमिका साकारताना अमिताभने

त्यांचा आपल्यावरचा विश्वास साध्य केल्याचे दिसले! हा चित्रपट प्रदर्शित होताच यातील अभिनयावरुन राजेश खन्ना श्रेष्ठ की अमिताभ यावरुन चित्रपट साप्ताहिके, मासिकांतून भरपूर लिहिले गेले, ऊहापोह झाला! आणि या दोघांच्या फॅन्समध्येही जुंपायची हे विशेष! साप्ताहिक रसरंगमध्ये वाचकांच्या पत्राच्या सदरात अनेक आठवडे यावर उलटसुलट बरेच लिहिले गेले!

'बेकेट' (1964) या विदेशी चित्रपटावरुन 'नमक हराम' बेतला होता. मराठी रंगभूमीवरही याच थीमवर आधारित 'बेकेट' नाटक आले. नाटकाचे चित्रपटात माध्यमांतर करताना ते दृश्य माध्यमातून मांडण्याचे कसब कौशल्य हवे!

काळ बदललाय! सोशल मिडियाच्या युगात 'फेसबुक फ्रेन्ड' ही गोष्ट जन्माला आली! 'फोन अ फ्रेन्ड' ही देखील एक संकल्पना आहे. प्रत्यक्षात भेटायचे नाही! फक्त फोनवरची मैत्री असा प्रकार! इराणी हॉटेलमधील राऊंड टेबलाभोवती

**चार मित्र जमलेत व क्रिकेट, चित्रपट व राजकारणावर मनसोक्त मनमुराद गप्पा करताहेत आणि त्याच वेळेस ज्यूक-बॉक्समध्ये चार आण्याचे (कालांतराने आठ आण्याचे) नाणे टाकून गाणी देखील ऐकताहेत ती दोस्तीच वेगळी होती!**

**या प्रवासात 'मैत्रीची गोष्ट सांगणारे' चित्रपट वेगळाच ठसा उमटवणारे. "नमक हराम" तर नक्कीच! रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या ओलांडूनही या चित्रपटाभोवतीचे वलय कायम आहे हे तर केवढे मोठे यश! 'दूरदर्शन' आला, 'मॅटीनी शो'ला पुनःपुन्हा येत राहिला! व्हिडिओवर आला, मनोरंजन उपग्रह वाहिनीवरही आला. राजेश खन्ना व अमिताभ बच्चन या दोघांच्याही आवडत्या पाच चित्रपटात 'नमक हराम' आहे हे विशेषच! नाही का!!**

**© दिलीप ठाकूर (राम प्रहर - झूम प्रहर)**

## लेख क्र. ६९

# काही 'रिपीट-रन' खरंच अगदी भारीच गाजले..!




"अलबेला" १९५१ चा पिक्चर! सी. रामचंद्र यांच्या संगीतातील 'भोली सुरत दिल के खोटे..', 'शोला जो भडके दिल मेरा धडके..', 'शाम ढले खिडकीतले..' ही गाणी हिट होता होता डॉ. भडकमकर मार्गावरील (तेव्हाचा लॅमिंग्टन रोड) 'इंपिरियल' थिएटरमधील गर्दी वाढत वाढत गेली आणि मा. भगवान विलक्षण सुखावले! या चित्रपटाच्या यशाने मा. भगवान आणि 'अलबेला' या यशाच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या!

ही गोष्ट जुनी म्हणून तेथेच संपली असे अजिबात समजू नका. या चित्रपटाला साठ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त याच इंपिरियल थिएटरमध्ये "अलबेला" च्या खास खेळाचे आयोजन करुन जवळच्याच एका हॉलमध्ये फिल्म दीवाने मनसोक्त गप्पांसाठी जमले!

...तर साठच्या दशकात अधूनमधून "फक्त एका आठवड्यासाठी" असे म्हणतच "अलबेला" एखाद्या चित्रपटगृहात प्रदर्शित होई. सत्तरच्या दशकाच्या मध्यास तर धमाल आली. चित्र खजिना या चित्रपट वितरण संस्थेच्या वतीने पुन्हा प्रदर्शित केलेला "अलबेला" हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केला जावू लागला. एव्हाना रसिकांची बरीच पुढची पिढी आली होती. ती आणि मागची पिढी मिळून "अलबेला"च्या गाण्यावर ताल धरु लागले. एकदा लोकप्रिय झालेली गाणी सर्वकालीन लोकप्रियच असतात. त्या काळात रेडिओ, लाऊडस्पीकर, इराणी हॉटेलमधील ज्युक-बॉक्स,

टेपरेकॉर्डर याच माध्यमातून गाण्यांचा प्रवास सुरु असे. 'अलबेला'ची गाणी त्याही पलिकडे पोहचली. गोपालकाला, गणपती विसर्जन यातील 'कच्छी-बाजात 'भोली सुरत दिल के खोटे..' सतत वाजत वाजत एका पिढीतून पुढील पिढीत जात राहिले आणि "अलबेला" रिपीट रनला येताच धो धो चालला. एकेक करत अनेक चित्रपटगृहात प्रदर्शित होत राहिला!

"पिक्चरच्या दुनिये"तील अशा काही रंजक व यशाच्या गोष्टी रसिकांची पिढी मुद्रित माध्यमातून डिजिटल युगात आली तसाच त्या गोष्टी 'यू-ट्यूब' चॅनेलपर्यंत प्रवास करताहेत. माहितीच्या स्फोटात हा रंग वेगळाच!

आज मल्टीप्लेक्समध्ये काही जुने (तेही फार जुनेही नाहीत हो!) चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत असतानाच ओरडून सांगावेसे वाटते, हे कल्चर तर साठ आणि सत्तरच्या दशकातील आणि त्यात काही चित्रपट तर रिपीट रनचे हुकमी!

"मेरा नाम जोकर" (१९७०) 'फर्स्ट डे फर्स्ट शो'पासूनच पडला पडल्याची (की पध्दतशीर पाडला?) किस्सा कायमच गाजतो. दोन मध्यंतरचा "जोकर" आठवडाभरात एका मध्यंतरचा केला! काही आठवड्यातच "जोकर"ची रिळे थिएटर मधून गोडाऊनमध्ये गेली. (मुंबईत मेन थिएटर नॉव्हेल्टी) पण "शो" संपला नाही की थांबला नाही! काही वर्षातच 'जोकर' कधी कुठे रिपीट रनला तर कुठे मॅटीनी शोला रिलीज होत होत रसिकांचा असा काही प्रतिसाद मिळवण्यात यशस्वी ठरला..! सहज एक आठवण सांगतो. रणधीर कपूर दिग्दर्शित "हीना" (१९९१) चा मुंबईवरील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा खेळ आर. के. स्टुडिओतील 'मिनी थिएटर'मध्ये आयोजित केला होता आणि शो संपल्यावर स्टुडिओतच पार्टी. त्या पार्टीत "मेरा नाम जोकर" चा विषय निघताच रणधीर कपूर आम्हा सिनेपत्रकारांना म्हणाला, 'मेरा नाम जोकर' आर. के.

फिल्मच्या इतिहासातील सर्वाधिक उत्पन्न मिळवणारा चित्रपट ठरला. लोकांनी त्याला सुरुवातीस फ्लॉप म्हटलं पण त्यानंतर जेव्हा जेव्हा रिपीट रनला जोकर रिलीज झाला तेव्हा उत्तम प्रतिसाद मिळवला....तेव्हा "हीना"च्या समीक्षणापेक्षा जोकरच्या अशा यशाची बातमी मोठी होती!

रिपीट रन चित्रपटाच्या यशोगाथेत के. असिफ दिग्दर्शित "मुगल-ए-आझम" (१९६०) हा सर्वाधिक वेळा पुनः पुन्हा प्रदर्शित झालेला चित्रपट ठरावा. मला आठवतय, सत्तरच्या




दशकात मुंबईत तो सतत कुठे ना कुठे "एका आठवड्यासाठी" पुन्हा पुन्हा प्रदर्शित होत असे. मीदेखील असाच तो रिपीट रनला 'नाझ' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला

असता आवर्जून गेलो. तोपर्यंत त्याच्यावरील लेख वाचून वाचून तो डोळ्यासमोर होता. त्या काळातील मुद्रित माध्यमातून फ्लॅशबॅक, यादों की बारात, गुजरा हुआ जमाना, घुंघट के पट खोल, वो दिन याद करो अशा सदरांतून जुन्या चित्रपटांची चौफेर आणि भरपूर माहिती, वैशिष्ट्य वाचायला मिळत आणि त्यातूनच अनेक जुने चित्रपट कधी बरे पाहतोय असे होई.

नवीन शतकाच्या सुरुवातीस आधुनिक तंत्रज्ञानाने के. असिफ दिग्दर्शित "मुगल ए आझम" (१९६०) रंगीत करुन पुन्हा २००४ च्या दिवाळीत थाटात रिलीज करतानाही त्याची प्रिन्ट 'हत्तीवरुन' चर्चगेटच्या इरॉस थिएटरला आणली (५ ऑगस्ट १९६० रोजी मराठा मंदिर चित्रपट गृहातही अगदी अशीच ब्लॅक अँड व्हाईट 'मुगल ए आझम'ची प्रिन्ट हत्तीवरुन आणली होती. त्या वेळेस चित्रपटातील देखण्या काचमहालातील मधुबालावरचे 'प्यार किया तो डरना क्या..'

हे एकमेव नृत्य-गीत रंगीत होते). आम्हा चित्रपट समीक्षकांना इरॉसच्या फर्स्ट डे फर्स्ट शोचे तिकीट दिल्याने मागील व पुढील पिढीसोबत पुन्हा 'मुगल-ए-आझम' पाहिला. 'मुगल-ए-आझम' सत्तरच्या दशकापासून असंख्य वेळा रिपीट रनला प्रदर्शित झाला. मेहबूब खान दिग्दर्शित "मदर इंडिया", विजय आनंद दिग्दर्शित "गाईड", "तिसरी मंझिल", राज खोसला दिग्दर्शित 'वो कौन थी?', ओ. पी. रल्हन दिग्दर्शित "फूल और पत्थर", यश चोप्रा दिग्दर्शित "वक्त" हे रिपीट-रन वा मॅटिनी शोला वारंवार येत आणि चार पाच वेळा पाहिलेले असले तरी पुन्हा पाहण्यासाठी थिएटरमध्ये जाणे होई! ('लिंक्स' नक्की पहा.)

मराठीत दादा कोंडके यांचे चित्रपट सर्वकालीन हिट. पहिल्या रनला धो धो चालले. तसेच रिपीट-रनलाही त्यांना हाऊसफुल्ल गर्दी होत राहिली. अनेकदा तरी 'भारतमाता' चित्रपटगृहावर जावे तर 'आंधळा मारतो डोळा', 'तुमचं

आमचं जमलं', 'मला घेऊन चला' असा दादांचा कोणता ना कोणता चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाल्याचे दिसे आणि हमखास मनोरंजनाची हमी म्हणून तिकीट काढून आत जाऊन बसून मग फ्रेश होऊन बाहेर पडायचो!

रिपीट-रन वा मॅटिनी शो चित्रपटांची वैशिष्ट्य अनेक. "जंजीर", 'नमक हराम', 'दीवार" च्या यशाने अमिताभ बच्चन नावाला वलय आणि वळण आले आणि त्याचे सुरुवातीचे 'संजोग', 'प्यार की कहानी', 'रास्ते का पत्थर', 'बंधे हाथ' असे अनेक जुने चित्रपट आता रिपीट रनला प्रदर्शित केले. आता "परवाना"च्या पोस्टरवर अमिताभ मोठा (त्यात तो खलपुरुष असतो) आणि नवीन निश्चल व योगिता बाली छोटे होते! पहिल्यांदा रिलीज होताना याच "परवाना" च्या पोस्टरवर अमिताभ कुठे तरी कोपऱ्यात असे वा नसेदेखील. यशाची हीच तर गंमत असते. ती अनेक समिकरणे/ कधी नातेसंबंध बदलून टाकते!




आपल्या चित्रपटाचे जग अनेक प्रकारच्या लहान मोठ्या गोष्टीत रमलेले. राज खोसला दिग्दर्शित "प्रेम कहानी" आणि शक्ती सामंता दिग्दर्शित "मेहबूबा" या चित्रपटाना रसिकांनी नाकारले आणि खऱ्या अर्थाने राजेश खन्नाची सद्दी संपली! या चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीत तो कायम म्हणायचा, माझे दिवस परत येतील. पण अमिताभचा सूडनायक तरुण पिढीला आपलासा वाटत होता. 'प्रेम कहानी' व 'मेहबूबा' दोन्हीची गाणी आजही लोकप्रिय! याचा फायदा काय झाला माहित्येय? हे चित्रपट 'रिपीट-रन' वा मॅटिनी शोला आले रे आले त्यातील गाणी पाह्यला हमखास गर्दी! दर्जेदार गीत संगीत चित्रपटाला कायमच पुढील पिढीत नेत राहते!

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" हा रिपीट रनमध्येही विक्रमी. सत्तर एम.एममध्ये मिनर्व्हात अनेकांनी अनेकदा अनुभवला. रिपीट रनला पस्तीस एम.एममध्येही कुठे कुठे पाहिला. अनेक वर्षांनी त्यावर सोपस्कार करुन तो 'थ्री.डी.'




(त्रिमिती) करुन मल्टीप्लेक्समध्ये प्रदर्शित केला. मी या तांत्रिक अनुभवासाठी आवर्जून 'जुहू'च्या मल्टीप्लेक्समध्ये गेलो. गब्बरचा धाक कायम होता. आणि आता पन्नासाव्या वर्षांत प्रवेश केल्याबद्दल रिगल चित्रपटगृहात एका खास खेळाचे आयोजन केले असता मी रिगलवर पोहचेपर्यंत शोले हाऊसफुल्ल! एक रसिक मला म्हणाला, थिएटरमध्येच मी "शोले" एकशेदहा वेळा पाहिला.....ऐकून मला वाटलं, अशा फिल्म दीवान्यांनीच आपल्या देशात चित्रपट जगवला,

वाढवला, जगवला. त्यांनी "आपल्या देशातील चित्रपटावर निस्सीम प्रेम केले." शोले अनेकदा रिपीट रनला पडद्यावर आला आणि पुन्हा पुन्हा एन्जॉय केला गेला. एवढं "शोले'त पाहण्यासारखे काय आहे असे म्हणणारे बरेच असले तरी त्यांचे ऐकतोय कोण?

रिपीट रन, मॅटीनी शोचा इतिहास खूपच रंजक व अनेक आठवणी, अनुभव असणारा. आज मल्टीप्लेक्सला नवीन चित्रपटांचा प्रवाह आटलाय म्हणून जुने चित्रपट प्रदर्शित होताहेत इतकेच. त्यापेक्षा प्रत्येक मल्टीप्लेक्समधील एक स्क्रीन फक्त आणि फक्त अगदी ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटाच्या काळापासून ते २००० सालापर्यंतचे जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्यासाठी ठेवावा! चित्रपट संस्कृतीत कायमच जुन्या चित्रपटांचे आकर्षण कायम राहिलयं. तो खेळ यापुढेही राहू देत..!

© दिलीप ठाकूर (राम प्रहर - झूम प्रहर)

## लेख क्र. ७०

## "अबोध" @४२ वर्षे
## म्हणजे, माधुरीच्या कारकिर्दीला बेचाळीस वर्षे पूर्णही झाली?.. खरं वाटत नाही हो!




शबाना आझमी, स्मिता पाटील, दीप्ती नवल यांनी ऐंशीच्या दशकाच्या पूर्वार्धात समांतर (अथवा नवप्रवाहातील) चित्रपट व पारंपरिक लोकप्रिय मनोरंजक चित्रपट या दोन्हीत चांगलाच समतोल राखला होता! हे तुम्ही जाणताच!

"सरगम"च्या यशाने जयाप्रदा व "हिम्मतवाला"च्या यशाने श्रीदेवीची हिंदीतील वाटचाल सुकर झाली होती!

डिंपल खन्नाने "सागर" स्वीकारत पुनरागमन करताच तिला 'जख्मी शेर', 'अर्जुन' इत्यादी चित्रपट मिळाले होते! या दिवसात हे चित्रपट निर्मितीवस्थेत होते! पद्मिनी कोल्हापूरे, पूनम धिल्लन, रति अग्निहोत्री, टीना मुनिम, मीनाक्षी शेषाद्री, अनिता राज यांची आपापल्या पध्दतीने वाटचाल सुरु होती. इथे रेखा तर सर्वांच्या नाकावर टिच्चून.. टिकून होतीच!

अशातच एके दिवशी राजश्री प्रॉडक्शन्सच्या प्रथेनुसार एक आमंत्रण हाती आले, हिरेन नाग दिग्दर्शित "अबोध" प्रदर्शनास सज्ज झाला असून मरीन ड्राईव्ह येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये दुपारी चार वाजता या चित्रपटातील नवीन कलाकार 'माधुरी दीक्षित' व तपस पॉल आणि या चित्रपटाच्या युनिटची सिनेपत्रकारांशी भेट घडवण्यात येणार आहे.. असा तो फतवा होता!

"माधुरी दीक्षित" हे नाव मी त्यावेळेस पहिल्यांदाच वाचले आणि आणखीन एक नवतारका चित्रपटसृष्टीत




पाऊल टाकतेय असे वाटले. मीही 'मिडिया'त तसा नवीनच होतो! आणि अशा वेळेस फारसा उशीर करु नये अशा समजूतीत होतो! चित्रपटसृष्टीत वावरताना, वाढताना त्यात बदल होत होत गेला तो भाग वेगळा! 'राजश्री प्रॉडक्शन्स'चा चित्रपट ही गोष्ट मला नवीन नव्हती! ऑपेरा हाऊस थिएटरला कुटुंबासह पाहिलेला "उपहार" (१९७१) हा राजश्री प्रॉडक्शन्सचा मी पाहिलेला पहिला चित्रपट! त्यानंतर 'सौदागर', 'गीत गाता चल', 'दुल्हन वही जो पिया मन भाये', 'अखियोंके झरोखो से' असे राजश्री प्रॉडक्शन्सचे चित्रपट पाहत पाहत मोठा झालो! त्यांच्या चित्रपटांची हिंदीतील भली मोठी तपशीलवार श्रेयनामावली, सहकुटुंब पहावेत असे स्वच्छ मनोरंजक चित्रपट, आदर्श कथानक अशा गोष्टींचा मनावर असलेला पगडा कायम ठेवतच महेश भट्ट दिग्दर्शित

"सारांश" (मुंबईत रिलीज २५ मे १९८४) च्या अशाच पत्रकार परिषदेला गेलो आणि मी एकूणच नवखा असल्यानेच बुजल्यासारखा वागलो! (गिरगावातील चाळीत मध्यमवर्गीय संस्कारात वाढल्याने असेल कदाचित!) आणि आता "अबोध"च्या दुपारी चार वाजताच्या पत्रकार परिषदेस वेळेवर पोहचलो होतो! ...पाच वाजले, साडेपाच वाजले तरी 'ती' माधुरी दीक्षित पोहचली नाही! राजश्री प्रॉडक्शन्सचा लौकिक पाहता हे अनपेक्षित होते! उगाच आमची आपली कुजबुज सुरु झाली, पहिल्याच चित्रपटाच्या वेळेस ही उशीरा येतेय, स्वतःला काय 'स्टार' समजते काय? वगैरे वगैरे! सिनेपत्रकारीतेत गॉसिप्स पहिल्या क्रमांकावर असते, "चित्रपट कसा आहे"




वगैरे नंतर येते हा जणू धडाच मला मिळत होता..!

अशातच 'ती' माधुरी दीक्षित आली! अगदीच महाविद्यालयीन युवती हो! सोबत आई बाबा होते! त्या काळातील अनेक अभिनेत्री असा आईचा हात धरुनच चित्रपटसृष्टीत येत! माधुरीने आल्या आल्या सर्वांची माफी मागत म्हटलं! (संस्कार म्हणतात ते हेच), अंधेरीतील जे. बी. नगरवरुन आम्ही वेळेवर निघालो, पण 'ट्रॅफिक'मध्ये फार अडकलो... पहिलाच चित्रपट असला तरी माधुरीच्या वागण्यात/ बोलण्यात/ पाहण्यात/ ऐकण्यात कसलेही अवघडलेपण नव्हतेच! ती आम्हा जवळपास सर्वच सिनेपत्रकाराना छान हसत भेटली. (तेव्हापासूनचे तिचे ते हास्य आजही कायम आहे). मोबाईल येण्याच्या खूपच अगोदरचा हा काळ! मला आठवतय, शुक्रवारच्या नवशक्तीतील सदरात या चित्रपटाची सर्वसाधारण ओळख मी करुन दिली! माधुरी दीक्षितला मी दिलेले हे पहिले कव्हरेज! निमित्त अर्थात "अबोध"!

काही दिवसातच "अबोध" च्या मुंबईतील प्रदर्शनाची तारीख ठरली, १० ऑगस्ट १९८४! (म्हणजेच बेचाळीस वर्षे झाली देखील हो!). त्या काळात चित्रपटाच्या प्रिन्ट असत आणि टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत. शहरातून ग्रामीण भागात चित्रपट पोहचायला काही महिने (कधी एक दीड वर्ष) लागत. राजश्री प्रॉडक्शन्सचे देशभरात चित्रपट वितरणाचे जाळे होते... (चित्रपट संस्कृतीचा अभ्यास करताना ही गोष्टही महत्वाची..! प्रेक्षकांपर्यंत चित्रपट कसा पोहचत आला हे खूपच माहितीपूर्ण व रंजक आहे.)

"अबोध"चा आम्हा चित्रपट समीक्षकां साठीचा प्रेस शो रिलीजच्या दोन दिवस अगोदर 'न्यू एक्सलसियर' थिएटरमधील चौथ्या मजल्या वरील 'मिनी थिएटर'मध्ये होता. मला आजही आठवतेय, कोणतीही कसलीही अपेक्षा न ठेवता मी "अबोध" पाह्यला बसलो. राजश्री प्रॉडक्शन्सचा चित्रपट जसा सरळ रेषेत जाणारा, साधी गोष्ट असणारा हवा

**तसाच हाही चित्रपट होता! त्याची गोष्ट आता आठवत नाही. तशी ती नव्हतीच.**

**आपले स्वाभाविक हास्य, नृत्य साधना आणि शैली तसेच फॅन्स आणि फॉलोअर्सकडून सोशल मिडियात भरपूर लाईक्स मिळवत असलेल्या माधुरी दीक्षितची भूमिका असलेला पहिला हिंदी चित्रपट राजश्री प्रॉडक्शन्सच्या 'अबोध' च्या प्रदर्शनास यशस्वी ४० वर्षे पूर्ण होत आहेत. या चित्रपटाचे निर्माते ताराचंद बडजात्या होते, तर दिग्दर्शन हिरेन नाग यांचे होते. बंगालचा सुपर स्टार 'तापस पॉल' या चित्रपटात माधुरी दीक्षितचा नायक होता. या चित्रपटात अशोक सराफ, शीला डेव्हिड, लीला मिश्रा, दिनेश हिंगू, सुरेन्द्र पुरोहित, सविता प्रभूणे, राजश्री नायर, मोहन चोटी इत्यादींच्याही भूमिका आहेत तर संगीत रवींद्र जैन यांचे आहे!**

**आज मी जुन्या आठवणीत रमतो, फ्लॅशबॅकमध्ये जातो तेव्हा "अबोध"चे ते दिवस व तेव्हाची माधुरी दीक्षित हे**

सगळेच डोळ्यासमोर येते. आपलं दिलखुलास आकर्षक व्यक्तिमत्व आणि मेहनत या गुणांवर यशस्वी ठरलेली माधुरी दीक्षित हिंदी चित्रपटसृष्टीतील नंबर वनची तारका ठरली तरी मराठी भाषा, संस्कृती, सभ्यता, परंपरा, मूल्ये यांना विसरली नाही हे मी एक सिनेपत्रकार म्हणून अनुभलयं! हिंदी चित्रपटाच्या सेटवर त्या काळात ती मराठी सिनेपत्रकाराना आवर्जून मराठीतच मुलाखत देई! तिने मराठी चित्रपटातून भूमिका साकारावी अशी मराठी सांस्कृतिक, सामाजिक इच्छा होतीच. माधुरी दीक्षितने 'बकेट लिस्ट' (२०१८) या मराठी चित्रपटात भूमिका साकारली. तसेच तिने '१५ ऑगस्ट' (२०१९) या मराठी चित्रपटाची निर्मितीही केली. हा चित्रपट थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर अर्थात तिसरा पडदा पध्दतीने रिलीज केला. पण माधुरी दीक्षितने या चित्रपटाचा मुंबईत 'ग्लॅमरस' प्रीमियर शो केला! तिनेच "पंचक" (२०२४ ला प्रदर्शित) या

मराठी चित्रपटाचा निर्मिती केली आणि प्लाझा चित्रपटगृहात तिने आपल्या या चित्रपटाच्याच खेळास थिएटर भेटही दिली. माधुरीला पाहताच हाऊसफुल्ल गर्दीच्या आनंदाला उधाण आले! अनेकांच्या आयुष्यातील हा स्मरणीय क्षण ठरला असेल. आपल्या कारकीर्दीच्या चाळीसाव्या वर्षीही
अशी लोकप्रियता टिकवणे सोपे नसते हो! ते माधुरीला तिच्या गुणांनी साध्य झाले...

माधुरीच्या यशात अनेक गोष्टी! तिचं कायमस्वरुपी हास्य! मधुबाला, माधुरी, सोनाली बेन्द्रे, ऐश्वर्या रॉय यांच मधुर हास्य डोळ्यासमोर आणलतं तरी आपण फ्रेश होतो! भरत रंगाचारी दिग्दर्शित "टक्कर" (१९९३) च्या सेटवर सोनालीशी माझी पहिली भेट झाली. त्यानंतर तिच्या मुलाखतीनिमित्त अनेक भेटी होत होत अलिकडेच "सरफरोश"च्या पंचवीस वर्षे पूर्णच्या इव्हेन्टला भेटलो, तेच हास्य!

**माधुरीची व्यावसायिकता... निर्माते सुधाकर बोकाडे यांची "साजन" (१९९१) च्या खणखणीत यशावर मुलाखत घेण्याचा योग आला असता त्यांनी मला सांगितले, त्यांनी निर्मिलेल्या 'इज्जतदार', 'साजन' व 'प्रहार' या चित्रपटात माधुरीने भूमिका साकारताना आऊटडोअर्स शूटिंगच्या वेळेस हॉटेलमधील आपल्या कपड्यांच्या लॉन्ड्रीचं बिल स्वतः भरले. तो खर्च कधीच ती निर्मात्याच्या खात्यात टाकत नाही!**

**माधुरीचे नृत्य.... मिडियात असल्यानेच मला तिचं चित्रपटातील नृत्याच्या वेळेस सेटवर शूटिंग रिपोर्टींगचा चक्क तीनदा 'लाईव्ह' अनुभव आला. दिग्दर्शक एन. चंद्रा यांच्या आमंत्रणावरुन मेहबूब स्टुडिओत "तेजाब"चे 'एक दो तीन..' गाणे, दिग्दर्शक पंकज पराशरच्या "राजकुमार"च्या फिल्मालय स्टुडिओतील सेटवर आणि डेव्हिड धवन दिग्दर्शित "याराना"च्या हैदराबादच्या 'अन्नपूर्णा' स्टुडिओत.... नृत्यासाठीची माधुरीची अथक मेहनत थक्क**

करुन टाकणारी! अक्षरश: घाम गाळणे म्हणजे काय हे तेव्हा दिसले..!

माधुरी दीक्षित या नावाभोवतीचं "वलय आणि वळण" अनेक गोष्टींतून आकाराला आलेय. त्याच्या गोष्टी सांगाव्यात तेवढ्या थोड्याच!

मी चित्रपट पत्रकार/विश्लेषक म्हणून माधुरीची "अबोध"पासूनची वाटचाल पाहतोय! कधी तिची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या मुहूर्तांना हजर राहिलो ('तेजाब', 'त्रिदेव' इत्यादी), तर कधी मुलाखतींचे योग. तर कधी तिची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या सेटवर शूटिंग रिपोर्टिंगचे योग! पटतं नाही ना, माधुरी दीक्षितच्या कलरफुल, अष्टपैलू "धक धक" कारकिर्दीला बेचाळीस वर्षे पूर्ण झाली.....आकड्यात झाली म्हणायचे इतकेच!

© दिलीप ठाकूर (राम प्रहर - झूम प्रहर)

## लेख क्र. ७१

**"बावर्ची"@५४ वर्षे!**
**'निखळ मनोरंजनाची 'टेस्ट' आजही कायम!'**




**दिग्दर्शक 'हृषिकेश मुखर्जीं'चा चित्रपट म्हणजे, स्वच्छ, निखळ, कौटुंबिक मनोरंजनाची हमी. (एखादा "बुढ्ढा मिल गया" रहस्यरंजक, तसाच एखादा संगीतमय "आलाप" फसलेला. चालायचंच! काही गोष्टी इकडेतिकडे होणारच.)**

**असाच त्यांचा मस्त जमलेला मनोरंजक चित्रपट "बावर्ची"! मुंबईत रिलीज ७ जुलै १९७२. बघा ना, तब्बल चोपन्न वर्ष होऊन देखील तो आपल्या डोळ्यासमोर आहे! पुन:पुन्हा 'एन्जॉय' करता येतोय. यशस्वी चित्रपटाची हीच तर**

ताकद व ओळख असते, ते काळ बदलत राहिला तरी त्या कलाकृतीची खासियत कायम राहते!

'इट इज सो सिंपल टू बी हॅपी..! बट इट इज डिफिकल्ट टू बी सिंपल.!'

"बावर्ची" च्या रघुचे (राजेश खन्ना) हे असे सरळ सोपे असे आयुष्याचे तत्वज्ञान! प्रत्येक चित्रपटाचे आपले एक व्यक्तिमत्व असतेच असते. 'ॲनिमल' वेगळा नि "मुंज्या' वेगळा. आजही "बावर्ची" चा सरळ साधा स्वभाव खूप आकर्षित करतो हे या चित्रपटाचे सर्वात मोठे यश आहे! आजच्या वेगवान जीवनशैलीतही हा चित्रपट वेळ काढून पहावा आणि रिचार्ज व्हावे! राजेश खन्नाच्या काही वैशिष्ट्यांतील एक म्हणजे, तो हृषिकेश मुखर्जींच्या चित्रपटासाठी अर्धे वा सर्वसाधारण मानधन घेई! याचाच अर्थ तो दर्जेदार कामाची कदर करत असे. "बावर्ची"चे मुंबई वितरण विभागात हक्क 'शक्ती सामंता' व राजेश खन्ना

यांच्या 'शक्ती राज' फिल्म या वितरण संस्थेकडे होते. या जोडीने त्या काळात आणखीन काही चित्रपट वितरित केले. ("अनुराग" वगैरे. तो शक्ती सामंता यांचाच चित्रपट व राजेश खन्ना विशेष भूमिकेत.) राजेश खन्नाने "आविष्कार" या चित्रपटासाठी निर्माता व दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांजकडूनही कमी मानधन घेऊन चांगल्या कलाकृतीला प्राधान्य दिले. 'सुपर स्टार' असला तरी समजदार होता. संस्कारी होता..!

त्या दिवसात 'आनंद' (१९७१) नंतरचा दिग्दर्शक ह्रषिकेश मुखर्जी आणि सुपर स्टार राजेश खन्ना यांचा चित्रपट कोणता बरे असेल याची चित्रपटसृष्टी, प्रसार माध्यम आणि चित्रपट रसिकांना उत्सुकता असतानाच 'बावर्ची'च्या चित्रिकरणास सुरुवात झाली. अंधेरी कुर्ला रोडवरील 'मोहन स्टुडिओ' ह्रषिदांचा विशेष आवडता. आपल्या अनेक चित्रपटांचे मुहूर्त आणि चित्रिकरण त्यांनी मोहन स्टुडिओतच

केले. (दिग्दर्शक आणि त्याचा आवडता स्टुडिओ हेही एक विशेष समीकरण!) खरं तर राजेश खन्नाच्या सुपर स्टारचा झंझावात सुरु असतानाचा हा काळ होता. त्याची डायरी दोनेक वर्ष फुल्ल आहे असे म्हटले जाई. त्याची बातमी होई! राजेश खन्ना म्हणजे 'कलरफुल' बातमी असे ते दिवस होते. 'या चित्रपटाच्या सेटवरुन त्या चित्रपटाच्या सेटवर' अशी जणू पळापळ करीत राजेश खन्नाने दिवसातील दोन तीन तास काढत 'आनंद'ला उत्कटपणे न्याय दिला (या चित्रपटाच्या शूटिंगचे अनेक दुर्मिळ किस्से, आठवणी रमेश देव सांगत.) 'आनंद'च्या भावपूर्ण यशानंतर राजेश खन्नाला ह्रषिदांच्या दिग्दर्शनात अधिकाधिक मोकळे ढाकळेपणाने वावरणारी व्यक्तिरेखा हवी होती. तपन सिन्हा लिखित व दिग्दर्शित 'गलयो होईओ सत्ती' (१९६६) या बंगाली चित्रपटावर आधारित 'बावर्ची' निर्माण करायचं ठरले. 'आनंद'चेच निर्माते ह्रषिकेश मुखर्जी, एन. सी. सिप्पी, रोमू एन. सिप्पी यांनी

'बावर्ची' निर्मितीचे पाऊल टाकले आणि राजेश खन्नाच्या सहकार्यातून वर्षभरात चित्रपट पूर्ण करीत प्रदर्शितही केला. मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर मेट्रो (नि जोडीला मिनर्व्हाही) होते हे विशेष! मध्यमवर्गीय रसिकांना आपलंस वाटेल असे हे निर्भेळ मनोरंजन होते. त्या काळाशी सुसंगत स्वच्छ दिलखुलास मनोरंजन. राजेश खन्नाच्या विलक्षण क्रेझ असल्याच्या दिवसांतील हा चित्रपट. तरी बरं "बावर्ची" रुपात त्याने चित्रपटभर टोपी घातलीय. नि हेअरस्टाईल त्यात लपली गेलीय. त्याने अभिनय मात्र उत्फूर्त केलाय.

'रघू' (अर्थात राजेश खन्ना) शांती निवासमध्ये राहत असलेल्या 'शर्मा' आडनावाच्या एका भल्या मोठ्या एकत्र कुटुंब पद्धतीत 'बावर्ची' (स्वयंपाकी वा आचारी) म्हणून येतो आणि आपल्या खेळकर, खोडकर, मिस्कील, बडबड्या स्वभावाने मग या कुटुंबातील भाऊ भाऊ, जावा जावा, चुलत भावंड यांच्यातील छोट्या छोट्या गोष्टीतील अभिमान, व्यर्थ

वाद, काहीसा असलेला वा दडलेला अहंकार बाजूला पडत जातो. या कुटुंबाच्या एकूणच वागण्याला, त्रासाला कंटाळून या टुमदार निवासात कोणी स्वयंपाकी टिकत नसतो. असेही एक वैशिष्ट्य! रघू एक प्रकारे 'कुटुंब क्रांती' करतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे थोडेसे विस्कळीत होत जात असलेले नातेसंबंध तो हसत खेळत जुळवून आणतो, कुटुंबात वा घरात सकारात्मक दिलखुलास वातावरण निर्माण करतो असे या चित्रपटाचे मध्यवर्ती सूत्र! हा सगळा कुटुंब कबिला छान हसते खेळते आयुष्य जगू लागते. त्यांच्या हरवलेल्या जुन्या सवयी पुन्हा एकदा जाग्या होतात. रघु त्यांना आपल्या कुटुंबातीलच एक वाटतो!

या कुटुंबात जया भादुरी (तोपर्यंत ती बच्चन झाली नव्हती.), उषा किरण, दुर्गा खोटे, हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय, ए. के. हनगल, असरानी, मा. राजू हे कलाकार! गुणी कलाकारांची एक सक्षम फळीच हृषिदांनी जमवली. (येथे

दिग्दर्शक दिसतो म्हणूया) आणि त्यांचा वापरही उत्तम रितीने केला. तोहीअसा की 'भोर आयी...' या गाण्यावर दुर्गा खोटे यांचा चक्क पदन्यास पाह्यला मिळतो! काय छान एक्स्प्रेशन्स दिलीत हो त्यांनी. कम्माल! असरानी संगीतकार रजनीकांत-न्यारेलाल यांचा (हे नाव कोणावरुन ते सांगायची गरज नाहीच!) सहाय्यक विश्वनाथ शर्मा. त्याचे काम एकच, विदेशी गीत संगीत ऐकून त्यावरुन काही सुचतयं का (खरं तर कॉपीच) हे पाह्यचे! हिंदी चित्रपट संगीतात तेव्हा ते होवू लागले होते. संस्कृत नाटकाच्या सूत्रधाराप्रमाणे अमिताभ बच्चन कथेचे सार सांगायला सुरुवात करतो आणि चित्रपट सुरु होतो आणि हृषिदा आपल्याला रघुच्या माध्यमातून शांती निवासमध्ये घेऊन जातात. चित्रपटाच्या अखेरीस अमिताभ बच्चन म्हणतो, 'रघू किसी नये घर की तलाश मे जा रहा है...आशा है वो आपका घर नहीं होगा..!' गुलजार यांचा हा संवाद अखेरीस छान गुगली टाकतो! संपूर्ण चित्रपटात

गुलजार यांच्या संवादांची खुसखुशीत मेजवानी आहे. सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला शहरात एकत्र कुटुंब पद्धती हळूहळू मागे पडायला सुरुवात झाली होती (पण तीच आवश्यक होती) अशा वेळी त्याच एकत्र कुटुंब पद्धतीतील गोडवा आणि जिव्हाळा या चित्रपटात वेगळ्या पद्धतीने रंगतो. हृषिकेश मुखर्जी स्वतः चित्रपट संकलनाचे जाणकार असल्याने या छोटेखानी चित्रपटाची गती त्यांनी उत्तम राखलीय. चित्रपटाचे संकलक दास धायमाडे यांनी अंतिम आकार उत्तम दिला आहे. संकलन चित्रपटाची भाषा स्पष्ट करतो. हृषिदांच्या चित्रपटाचे हुकमी छायाचित्रणकार जयवंत पाठारे यांनी चित्रपटाचा मूड चांगला पकडलाय. कैफी आझमी यांच्या गीताना मदन मोहन यांचे संगीत आहे. 'तुम बिन जीवन कैसा..' (मन्ना डे), 'भोर आयी गया अंधियारा..' (किशोरकुमार, मन्ना डे, हरिन्द्र नाथ चट्टोपाध्याय, लक्ष्मी शंकर), 'मस्त पवन डोले रे..' (लता मंगेशकर), 'मोरे नैना

बहाए नीर..' (लता मंगेशकर) या गाण्यांचा यात समावेश आहे. नृत्य दिग्दर्शन गोपीकृष्ण यांचे आहे. भारतीय शास्त्रीय संगीतातील ही गाणी आहेत! ('लिंक्स' नक्की पहा)

"बावर्ची"च्या निर्मितीतील एक बहुचर्चित गोष्ट सांगायलाच हवी. खरं तर गॉसिप्स! अमिताभ बच्चन व जया भादुरी यांचे "एक नजर", "बन्सी बिरजू" या चित्रपटातून एकत्र काम करता करता सूत जमले! ते बरेच जवळ आले आणि आता तर "बावर्ची"च्या सेटवर जया भादुरीला भेटायला अमिताभ यायचा! अर्थात "आनंद" रिलीजनंतरचे हे दिवस! अमिताभ व जया दोघेही हृषिदांचे लाडके! पण अमिताभ जयाला भेटायला सेटवर येतोय हे राजेश खन्नाला आवडत नव्हते! अधूनमधून तो यावरुन शेरेबाजी करायचा! एकदा मात्र जयाचा संयम सुटला, ती तडकली आणि एक दिवस अमिताभचा असेल वगैरे तिने त्याला ऐकवले हा

किस्सा गाजला! इतका की आजही तो खुलवून रंगवून सांगितला जातो. 'गॉसिप्स'ला खतपाणी हे तर नेहमीचेच!

'बावर्ची'ची त्यानंतर 'तमिळ' तसेच 'कन्नड' भाषेत दोनदा 'रिमेक' झाली. एकदा नाव होते, "नंबर ७३ शांती निवास"! मराठीत कोणालाच या चित्रपटाची रिमेक करावीशी वाटली नाही हे चांगले की वाईट? फार पूर्वीच झाली असती तर नक्कीच रंगली असती! (राजकुमार हिरानी दिग्दर्शित "मुन्नाभाई एमबीबीएस" चा लेखक अभिजित घोष याने म्हटलंय, मुन्नाभाई हसत खेळत मांडायची प्रेरणा "बावर्ची" पाहून घेतली.) चित्रपटाचा आशय कौटुंबिक आनंद घेणारा असल्याने त्याची रिमेक होणे स्वाभाविक! दिग्दर्शक डेव्हिड धवनने गोविंदाला घेऊन 'हीरो नंबर वन' नावाने रिमेक केली. (ही हुकमी नि जमलेली अशी दिग्दर्शक व कलाकार जोडी!) पण मूळ चित्रपटातील सहजता आणि साधेपण त्यात हरवले होते आणि तद्दन विनोदी चित्रपट

करण्याचा प्रयत्न झाला होता! त्याचे हंसे झाले! गोविंदाकडून काय अपेक्षा ठेवायची असंही कोणी कोणी म्हटलं. हृषिकेश मुखर्जी म्हणजे मध्यमवर्गीय आणि मध्यममार्गी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे दिग्दर्शक म्हणून ओळखले गेल्याने त्यांच्या यशस्वी चित्रपटांचे प्रमाण जास्त आहे. आणि त्यांच्या दिग्दर्शनाबाबत चित्रपटसृष्टी, रसिक प्रेक्षक व प्रसार माध्यमात आपुलकी आणि विश्वासार्हता होती. त्यांच्या दिग्दर्शनीय चित्रपटांचे प्रगती पुस्तक सांगायचे तर 'मुसाफिर' (१९५७), 'अनाडी' (१९५९), 'अनुराधा' (१९६०), 'असली नकली' (१९६२), 'अनुपमा' (१९६६), 'आनंद', 'गुड्डी', 'बुढ्ढा मिल गया' (तीनही १९७१), 'अभिमान', 'नमक हराम' (दोन्ही १९७३), 'चुपके चुपके', 'चैताली', 'मिली' (तीनही १९७५), 'गोलमाल', 'जुर्माना' (दोन्ही १९७९), 'खुबसुरत' (१९८०), 'बेमिसाल' (१९८२) इत्यादी अनेक चित्रपट आहेत! त्यातील

'बावर्ची' मात्र स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेला आणि चोपन्न वर्षानंतरही तितकाच
तजेलदार आणि हलका फुलका चित्रपट आहे! सत्तरच्या दशकात नंतर तो 'मॅटीनी शो'ला तसेच 'दूरदर्शनवर' चवीने पाह्यला गेला. नंतरच्या काळात 'व्हिडिओ', 'चॅनल', 'यू-ट्यूब चॅनल' असा पाह्यला जातोय. एक चित्रपट असा प्रवास करत करत वाटचाल करतो. तुम्ही अद्याप पाह्यला नसेल तर आवर्जून पहालच ('लिंक' दिलीय!) आणि यापूर्वी अनेकदा 'एन्जॉय' केला असेल तर पुन्हा करा. स्वच्छ मनोरंजक चित्रपट म्हणून आजही ओळखला जातोय!

अशातच एके दिवशी बातमी आली, हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "आनंद", "मिली" व "बावर्ची" आणि गुलजार दिग्दर्शित "कोशिश" या चित्रपटांची रिमेक करण्यात येतेय! आता जुन्या चित्रपटाची रिमेक हा "फंडा" नवीन नाही, पण काही चित्रपटांची रिमेक नको हो! त्याची मूळ प्रतिमाच

**कायम राहूदेत! हे चित्रपट पुन:पुन्हा अनेकदा पाहिले गेले, आवर्जून पाहिले जातात, 'यू ट्यूब'वर उपलब्ध आहेत तर मग रिमेकने काय बरे साध्य होणार? "बावर्ची'ची रिमेक कोण करतेय? निर्माते आहेत, अब्बास सेनगुप्ता जादुगर यांची जादुगर फिल्म आणि समीर राज सिप्पी. (मूळ "बावर्ची" च्या निर्मात्यांमधील एन. सी. सिप्पी यांचा नातू) तर दिग्दर्शिका आहे अनुश्री मेहता. ('मिसेस अंडरकव्हर' या चित्रपटाची दिग्दर्शिका! या चित्रपटात राधिका आपटे आहे.) अनुश्री दत्ता हृषिकेश मुखर्जी व मनमोहन देसाई यांची जबरदस्त चाहती आहे. 'बावर्ची', 'चुपके चुपके', 'अमर अकबर ॲन्थनी', 'मिस्टर इंडिया' हे तिचे फेवरेट चित्रपट. यावरुन तिला पारंपरिक लोकप्रिय मनोरंजक चित्रपट आवडतात असे दिसते. म्हणून काय तिने "बावर्ची"च्या रिमेकचा विचार करायचा? जावेद अख्तर यांनी एका मुलाखतीत म्हटले, 'धीस फिल्म इज द ग्रेट इंडियन जॉईंट फॅमिली इज ॲन Extinct**

कॉन्सेप्ट!' या चित्रपटाच्या रिमेकमध्ये रणवीर सिंग फिट्ट बसेल असे म्हटलेय. त्यांच्या मताशी सहमत व्हायचं का? आज एकत्र कुटुंब पध्दती किती प्रमाणात शिल्लक आहे? शहरी नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्गात सातत्याने "एकाद्या छान 'फूड-पॉईंट'वरुन खाणे मागवले जातेय". "कुटुंबाचा आचारी" अथवा 'कुटुंबातीलच एक झालेला घरातील सर्व कामे करणारा" ही कॉन्सेप्ट आज शिल्लक ती किती आहे? "बावर्ची"ची रिमेक करताना हे सामाजिक, कौटुंबिक भान ठेवले तर बरे. जगणचं बदललयं तसा "बावर्ची" ही बदललाय आणि तो "आचारी" न राहता "कूक" अथवा "शेफ" झालाय. ऐसपैस घरात फॅशनेबल किचन आलेय! पारंपरिक खाद्य संस्कृतीच्या जोडीला इटालियन फूड्स, रशियन फूड्स असे अनेक इंटरनॅशनल फूड्स आलीत. या सगळ्यात हा कूक अथवा शेफ त्या घरातील कुटुंबातील सुख दु:खे ओळखणार कधी नि हलकी करणार कशी नि कधी?

**"बावर्ची" चा काळच वेगळा होता. तरी चित्रपट आजही 'एन्जॉय' करता येतोय तर मग पोट भरायला हवे तरी काय? आजच्या 'फास्ट फूड संस्कृती'ने हा चित्रपट अवश्य पहावा नि 'एन्जॉय' करावा! अरे हाय काय नि नाय काय!**

**© दिलीप ठाकूर**
**(राम प्रहर - झूम प्रहर)**
♥

## <u>लेख क्र. ७२</u>

### '३६ घंटे' @५२ वर्षे!
### 'दीड दिवसाचे ते एक थरार नाट्य..!'




'३६ घंटे' का कुणास ठाऊक? असे 'शीर्षक' असलेला एखादा हिंदी सिनेमा असेल, हे सुद्धा माहीत नसलेले अनेक लोक तुमच्या अवतीभवती हमखास सापडतील! काय बोलू!? 'कालाय तस्मै नम:'! आणखी काय!?

'३६ घंटे' या हिंदी चित्रपटाची सुरुवातच मुळी काळोख्या रात्री 'बॅन्के'वरील मोठ्या दरोड्याने होते...!!

हिंम्मत सिंह (सुनील दत्त), त्याचा भाऊ अजित सिंह (रणजीत) आणि या दोघांचा साथीदार दिलावर खान (डॅनी डेन्झोप्पा) हे 'खौफनाक' लुटारु या दरोड्यात बॅन्केतील नोटा, दागिने बॅगेत भरतात आणि आता ते त्यांची साथीदार कामिनी (सोनिया साहनी) हिच्या गाडीत बसून पुणे शहराकडे पळणार तोच शस्त्रधारी पोलीस येतात! त्यांच्यात व या तीन दरोडेखोर यांच्यात जोरदार चकमक सुरु होते! त्यात कामिनी गाडी घेऊन पळ काढण्यात यशस्वी ठरते, पण हे तिघे पोलीसांवर प्रतिहल्ला करण्याच्या प्रयत्नात गाडीत बसू शकत नाहीत. लूटीचा पैसा व दागिने कामिनीच्या गाडीत असतात तर आता हे तिघे मिळेल ती गाडी पळवून पोलिसांना चकमा देतात

बराच काळ पोलीस या गाडीचा पाठलाग करतात.

पण ते या लुटारुना पकडू शकत नाहीत! हे तीन खौफनाक नि विक्षिप्त लुटारु एका वृत्तपत्र संपादक अशोक रॉय

(राजकुमार) यांच्या प्रशस्त घरात आश्रयासाठी घुसतात. अशोक रॉय हे आपली पत्नी दीपा रॉय (माला सिन्हा) , मुलगी नैना रॉय (परवीन बाबी) आणि शालेय वयातील मुलगा (मा. शैलेश) राहत असतात. त्यांनी चुपचाप रहावे, आपल्या सुचना पाळाव्यात, कामिनीशी संपर्क होईपर्यंत आपण येथेच राहणार असे ते तिघे अशोक रॉयना सक्त ताकीद देवून सांगतात! यातून जे थरारक नाट्य घडते तो चित्रपट म्हणजे, राज तिलक दिग्दर्शित "छत्तीस घंटे" हा थ्रीलर चित्रपट! मुंबईत हा चित्रपट २१ जून १९७४ रोजी प्रदर्शित झाला! मेन थिएटर 'अप्सरा' होते. चित्रपटाला बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील, यानिमित्त हा फोकस! हा थरार काहीसा बोथट झाल्यानेच चित्रपटाला अगदीच साधारण यश प्राप्त झाले. दिग्दर्शकाचा प्रयत्न चांगला होता पण पटकथेत फार टर्न आणि ट्विस्ट नव्हते. वा निर्माण करता आले नाहीत. निर्माता व दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांच्या बी. आर. फिल्म यांच्या

"स्टोरी डिपार्टमेंट"ने या चित्रपटाचे लेखन केले (पूर्वीच्या अनेक चित्रपटाच्या गोष्टी अशाच जन्माला आणल्या जात. या स्टोरी डिपार्टमेंटमध्ये किती जण कामाला असत, ते टाईपरायटरवर काम करीत काय, हे शोध घेऊनही कधीच समजले नाही. ) संवाद अख्तर उल इमान यांचे आहेत.

या चित्रपटाची निर्मिती बी. आर. फिल्मच्याच बॅनरखालील. (सुरुवातीस श्रेय नामावलीत तसा उल्लेख आहे). राज तिलक यांचा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट. ते बी. आर. चोप्रा यांच्याकडे "दास्तान" (१९७२), "धुंद" (१९७३), यश चोप्रा यांच्याकडे "इत्तेफाक" (१९६९) आणि "आदमी और इन्सान" (१९७०) या चित्रपटांच्या वेळेस सहाय्यक दिग्दर्शक होते. हे सर्व बी. आर. फिल्म या बॅनर निर्मित चित्रपट! हे तसेच बी. आर. फिल्मचे बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'कानून' (१९६०), 'हमराज' (१९६७) हे रहस्य रंजक चित्रपट! या चित्रपटातील 'कानून' व 'इत्तेफाक' यात

एकही गाणे नाही हे विशेषच आणि त्या काळात तर आश्चर्यचकित करणारे! गीत संगीत नृत्य म्हणजे चित्रपटाचा ऑक्सिजन असा तो काळ!

"३६ घंटे" या नावातच वेगळेपण आहे. आणि स्टार कास्ट देखिल तगडी! सुनील दत्त खलनायकच्या भूमिकेत हे तर मुहूर्तापासूनच गाजत होते! (या चित्रपटाच्या कलाकारांची निवड होण्याच्या दिवसात सुनील दत्तचा काहीसा "पडता काळ" होता. कमबॅकसाठी तो धडपडत होता. अभिनेत्री साधना हिने दिग्दर्शित केलेल्या "गीता मेरा नाम" मध्ये साधनाची दुहेरी भूमिका असतानाच फिरोझ खान नायक तर सुनील दत्त खलनायक होता.). डॅनी व रणजीत हे त्या काळातील पडद्यावरचे हुकमी बदमाश! त्यांच्यासोबत सुनील दत्त ही आघाडी वा समीकरण काही वेगळेच. तिघांचे गेटअप भयावह आणि डरावने! रणजीत या संधीने विलक्षण खुश होता असे त्यानेच मला अलिकडेच

त्याची 'इट्स मज्जा' या डिजिटल चॅनेलसाठी त्याच्याच जुहूच्या बंगल्यावर मुलाखत शूट केली तेव्हा त्याने म्हटले. आपले खरे नाव गोपाल बेदी! सुनील दत्तने "रेश्मा और शेरा" या चित्रपटातून रुपेरी पदार्पणची संधी दिली तेव्हा त्यांनीच रणजीत केले हे त्याने प्रचंड उमाळ्याने सांगितले ('यू ट्यूब'वर ही मुलाखत पाहता येईल). आणि आता पुन्हा सुनील दत्तसोबत खलपुरुष साकारायची संधी, याचा आनंद काही वेगळाच!

"३६ घंटे" चा पूर्वप्रसिध्दीचा जास्त फोकस याच तिघांवर राहिल्याने तेच या चित्रपटाच्या "कथेचे नायक" वाटू लागले. बनी रुबैन यांनी चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीचे तर वसंत साठे यांनी चित्रपटाच्या प्रमोशनचे काम पाहिले. (वसंत साठे यांनीच राज कपूरच्या "बॉबी"चे लेखन केले. अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिध्दीचे काम ते अतिशय कल्पकतेने, हुशारीने व हौसेने करीत. एक गोष्ट आवर्जून सांगायलाच

**हवी, हे वसंत साठे आणि त्या काळातील कॉन्ग्रेस नेते केंद्रीय मंत्री 'वसंत साठे' या दोन भिन्न व्यक्ती होत्या! त्यांच्यात फक्त नामसाम्य होते इतकेच. सोशल मिडियात तर हा फरक आवर्जून सांगायलाच हवा. वसंत साठे आणि एम. बी. सामंत यांच्या "बॉम्बे पब्लिसिटी सर्विस" या विश्वासार्ह संस्थेच्या वतीने अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिध्दी व प्रमोशनचे काम करण्यात येई हे मी स्वतः अनुभवलयं!).**

**आज मी "३६ घंटे" या चित्रपटाचा विचार करतो तेव्हा माझ्या मनात प्रश्न येतो, यश चोप्रांचा "इत्तेफाक" सुपरहिट ठरला म्हणून बी. आर. चोप्रा यांनी त्यासारखीच एकाच फ्लॅटमध्ये घडणारा थरार म्हणून "३६ घंटे" ची कथाकल्पना पडद्यावर आणली नाही ना? शक्यता नाकारता येत नाही! आणि चोप्रांचे हुकमी कलाकार राजकुमार, सुनील दत्त व माला सिन्हा यांनी चोप्रांसाठीच राज तिलकला होकार दिला असावा! ते सहजी (विशेषतः लहरी राजकुमार) सहजी**

चित्रपट स्वीकारणारे नव्हतेच! "इत्तेफाक"चं नाट्य आणि रहस्यरंजकता अखेरपर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारी. क्लायमॅक्सला "जोर का धक्का धीरेसे लगे" असं खरा खुनी समजल्यावर होतं. राजेश खन्नाच्या बेहतरीन अदाकीरीपैकी हा एक चित्रपट. नंदा (साधनाने नकार दिल्यावर नंदाकडे हा चित्रपट आला), बिंदू, इफ्तेखार, सुजीतकुमार यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे शूटिंग परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत एका सेटवर झाले होते. "३६ घंटे"मध्ये अशी नाट्यमयता वा पकड नव्हती. नैना रॉयला तिचा प्रियकर विजय (विजय अरोरा) भेटायला येतो त्यात थ्रिल निर्माण करता आले नाही. राजकुमार असल्याने डायलॉगबाजीवर बराच भर होता. पण जोरदार संवादफेक म्हणजे चित्रपट पुढे सरकतो असे नव्हे. सुनील दत्त, रणजित व डॅनी या तिघांनी खौपनाक खलनायकीत जबरा रंग भरला! डॅनीने बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "धुंद" (१९७३)

मधील नकारात्मक व्यक्तीरेखेत आपला जबरदस्त ठसा उमटवून सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले होते!

साहिर यांच्या गीतांना सपन चक्रवर्ती यांचे संगीत. सुरुवातीस चित्रपटात असलेल्या चार गाण्यातील दोन रोमॅन्टीक गाणी अडथळा वाटतो म्हणून आठवडाभरात कापण्यात आली. अशोक रॉय आपल्या कुटुंबासह सकाळी देवापुढे भजन गातात हे गाणे श्रवणीय. 'तीन लोकपर राज तिहारा..' हे ते भजन!

चित्रपटात इफ्तेखार (विजयचे पिता), उर्मिला भट्ट (विजयची आई), रमेश देव (इन्स्पेक्टर वाडेकर), यासह देवेन वर्मा इत्यादींच्या भूमिका. या चित्रपटाची मूळ कल्पना जोसेफ हेस यांच्या "1954" या कादंबरीत होती, त्यावरुन "द डेस्परेट अवर्स" (१९५६) हा अमेरिकन चित्रपट निर्माण झाला. त्यावरुन हिंदी चित्रपट करताना मूळ 'स्पार्क' हरवला. त्यातला थरार बोथट झाला. कदाचित त्या

**काळातील प्रेक्षकांना तीन लुटारुंनी एका कुटुंबाला ओलीस ठेवणे आवडेल न आवडेल या समजदारीत दिग्दर्शक सापडला असावा. रवि चोप्रा या चित्रपटाच्या वेळेस राज तिलककडे सहाय्यक दिग्दर्शक होता. या चित्रपटाने साधारण स्वरुपाचे यश संपादले. काही वर्षांनी मॅटीनी शोला या चित्रपटाला रिस्पॉन्स मिळत राहिला याचं कारण, अशाच थ्रिल चित्रपटांचा मॅटीनी शोला हुकमी प्रेक्षकवर्ग होता.**

**दिग्दर्शक राज तिलकनी त्यानंतर "मुक्ती" (शशी कपूर, संजीवकुमार, विद्या सिन्हा), 'चेहरे पे चेहरा' (संजीवकुमार, रेखा) इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. पण आपली ओळख निर्माण करण्यात त्याला यश प्राप्त झाले नाही....**

**"३६ घंटे " हीच काय ती त्याची ओळख नि आठवण!**

**© दिलीप ठाकूर**
**(राम प्रहर - झूम प्रहर)**
**♥**

## लेख क्र. ७३

## 'प्रेम नगर' @ ५२ वर्षे
## 'प्रेम नगर है यह अपना...'!




हिंदी चित्रपटाने 'बायस्कोप'पासून ओटीटी पर्यंत, सोळा एमएमपासून सत्तर एम.एम, सिनेमास्कोप पर्यंत, रस्त्यावरच्या पोस्टरपासून ते डिजिटल युगापर्यंत, मोनो साऊंड सिस्टीमपासून सुपर साऊंड सिस्टीमपर्यंत, चित्रपटाच्या रिळापासून डिजिटलपर्यंत... असा भरपूर नि भारी प्रवास करताना त्यात एक गोष्ट कायम राहिली, ती म्हणजे प्रेम!

त्याला तुम्ही प्रेम म्हणा, प्यार म्हणा, मोहब्बत म्हणा, इश्क म्हणा, लव्ह म्हणा काहीही म्हणा चित्रपटाचे नाव, संवाद, गाणी, प्रतिकात्मक दृश्य, पोस्टर यातून अखंडपणे/ प्रचंडपणे वाहणारी गोष्ट म्हणजे, प्रेम, प्रेम, प्रेम! प्रेमाचा रसगुल्ला, प्रेमाचा रस, प्रेमाच्या आणाभाका, प्रेमाचा मुरंबा असे झालेच, पण कधी आंतरजातीय, आंतरराष्ट्रीय, आंतरधर्मीय असेही प्रेम रुपेरी पडद्यावर आले. कधी प्रेमपटात गरीब व श्रीमंत दरी, कधी चित्रपटाच्या शेवटी 'प्रेम विवाह' अर्थात 'लव्ह मॅरेज' (चित्रपटाचा शेवट गोड तर सगळेच गोड), तर कधी प्रेम त्रिकोणाची थीम ('अंदाज', 'संगम', 'सागर', 'साजन' वगैरे), कधी 'क्लायमॅक्स'ला शोकांतिका. (उदाहरणार्थ 'एक दुजे के लिए') अशा प्रेमाच्या नाना तऱ्हा हिंदी चित्रपटाच्या पडद्यावर येतच राहिल्या. काही धो धो चालल्या, तर काही पडदाही विसरला!

असाच एक ग्लॅमरस प्रेमपट सुरेश प्रॉडक्शन्सचा (चेन्नई. तेव्हाचे मद्रास!) डी. रामा नायडू निर्मित व के. एस. प्रकाशराव दिग्दर्शित "प्रेम नगर" याच प्रेमरंग/प्रेमरस परंपरेतील चित्रपट! मुंबईत रिलीज २४ मार्च १९७४. म्हणजेच बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील. काळ किती वेगाने पुढे सरकला बघा!

प्रेमाची ही गोष्ट अतिशय आकर्षक, देखण्या थाटामाटातील राजमहालातील! अतिशय भपकेबाज! तात्कालिक चित्रपट समीक्षकांनी त्याचीच एक प्रकारे खिल्ली उडवली! 'दिसायला देखणा पण शोभेचा चित्रपट' असे त्या काळातील चित्रपट समीक्षकांचे मत होते! त्या काळात चित्रपट समीक्षकेला खूपच मोठ्या प्रमाणावर वाचक आणि विश्वासार्हता होती. त्यांनी आनंद बक्षी यांची गीते व सचिन देव बर्मन यांच्या संगीताची केलेली तारीफ रसिकांना चित्रपट पाहण्यास उपयुक्त ठरली! पिक्चर हिट व्हायला तेवढेही

पुरायचं. राजेश खन्ना व हेमा मालिनी ही देखणी रोमॅन्टीक जोडीही छान जमली/शोभली होती! राजेश खन्नाच्या 'दो रास्ते',




'आराधना', 'इत्तेफाक', 'सच्चा झूठा', 'कटी पतंग', 'हाथी मेरे साथी' , 'अपना देश', 'सफर', 'आनंद', 'अमर प्रेम' इत्यादी ओळीने ज्युबिली हिट झंझावाताला 'मेहबूब की मेहंदी', 'दिल दौलत दुनिया', 'जोरु का गुलाम', 'शहजादा', 'हमशक्ल', 'मेरे जीवन साथी', 'मालिक', 'छोटी बहू' वगैरे फ्लॉपने राजेश खन्नाची लय बिघडली. काय घडतंय तेच  समजत नव्हते. ती पडझड सावरली १९७३ च्या यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग', १९७४ मधील जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आप की कसम',

शक्ती सामंता दिग्दर्शित 'अजनबी', के. एस. प्रकाशराव दिग्दर्शित 'प्रेम नगर' आणि मनमोहन देसाई दिग्दर्शित 'रोटी' या चित्रपटांच्या यशाने! तरी १९७५ साली राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी'ला अपेक्षित यश न मिळाल्याने राजेश खन्नाचा 'पडता काळ' असा काही सुरु झाला की हाच तो राजेश खन्ना, ज्याचा चित्रपट प्रदर्शित होतो तो 'ज्युबिली-हिट' होण्यासाठीच असा प्रश्न निर्माण
झाला. आजही त्याच्या यशाच्या झंझावाताला
अपयशाने झाकून टाकल्याची चर्चा रंगते!

दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटाच्या हिंदीतील रिमेक परंपरेतील हा एक! १९६९ च्या 'विचित्र कुटुंबम' या तेलुगू भाषेतील चित्रपटाची ही रिमेक! प्रशस्त श्रीमंत महालातील बडे कुंवर समशेर सिंग (प्रेम चोप्रा) आणि छोटे कुंवर करणसिंह (राजेश खन्ना) हे दोन भिन्न प्रवृत्तीचे सख्खे भाऊ! समशेर सिंग व त्याच्या महत्वाकांक्षी पत्नीचा

(बिंदू) या विशाल रंगमहालाच्या संपत्तीवर डोळा! तर करणसिंह गुलछबू! दारुचा प्रचंड व्यसनी! अगदी विमान प्रवासातही आपली हौस मौज एन्जॉय करणारा. एकदा तो लताला (हेमा मालिनी) तिच्यावर जबरदस्ती करु पाहणाऱ्यापासून वाचवतो. तिला आपल्याच महालात आश्रय देतो. ती आता या महालात रिती रिवाजांना खूप महत्व देते. तिचं वागणं 'रानी माँ'ला (कामिनी कौशल)ना प्रभावित करते. त्यातून करणसिंह व लताची जवळीक वाढते. एकमेकांचे स्वभाव आवडतात, सहवास हवाहवासा वाटतो. ते एकमेकांवर प्रेम करु लागतात. करणसिंह आपल्या प्रेमाचे प्रतिक म्हणून एक भव्य शीशमहल उभे करतो. 'प्रेम नगर है यह अपना!' लता अतिशय प्रेमाने करणसिंहचे दारुचे व्यसन सोडवते! 'ये लाल रंग कब मुझे छोडेगा..' यातून तो बाहेर पडतो आणि आता हे दोघे मिळून शमशेरसिंग व त्याच्या पत्नीचा कुटील डाव हाणून पाडतात. चित्रपटात

अशोककुमार, तसेच सुलोचनादीदी, नासिर हुसेन (हे दोघे लताचे आई वडील), रमेश देव (लताच्या भावाच्या भूमिकेत), मनमोहन, असरानी, अरुणा इराणी, नाना पळशीकर, डेव्हिड इत्यादींच्या प्रमुख भूमिका! छायाचित्रणकार ए. विसेंट यांनी अतिशय देखणेपणाने हा चित्रपट दाखवला!

त्या काळात चित्रपट पूर्ण होता होताच त्याची तबकडी म्युझिक मार्केटमध्ये येत आणि ती श्रवणीय असतील तर अशी काही सुपरहिट होत की, कधी एकदा हा चित्रपट प्रदर्शित होतोय नि ही सुपरहिट गाणी पाहतोय असे होऊन जाई! 'बाय बाय मिस गुड नाईट..' (किशोरकुमार), 'ठंडी हवाओंने..' (आशा भोसले व किशोरकुमार), 'ये कैसा सूर मंदिर है..' (लता मंगेशकर), 'जा.. जा मुझे ना अब याद आ..' (किशोरकुमार), 'ये लाल रंग..' (किशोरकुमार), 'प्रेमनगर है ये अपना..' (लता मंगेशकर व किशोरकुमार) अशी सगळीच गाणी लोकप्रिय म्हटल्यावर पिक्चरला 'फर्स्ट डे फर्स्ट

शो'पासूनच हाऊसफुल्ल गर्दी व्हायलाच हवी. मुंबईत मेन थिएटर 'ड्रीमलॅन्ड'ला पिक्चरने खणखणीत पंचवीस आठवडे मुक्काम केला.

सुरेश प्रॉडक्शन्सचे निर्माते डी. रामानायडू यांनी चित्रपट निर्मितीचे केवढे तरी सातत्य ठेवले! दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मात्यांच्या अनेक खासियतीमधील ते एक. त्यानी तमिळ, कन्नड, मल्याळम, तेलुगू भाषेतील चित्रपटांबरोबरच मराठी, हिंदी, बंगाली, उडिया, गुजराती, भोजपुरी, असामी, पंजाबी या भाषेतील चित्रपटांचे सातत्याने निर्मिती केली. चित्रपट निर्मितीत स्वत:ला वाहून घेणे म्हणजे काय हेच यातून दिसतेय. करिश्मा कपूरला "प्रेम कैदी" (दिग्दर्शक मुरली मोहन राव) मधून पहिला ब्रेक त्यांनीच तर दिला. 'हरिश' तिचा नायक होता! 'बंदीश', 'हम आपके दिल मे रहते है', 'आगाज' असे अनेक चित्रपट त्यांनी निर्माण केले! अनिल कपूर व काजोल

जोडीच्या 'हम आपके दिल मे रहते है'च्या हैदराबाद येथील त्यांच्या रामा नायडू स्टुडिओत शूटिंग रिपोर्टींगसाठी जायचा योग आला असता त्या भव्य दिमाखदार स्टुडिओत पाऊल टाकताच कमालीचा प्रभावित झालो! यानिमित्त त्यांच्याशी संवाद साधता आला. चित्रपट निर्मिती व स्टुडिओचे वैभव वा साम्राज्य उभारुनही डी. रामा नायडू अतिशय नम्र आणि सहकारी वृत्तीचे वाटले!

दक्षिणेकडून आलेल्या हिंदी चित्रपटांची आपली एक परंपरा आहेच आहे. साठच्या दशकात ती सुरु झाली आणि त्यात 'प्रेम नगर' एक महत्वाचा चित्रपट. उत्तम निर्मिती मूल्यात एक गोड गोष्ट आणि त्यात गीत संगीत व नृत्याची बहार असं छानसे पॅकेज. राजेश खन्ना व हेमा मालिनीला नटण्या सजण्याची मनसोक्त हौस मौज करता आली, तो त्यांचा आनंद पडद्यावरही दिसतो!




'प्यार का मौसम' ते 'प्रेम प्रतिज्ञा' आणि 'जवाँ मोहब्बत'पासून 'इश्क इश्क इश्क' असे प्रेमात अखंड विहार करणारे अनेक चित्रपट आले, त्यात 'प्रेम नगर' देखणा तर नक्कीच. बावन्न वर्षे पूर्ण झाली देखील हो!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

♥
विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर,
(निर्मिती/ संरचना/ मुखपृष्ठ/ ले-आऊट)
♥




ई-ये मराठीचिये नगरी

जो जे **वाचील** तो ते लाहो

**पुस्तकाच्या कव्हरवर फक्त एक क्लिक आणि पुस्तक उघडेल.**

आता सर्व पुस्तकांच्या छापिल आवृत्ती उपलब्ध आहेत. आपली मागणी नोंदवा WhatsApp- 9987737237

Whatsapp group link.

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ईपुस्तक हजर

No अट NO झंझट ना AGREEment. याहून सहज सोपे नाहीच कुठं.

(पुस्तक वाचण्यासाठी पुस्तकाच्या कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा. आरामात वाचा. लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू.

तुमचे नाव आणि गाव

**Whatsapp** करा **9987737237** हा नंबर सेव्ह करा ई साहित्य नावाने. नियमित ईपुस्तके मिळवत रहा.

## "सुपर डुपर हिट्स" (भाग ५)
## लवकरच तुमच्या भेटीला.